साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... ....८१

Six monthly........ 3 ............... 8 as
Single copy ............................4 as
Advertisemen
Below 10 lines ......2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 2 MAY 1898 NO 17

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख २ माहे मे सन १८९८ इ० अंक १७

नोटीस

संपत वा रावजी नाटे वस्ती मौजे जळगांव नाटे तालुके अकोट जिल्हा अकोले यास खाली सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझी माझे हातून कांहीं कसूर नसतां मजला माहेरी टाकले. वर्षे ३ झालीं तुमचे घरी आणून घातले असतां मजला तुझी वागवित नाहीं. घरांत येऊ न दिल्यामुळें परत माहेरी आले माझे आईबाप याना मजला पोसण्याची ताकत नाहीं यास्तव माझे हातून मोल मजुरी होत नसल्यामुळें चढले तीन वर्षांचे व यापुढें दरसाल रुपये ५० प्रमाणें अन्न वस्त्रा बद्दल ही नोटीस पावल्या पासून एक महिन्याचें आंत माझी सर्व तजविज करावी या प्रमाणें न केल्यास कोर्ट मार्फत घेण्याची तजवीज करीन. हें आपणास कळावे ता० २७।४।९८ इसवी दातुर रामकृष्ण राजाराम पि. रायटर.

( सही )

मुली मर्द संपत कर्ता बाप जैराम गोविंदा पाटील निशाणी खुद्द. राहणार हिवरखेड तालुके अकोट.

नोटीस

सोनी मर्द भोनाजी सुतारीण हल्ली वस्ती येऊलखेड ता. खामगाव ईस नोटीस देणार भोनाजी वल्लद सोनाजी सुतार राहणार मौजे भनकपूर ता० बाळापूर नोटिशीनें असें कळवितों कीं तूं मजला तारीख २७ मार्च १८९८ च्या शुद्धवऱ्हाडी पत्रांत नोटीस दिलीस ती पावली. नोटिशितील मजकूर सर्व खोटा आहे. मी तुला वागविण्यास सर्व तऱ्हेनें तयार आहे. व तुझ्या जिवास कोणत्याही तऱ्हेची जाचणूक होणार नाहीं. तूं मला न कळवितां लोकांचे फंदानें येऊन खेड्यास निघून गेलीस. तर ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आत तूं मजजवळ येऊन दाखल व्हावें. असें न झाल्यास तुजला ताब्यांत घेण्याबद्दल काम चालविलें जाईल कळावें तारीख २६ माहे एप्रील सन १८९८ इसवी.

( सही )

भोनाजी वल्लद सोनाजी सुतार मौजे भनकपुरी दस्तूर खुद्द.

जाहीरात

सर्व लोकांस भोनाजी वल्लद सोनाजी सुतार रहाणार भनगपूर ता. बाळापूर हा असें कळवितो कीं माझी बायको नांवें सोनी हल्लीं मुक्काम येऊलखेड ही मजशी दुसऱ्याच्या फंदफितुरानें दगलबाजी करून घरठाव करणार आहे असें समजतें. या करितां मी माझे सर्व जातभाई व इतर लोक यांस असें कळवितो कीं माझ्या समती खेरीज हिच्याशी कोणी घरठाव करील तर त्याजबद्दल जबाबदार धरले जाईल कळावें. तारीख २६ माहे एप्रील सन १८९८ इसवी.

( सही )

भोनाजी वा सोनाजी सुतार मौजे भनकपुरी दस्तूर खुद्द.

उत्तम नाटकांचे प्रयोग लोकांच्या श्रांत मनास विश्रांति देण्याची, व उदासीन झालेल्या अंतःकरणास उल्लास देण्याचीं साधनें आहेत इतकेंच केवळ नव्हे. तर सामाजिक स्थिति सुधारणें, व नैतिक धैर्याची वृद्धि होणें हें देखील अशा प्रयोगांवर अवलंबून आहे.

नाटकाची योग्यता, त्याचे संविधानकावर असते हें कोणी नाकबूल करणार नाहीं भाषासरणी, अभिनय, हीं दुसऱ्या दर्जाचीं तरी मोठ्याच महत्वाचीं अंगें आहेत. त्याच प्रमाणें गायन वादनादि कलांचें सहाय घेऊन रंगभूमीचें स्वरूप अत्यंत रमणीय, व प्रेक्षकांचीं मनें तल्लीन करून टाकण्या सारखें करितां येतें. यांत नाट्य मंडळीचें काम हें आहे की वर दर्शविलेल्या कला, नाटकग्रंथ, वगैरे, जे चांगले ह्मणून ठरले आहे त्यांचा आश्रय करावा, व त्यांची निवड करण्यांत व योजना करण्यांत चातुर्य खर्च करावें.

प्राचीन किंवा अर्वाचीन सर्व मान्य ग्रंथकारांचा अनादर करून स्वकृत ग्रंथांचे खेळ नेहमीच करूं लागल्यास ते तिरस्कार्य होतील हें उघड आहे. समजा कीं, अर्वाचीनकाळीं, हर्मोनियम आदिकरून वाद्यें, जीं, वादनकला निपुणांनीं तयार केलीं आहेत, आणि भव्य व विस्तीर्ण अशा रंगभूमि प्रदेशाचें समग्रवातावरण, आपल्या मंजुल व मधुर ध्वनीनें एक समयें करून व्यापून टाकण्याचें व तेणेंकरून श्रोत्यांचीं मनें प्रफुल्लित करून टाकण्याचें ज्यांच्या अंगीं सामर्थ्य आहे, आणि गीतें ह्मणणारें पात्र कितीही दूर असलें तरी तितक्या अंतरावरून त्याची उत्तम साथ करण्याचें ज्या वाद्याचे अंगीं सामर्थ्य आहे त्याचे जागीं नुसता विणा, किंवा सतार अथवा स्वकृत दुसरें वाद्य घेऊन आपलें कार्य करूं असें कोणी ह्मणेल तर तें ह्मणणें जसें हास्यास्पद ठरेल तसाच प्रकार उत्तम ग्रंथांचे प्रयोगांचा व हल्लीं प्रचारांत येत असलेल्या ग्रंथांचे प्रयोगांचा होय. नाटक मंडळीं कडूनच नवीन नवीन खेळ रचण्यांत व करण्यांत येतात असें ऐकण्यांत आहे. हें खरें असेल तर उत्तेजनार्ह नाहीं.

नाटकाचे कथानका प्रमाणें, निरनिराळ्या रसांचा, प्रेक्षकांचे अंतकरणांत उद्भव व उत्कर्ष होणें, आणि त्या त्या रसानें त्यांचीं मनें व्याप्त आहेत असें दृष्टिगोचर होणें, हें नाट्य कला निपुणतेचें लक्षण होय.

इकडे नाटक अगदीं रंगांत आलें असून प्रेक्षक निद्रावश झाले आहेत किंवा नाटक पाहण्याहून अन्यव्यापारात मग्न आहेत असें आढळल्यास प्रेक्षकजन अरसिक किंवा नाट्य मंडळी स्वकर्तव्यांत अनिपुण हें कांहीं सांगतां येत नाहीं.

आह्मांस माहीत आहे कीं, प्रयोगांतील हरिश्चंद्र हा कांही खरा हरिश्चंद्र नाहीं. आणि विश्वामित्रही खरा नाहीं. मूळचे व्यक्तींच्या ह्या प्रतिकृति आहेत. तरी त्या पाहिल्यानें मनोवृत्तींत जी चलबिचल होते ती कांहीं खोटी नव्हे. ह्मणून प्रेक्षकजनांस त्यांच्या विद्यमान स्थितीचा क्षणमात्र विसर पाडविणें व आपण विवक्षित व्यक्ति नसतां ती आहों! असें भासविणें, ही अलौकिक करामत होय.

उमरावती येथें तारीख १६।४।९८ रोजीं पाटणकरांचा " युवतिविजय " खेळ पाहण्यास आह्मी गेलो होतों. कथानक चांगलें किंवा वाईट होतें हें सांगतां येणें कठीण. कारण तें काय होतें याचा उलगडाच झाला नाहीं. हें कथानक एखाद्या तरी विशिष्ट गुणानें युक्त असतें तरी बरीच सार्थकता वाटली असती. प्राचीन सर्वमान्य ग्रंथांतील संविधानक, व टीकाविषयक भाग यांत किती अंतर आहे तें पाहण्याची संधि मिळाली हा लाभ झाला.

या खेळांतील नायकास ( एक राजा ) त्याच्या पत्नीचे आचरणाविषयीं संशय आला आणि त्यानें तिच्या वधा विषयीं आज्ञा दिली. खेळांतील हृदयविदारक हाच भाग होय. पण तो इतक्या त्वरेनें झाला कीं, सुमारें १० मिनिटाचे आत वर प्रमाणें त्याचें पर्यवसान झालें. ( खरें ह्मटलें तर नाटक येथेंच बहुतेक समाप्त झालें ह्मणजे प्रारंभींच शेवट झाला ) कोणत्याहि पात्रा विषयीं, आनंद, शोक, करुणा, तिरस्कार, द्वेष, हीं उत्पन्न होण्यास, त्या त्या विकाराचें बराच वेळ पूर्वीं पोषण व्हावें लागतें. नायिकेचें सच्छील, सद्वर्तन, तिचे दुसरे प्रशंसनीय गुण, पती विषयीं तिचें प्रेम व निष्ठा, यांची आह्मास मुळींच ओळख करून दिली नाहीं. मृच्छकटिकांतील हा भाग पाहा. चारुदत्ता विषयीं प्रेक्षकांचे मनांत हळहळ उत्पन्न झाली ती होण्यास नायकाचे आंगचे अप्रतिम गुण, ग्रंथकारानें हळू हळू त्यांचे मनात बिंबवून दिले आहेत. शत्रु मित्राचे ठायीं समान भाव, अप्रतिम औदार्य, निष्काम प्रीति स्वार्थ त्याग, दुसऱ्याचे दुःखा विषयीं हळहळ इत्यादि गुणांचें विवेचन करून सर्व उज्जनीनिवासि जनाचें अंतःकरण त्यानें नायकाकडे आकर्षून घेतलें आहे. याचा परिणाम असा झाला कीं, आर्यक, शर्विलक, वीरक इत्यादि वीर चारुदत्ताचे पक्षास मिळाले आणि सज्जनाचा छल पाहून लोकाचीं मनें बिथरलीं. शेवटीं त्यांचे क्रोधाग्नीस पालक राजाची आहुति पडली वसंतसेनेची प्रीति, व लोकांचे निस्सीम प्रेम चारुदत्तावर जडण्यास, कर्त्यानें किती खुबीदार गोष्टीची योजना केलेली आहे हे मर्मज्ञांस समजून येईल. आणि पुस्तकाच्या अखेरीस, ह्मणजे चारुदत्त आपल्या गुणांनीं लोकांच्या मनांत पूर्ण भरल्यावर त्याजवर प्राणघाताचा प्रसंग आणून, जनसमुदायाचें प्रेम कसोटीस लाविलें आहे! प्रस्तुतच्या खेळांत, प्रारंभींच नायिकेस फांसावर चढविण्याचा प्रसंग आणिल्यामुळें नाटकाची सर्व गोडि नष्ट झाली हें सांगावयास नको. आतां हा सर्व दोष नाटक मंडळीकडे नाहीं. तरी ग्रंथांची निवड करण्या पुरता आहे.

या खेळांत दुसरी एक गोष्ट तिरस्कार्य अशी दिसली ती ही कीं, कांहीं एका प्रकारें वेड्या सारखे अंग विक्षेप करून, दांत विचकून, डोळे मिचकावून लोकांस हंसविण्याचा प्रयत्न करणें. सर्व गोष्टींस मर्यादा असेत, हें वचन यांच्या नीतिपुस्तकांतून गळून पडलें वाटतें. भोजनांत रुचि देण्यास मीठ हें पराकाष्टेचे अवश्यक द्रव्य आहे. पण सर्व पदार्थांस फांटा देऊन मिठाची रास पानावर घेऊन ती फांकीत बसल्यास उलट्या हातील. आह्माला वाटतें, लोकांस रंजविण्यास या एका गोष्टी शिवाय, दुसरें साधन यांजवळ नाहींच कीं काय? हा प्रकार दोन वेळ आणि प्रत्येक वेळीं कंटाळा येई पर्यंत झाला अशा गोष्टींनींच केवळ विद्वज्जनांचें रंजन होत नाहीं. आणि अशी स्थिति समाजास इष्ट नाहीं. आतां असें कां व्हावें, हा प्रश्न आहे. याचें उत्तर, प्राचीन किंवा अर्वाचीन विद्वज्जनांचीं नाटकें, ज्यांत सर्व रसांची, व रंगांची मोठ्या तारतम्यानें योजना केलेली असते त्यांचा अव्हेर करून स्वकृतीस किंवा तशाच परकृतीस महत्व देणें हें होय. ग्रंथकारांची किंमत इतकी कमी झाली नाहीं, कीं, ती थोरडी पाहिजे ती मिळवूं शकेल. नाटकें रचणें ही एक गोष्ट आहे व त्यांचे प्रयोग करून दाखविणें ही दुसरी आहे. उत्तम पाकनिष्पत्ती होण्यात जसें निरनिराळे परिमाणानें मसाले घालावे लागतात, तसेंच काव्यरूप पाकांत योग्य प्रमाणानें सत्कवी हें मिश्रण करीत करीत असतात. खेळ करण्याकरितां विद्वानां कडून मुद्दाम ग्रंथ रचविण्याची पद्धती स्तुत्य होय. पाटणकर कंपनींत, बरीच मंडळी होतकरू दिसली. त्यांनीं मनावर घेतल्यास ही सुधारणा ते तेव्हांच करूं शकतील अशी खात्री आहे.

आज जरी प्रेक्षकांचें लक्ष इकडे गेलेलें दिसत नाहीं तरी ही अनुकूल स्थिति फार दिवस चालणें शक्य नाहीं कारण तिचा पाया मजबूत नाहीं.

प्रेक्षकांचा समुदाय बराच असतो, तरी त्यांत विद्वान, रसिक, व मार्मिक गृहस्थांची संख्या अत्यल्प होती. आपली कृति विद्वानांस पसंत व्हावी अशी इच्छा असल्यास युक्त असे फेरफार करणें जरूर आहे.

कोणत्याही धंद्यांत प्रवीणता संपादन करणें प्रेपादकांस, द्रव्यलाभ व कीर्तिलाभ होण्याचा साधन होतें व जनसमुदायास हितकर होतें.

नाटक मंडळीचें व जनसमुदायाचें हित व्हावें अशा उद्देशानें वरील लेख लिहिला आहे.

वि०

## वऱ्हाडसमाचार

मित्ती वैशाख शुद्ध ११ शके १८१९

गेल्या 'केसरी'च्या अंकांत शिवजयंतीच्या उत्सवा संबंधानें एक चांगला लेख आला आहे आणि त्यांत किती ठिकाणीं हे उत्सव मोठ्या थाटामाटानें व शांततेनें झाले याचीहि संक्षिप्त हकीकत दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नामाचा महिमा इतका विलक्षण आहे कीं एका प्रकारची अनुपम वीरश्री अंगांत येते आणि उत्तम राजनिष्ठेनें राष्ट्रवैभव शिखरास पोंचविण्याचें मनोराज्य मन करूं लागतें. या सर्व गोष्टी मनोराज्यांतल्या सध्यां दिसतात, पण त्या खरोखर प्रत्ययास येणार असतील तर त्या ब्रिटिश राज्यांत येऊं शकतील. ब्रिटिश राष्ट्राशीं संबंध जुळल्या दिवसा पासून आमची राष्ट्रीय कल्पना फार विस्तृत झाली आहे. भूगोलाच्या दृष्टीनें ग्रेटब्रिटन व इंडिया हे दोन देश दूर दूर दिसतात तथापि राज्यकारभाराच्या दृष्टीनें हे दोन्ही देश एका ब्रिटिश राज्याचेच उपभाग आहेत आणि यांची जी निरनिराळी शक्ती तीच एका ब्रिटिश राज्यांत एकवटली आहे. ब्रिटिश छत्राखालीं आमच्या संकुचित कल्पना नाहींशा होऊन आमचे प्राचीन हिंदु, मुसलमान, इंग्रज, पार्शी इत्यादि शब्द निव्वळ धर्ममताचे दर्शक ह्मणून रूढ राहिलेले आहेत. त्यांच्या मधील राजकीय अर्थ नाहींसा झाला आहे. 'ब्रिटिश' या संज्ञेनें आमचें एकीभवन होऊन आह्मास राजकीय बाबतींत हिंदु, मुसलमान इत्यादि भेदाभेद वाटत नाहीं. पूर्वकालीन मनोविकाराच्या भयंकर अतिरेकामुळें एखादी राजकीय दुही मानली तरी ती विजयशाली व्हिक्टोरिआ सरकारच्या नाममहिम्यानें क्षणिक ठरते. आह्मी सर्व भिन्न धर्मवाले संमेलनानें एका ब्रिटिश सरकारची प्रजा आहे आणि सांप्रत काळचा आमचा शिवाजी आमच्या परमपूज्य व्हिक्टोरिआ महाराणी आहेत. मि. दादाभाई यांनीं जो नवा राजधर्म इंडियास उपदेशिला आहे त्याचा मतलब तरी असाच आहे. शिवजयंतीचे महोत्सव हे वीरपुरुषांच्या सद्गुणांचीं द्योतकें आहेत आणि त्यांतल्या त्यांत हा महोत्सव हिंदु लोकांस फार शिरसावंद्य वाटेल. हिंदु लोक जसे शिवाजीचे गुण गातील तसेच एकाच लोक [illegible] वालेस, ब्रूस सारख्यांचा नाममंत्र जपतील. वाशिंगटनची महती अमेरिकेंत विशेष आढळेल, नेपोलियन बोनापार्टीचे उत्सव फ्रान्सांतच विशेष होतील, हे किंवा अशा प्रकारचे महोत्सव प्रत्येक देशांत निरनिराळ्या विशिष्ट व्यक्तींचे होत असतात. अशा महोत्सवांनीं राजनिष्ठा कमी न होतां अधिक दृढ होते असा आमचा अनुभव आहे. ज्याला आपल्या राष्ट्रांतील महापुरुषा विषयीं अभिमान वाटेल तोच मनुष्य आपल्या राज्यकर्त्या विषयीं खरी राजनिष्ठा ठेवील. मृत पुरुष या महोत्सवांनीं कांहीं जीवंत होत नाहींत किंवा तत्कालीन गोष्टी पुन्हां सृष्टींत निर्माण होत नाहींत परंतु या महोत्सवांनीं तत्कालीन उत्तम उत्तम गोष्टींच्या मनोभावना लोकांमध्यें जागरूक होतात आणि त्यायोगानें वर्तमान स्थिति उन्नतिप्रद होण्याला नैसर्गिक मदत मिळते. चांगल्या मनोभावना ह्मणजे सर्व उत्कृष्ट गोष्टीचा निष्कर्ष होय. बारा वर्षांच्या शिक्षणानें मनें जितपत संस्कृत होतात त्यापेक्षां अधीक कार्य शिवजयंती सारख्या एका महोत्सवानें होतें.

शिवजयंतीच्या उत्सवा संबंधानें कांहीं आंग्लो-इंडियन पत्रकारांचा मोठा कटाक्ष आहे यांच्या मतानें शिवाजीचा जयघोष ह्मणजे महाराणी सरकारशी द्रोहबुद्धि होय. 'इंग्लिशमन' पत्रकर्त्यांनें शिवजयंती ही मुंबई सरकारच्या तापत्रयाला कारणीभूत ठरविली आहे. तापसंताप करण्याचें कारण मुंबई सरकारला खरोखर नाहीं पण सरकारच्या भयंकर कल्पनेनें राजश्री टिळक बंदिवासांत पडले आणि सरदार नातू तुरुंगांतच वास करूं लागले. पण आतां सर्व वातावरण शांत झालें आहे तेव्हां मुंबई सरकार आपल्या मागील चुकया दुरुस्त करील तर सर्व देशावर मोठे उपकार होतील. शिवजयंतीचा उत्सव जितका सार्वजनिक व्हावयास पाहिजे तितका तो होत नाहीं ह्मणून आह्मास वाईट वाटतें. लोक भेकड आहेत. त्यांस खऱ्या राजनिष्ठेची योग्यता पक्की कळतच नाहीं. सरकारच्या इतराजीला भिऊन शिवजयंतीच्या उत्सवांत लोक शिरतच नाहींत. पण कांहीं लोक खरोखर इतके असाधु व राजद्रोही आहेत कीं ते राजनिष्ठेचा दंभ माजवून शिवजयंतीचा धिक्कार करितात आणि आपल्याला वडवाबुळाच्या पदवीला पोंचवितात. भर्तृहरी अशा लोकांस अधम कोटींत गणतात. इंग्रजी शिक्षणानें आह्मांस समदृष्टी केलें आहे तेव्हां आह्मी शिवजयंतीचे भक्त बनलों किंवा आमचे कांहीं प्रजाबंधु अकबर जयंतीचे भक्त बनले तरी आह्मी राजनिष्ठेंत अहमहमिकेनें परस्परांस मागें सारूं अशी आमच्यांत धमक आहे ह्मणूनच आह्मी शिवजयंती व तशीच अकबरजयंती मोठ्या आल्हादानें सुशोभित करूं. लढाईला उभे राहिल्या बरोबर जसा प्रत्येकजण आपल्या कुलदेवतेचें स्मरण करितो तसेंच सर्व इंडियन लोकांनीं ब्रिटिश राज्याचा जयदुंदुभी चालला असतांना आपापल्या राष्ट्रीय महापुरुषाचें चिंतन करण्याला विसरूं नये. शिवजयंतीपासून ही गोष्ट लोक शिकतील तो दिवस आह्मी सुदीन समजूं.

---

आपल्या वऱ्हाड प्रांतांत रिव्हिजन सर्वे सन १८९१ सालापासून सुरूं झाली हें सर्वांना विदीत आहेच. तत्प्रीत्यर्थ एक स्वतंत्र खातें मोठ्या आमल्यासह सुरूं आहेच. प्रथम जेव्हां हें काम सुरूं झालें त्याच वेळीं आमच्या वऱ्हाड सार्वजनिक सभेनें दरठरेति कमी होण्यासाठीं बरेच परिश्रम केले व पुढें तोच मार्ग कायम ठेवावयाचा होता परंतु तो ठेविल्याचें दिसत नाहीं. कारण हल्लीं आह्मास एक संशय उत्पन्न झाला आहे तो असा कीं रिव्हीजन सर्वेची मुदत लोकांना सांगतांना तीस वर्षांची सांगतात परंतु त्या प्रमाणें ती मुदत सर्वच गांवांना सारखी मिळते किंवा नाहीं हें बरोबर कळत नाहीं. कित्येक तालुक्यांत कांहीं कांहीं गांवांना तीस वर्षांपेक्षां कमी मुदत दिल्याचें ऐकितो. ती देण्याचें कारण आह्मास असें वाटतें कीं पूर्वींच्या सर्वेची ज्या थोड्या गावची मुदत ३।४।६ वर्षांनीं भरल्याची असेल त्याच गांवाना ही मुदत तीस वर्षांची न मिळतां तालुक्यांतील सर्व गांवांची मुदत एकाच वर्षी संपावी असा हेतु दिसतो. असें केल्यानें त्या थोड्या गांवांना यंदा कदाचित् पुनः दर ठरोती वाढण्याचा प्रसंग आला तर तालुक्यांतील सर्व गांवा बरोबर वाढीचे दर अगोदर द्यावे लागतील. या साठीं आमची सार्वजनिक सभा पूर्वस्वरूप धारण करून आलेल्या संशयाचें निरसन करून वेग्याचें श्रेय घेईल तर फार चांगलें होईल. यंदा कदाचित् सार्वजनिक सभेस शिथिलता आली असेल तर तिची धाकटी नवीन झालेली बहिण जी "वतनदार लोकाची सभा" तिनें तरी हा कार्यभाग शेवटास नेण्याचा प्रयत्न करावा. नाहीं तर बाराभाईची खेती ह्मणून स्वस्थ बसूं नये.

---

अमेरिका व स्पेन या दोन देशांत लढाई सुरूं झाल्यामुळें युरोपांतील अन्य राष्ट्रांतही मोठी चळवळ उडाली आहे. आगळीक युनायटेड संस्थानवाल्याकडून झाली असल्यामुळें जर्मनी, फ्रान्स, रशिया वगैरे राष्ट्रें स्पेन देशाला अनुकूल आहेत. या राष्ट्रांनीं स्पेनचा पक्ष अद्याप उचललेला नाहीं तथापि त्यांचे कल स्पेनच्या तर्फेचे आहेत. इंग्लंडानें अगदीं त्रयस्थपणा पतकरला आहे. युनायटेड स्टेट वाल्यांनीं स्पेनच्या क्युबा बेटातील हावाना व माटानझा, हीं बंदरें हस्तगत करून घेतलीं. स्पेनचा पराभव मोठा झाला. स्पेनच्या ७ आगबोटी शत्रूंच्या हातीं लागल्या आहेत. पासिफिक मधील व्यापार बंद केल्याशिवाय स्पेनचा अमेरिकन लोकांवर जय होणार नाहीं. या लढाईमध्यें किती दुसरीं राष्ट्रें शिरतात आणि इंग्लंड कोणाशीं लढाई मारील हें अजून सांगवत नाहींत तथापि हें युद्ध फार मोठें होईल असा सुमार आहे. इंग्लिश सरकारानें सध्यां तटस्थपणाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे पण ही स्थिती किती काळपर्यंत चालेल याचा कांहींच नेम नाहीं.

---

हल्लींच्या साप्ताहिक इंडिया पत्रांत भरपूर खऱ्या माहितीनें भरलेले, हिंदुस्थानास होणाऱ्या अन्यायाचें सणसणीत पण पोक्त भाषेनें निर्भयपणें आविष्करण करून हिंदुस्थानच्या कल्याणाचे योग्य उपाय स्पष्टपणें सुचविणारे असे लेख दर आठवड्यात येत असतात. या वर्तमानपत्रानें या देशाची सेवा उत्कृष्ठ चालविली आहे, आणि तिची गोड फळें आपल्या राजकीय उन्नतीला, कालांतरानें कां होईना, परंतु निःसंशय लाभप्रद होतील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

कांहीं दिवसां पूर्वीं हिंदुस्थानासाठीं सैन्याचा पुरवठा इंग्लंडांतून करण्यानें हिंदुस्थानचे केवढें नुकसान होतें हें त्यांत स्पष्टपणें दाखविलें होतें. परवांच्या अंकांत इंग्लंडला हिंदुस्थानचे सैन्याची मदत किती वेळां मिळाली व त्यापासून हिंदुस्थानचें मात्र नुकसान कसें झालें वगैरे गोष्टीची माहिती दिली आहे. आजपर्यंत इंग्लंडासाठीं हिंदुस्थानचें सैन्य लहानमोठ्या १० मोहिमेवर गेलें न इंग्लंडसाठीं राजनिष्ठ हिंदुस्थानास खजिना खालीं करावा लागला व आपल्या हजारो शूर वीराचे बळी द्यावे लागले. परंतु त्या पासून हिंदुस्थानचा नफा थोडाच झाला असें ह्मटलें असतां अन्यथा होणार नाहीं.

१८६० सालीं न्यूझीलंडचे मोहिमेंत इंग्लंडच्या मदतीस गेलेल्या सैन्याचा साधारण नेहमीचा सगळा खर्च हिंदुस्थानावरच लादला होता. १८६१ च्या दुसऱ्या मोहिमेंत व १८८५ च्या सौडनच्या मोहिमेंत १८९६ च्या सुवाकीमच्या मोहिमेंत मदतीस गेलेल्या हिंदुस्थान सैन्याचा खर्च साधारण नेहमीचा (ह्मणजे हिंदुस्थानांत सैन्य राहिले असतांना लागणारा सगळा खर्च सैन्य हिंदुस्थानांत नसल्यानें हिंदुस्थानचे उपयोगी नसतांनाही) हिंदुस्थानासच द्यावा लागला. १८६७ चे अबिसिनियाचे स्वारींत हिंदुस्थानच्या १६ पलटणी पायदळ, ५ पलटणी घोडेस्वार, ७ इंजानियरच्या टोळ्या व मोठा तोफखाना इतकें सैन्य मदतीस नेलें होतें परंतु इंग्लंडनें विशेष फाजील खर्च मात्र आपले अंगावर घेतला होता; बाकी सगळा हिंदुस्थानावरच लादला होता. अफगाणिस्थानचे लढाईचा इंग्लंडनें काय तो ५०००,००० पौंड खर्च आपले अंगावर घेतला परतु हिंदुस्थानास १८०००००० पौंड द्यावे लागले. १८८२ च्या इजिप्तच्या मोहिमेंत इंग्लंडनें सारे ५००,००० पौंड दिले व हिंदुस्थानास नेहमीचे खर्चा शिवाय ८००,००० पौंड निराळे द्यावे लागले फक्त १८५९-६० चे चीनचे स्वारींत व १८७८ माल्टाचे मोहिमेंत मात्र इंग्लंडने खर्च आपल्या अंगावर घेतला. इंग्लडहून मोठीशी सैन्याची मदत ह्मणजे १८५७ सालचे बंडाचे वेळींच आलेली. परंतु एकंदरींत नियम हा कीं हिंदुस्थानास मदत लागल्यास इंग्लंडचे किनाऱ्यावरून पाय सुटल्या पासून परत तेथें पाऊल पडेपर्यंतचा सगळा खर्च हिंदुस्थानानें दिलाच पाहिजे परंतु इंग्लंडला मदत पाहिजे असल्यास ही हिंदुस्थाननेंच खर्च दिला पाहिजे. कांहीं वेळीं थोडीशी सूट पडल्यास सुदैव इतकेंच. या पासून इंग्लंडचा नफा हा कीं (१) ब्रिटिश सैन्याला शांततेचे प्रसंगीं हिंदुस्थान ह्मणजे कवायतीची शाळा बनते परंतु खर्च मात्र हिंदुस्थानचाच. (२) हिंदुस्थानांत नोकरी करणे असली ह्मणजे ज्यास्त पगार

मिळतो. ह्यामुळें इंग्लंडांतून सैन्याचा पुरवठा हिंदुस्थानास व्हावा ह्मणून जास्त खटपट होते. (३) इंग्लंडच्या राखून ठेवलेल्या फौजेस हिंदुस्थानचे खर्चानें हिंदुस्थानांत आयतेंच शिक्षण मिळतें. ( ४ ) व हिंदुस्थानचें सैन्य इंग्लंडच्या मदतीस गेलें असतां त्याचा खर्च इंग्लंडास थोडाच द्यावा लागतो.

आतां हिंदुस्थानचा नफा [?] काय तो पाहूं (!) हिंदुस्थानचे सैन्यापैकीं तिसरा हिस्सा सैन्य इंग्लंडहून येतें व त्या बद्दल हिंदुस्थानांत जबरदस्त खर्च पडतो ( २ ) जर इंग्लंडहून निवाऱ्या पासून परत जाईपर्यंतचा प्रत्येक बाबीचा सर्व खर्च हिंदुस्थान देण्यास तयार असेल तर मात्र ब्रिटिश फौज हिंदुस्थानच्या उपयोगी पडेल!

लार्ड लान्सडोन व लार्ड राबर्ट यांच्या अमदानींत हिंदुस्थान सरकारच्या ( २९ मार्च १८९० ) खलित्यांत स्पष्ट असें लिहिलें आहे. " हिंदुस्थानच्या सीमे बाहेर बादशाही कामगिरीवर लावलेल्या सैन्याचा खर्च व ह्या देशांत जरूर नाहीं इतक्या जय्यत तयारींत ठेवण्यासाठीं हिंदुस्थानच्या फौजेंत ज्या निरनिराळ्या व्यवस्था केल्या त्याचा सर्व खर्च हिंदुस्थानचे उत्पन्नावर लादला आहे. लक्षावधी रुपये फौज व आरमारें वाढविण्यांत व किल्ले तयारींत ठेवण्यांत खर्च केले. परंतु हें सर्व हिंदुस्थानांतच उत्पन्न होणाऱ्या शत्रूंशीं अगर आसपाच्या दंगेखोर लोकांशीं टक्कर देण्यासाठीं नव्हे तर प्राच्य देशांत ब्रिटिशराज्याचें वर्चस्व स्थापन करण्यासाठीं होय. ह्या मोठमोठ्या खर्चांचा ( क्रेटा, चित्राळ, शि ा वगैरे प्रकरणें ) संबंध हिंदुस्थानचे सिमे पासून फार दूर आहे व ज्या राजकारस्थानामुळें ह्या बाबी उद्भवल्या तीं कारस्थानें सरकारची नसून व दशाही होत. " हे शद्ब एखाद्या कान्ग्रेसवाल्याचे किंवा राजद्रोही माणसाचे नाहींत हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

---

The Berar Samachar

MONDAY, MAY 2 1898.

---

The money-lending business in India is of the worst type. We condemn the usury rampant at present because it turns to the best uses the weaknesses and difficulties of the people. The business does not provide for the out-lay of the national capital on works of public utility or in manufacture or commerce which really augment the resources of the country. In spite of the terrible poverty of the general masses, the treasures in India lie uselessly in the hands of money—lenders as a class. They trample upon necessities of the borrowing people and find a suitable market for their idle capital in the wants of men who are gradually sinking in material prosperity. The borrowers of the last quarter of the century have added a large influx of their countrymen from the higher ranks of the society. There is a slow and fatal process of undermining the staying power of the Indian society. The old standard of comfort is no doubt changed but the new one is more of luxury, sloth and pleasure while the means of the growing population are crippled from day to day to the lowest minimum margin of starvation. The mania is that people try to look better than what they are. The agriculture which is the main occupation does not secure a competency of living on the new scale. The government service is over-crowded and is not as attractive and remunerative as in the old days of the English advent in India. There is besides an increasing fall in the material prosperity of the nation. Wealth is being drained off to enrich the ruling people. The Indians have learnt to appreciate the higher standard of living which the Western civilization has introduced but they have lost, in the inverse proportion, their capacities of earning wealth. With India, the people are on the whole, wealth—spending and never wealth—producing. This nation is just like a rich customer to the world at large. A cistern must be one day empty when the water—carrying pipes are more powerful in number and strength than those pipes that fill up the cistern. The nation has similarly reached a stage when it cannot afford to pay off its way of living on either the old scale of a miser's economy or on the highly expensive one of the present century. The member of borrowers is increasing in a proportion which no arithmetical rule can well calculate. To borrow money or to live beyond one's means has becomes the fashion of the day. The money-lenders have been taught the risks of the new contingencies of life. They are not the favourites of the Civil Courts of justice. Legislation is moving fast to strengthen the hands of civil judges against the contracts of the money—lending Shylocks. Legislative measures will however fall short of the real necessity of the people. Let people first learn the necessity of self-help. The self-help should be of a heroic character. 'Better die than borrow' should be the motto of the day. This will ensure real economy. The second step should be to develop the resources of the nation. The last is but the corollary of the first but it is the most critical turning pivot in the history of the nation. The British rule has made of us a negative example to illustrate to the rest of the world that the material prosperity makes what a nation ought to be. We have learnt what we have not got and the English peoples tell us how to obtain wealth. In short, we must be wealth—producing people and unless and until we do so the usury of the worst type will remain in a full swing to make misery of the masses more miserable. The real remedy lies in utilizing the capital of the nation to augment its material wealth; and when this new opening promises a sure and certain income the capital will never be available for the business of money—lenders.

---

To bring down the over-growth of centralization with a view to give some sort of independence to the actions of the lower officers, two valuable suggestions are proposed for general acceptance. Unless and until this top—heaviness or excessive pressure from above is removed substantial improvement cannot be effected in the general administration. We are all aware of the extent to which tension is exercised against the local governments in the point of finances. The Imperial Government have hampered the prospects of utilizing the revenue upon works of public usefulness. Two things are urgently required—the abolition of under—secretaries and the education of the central office establishment. In advocating the soundness of these proposals the Pioneer has gone to the length of giving a full, free and independent sphere of action to officers of position of Commissioners. We know as a matter of fact that they do occupy in uncontrollable and enviable position in all matters except the revenue branch The alotment of provincial funds for imperial purposes rests with the Vice—regal Oouncil. The channel of official work is already established and the Pioneer need not be afraid of natives obtaining an interview with the superior Government as against the Commissioners. There is already no such opening avaiable for going direct to the fountain. The Pioneer wants to make a third proposal also. It can be well expressed in the very words of the editor:—

"Another necessary reform is the substitution of quinquennial for annual reports: statistics should no doubt be annually compiled; but no generalisations should be allowed upon them. For experience has shown that hasty and mischievous action has too often been the result of crude and sweeping assertions; and the spectacle—which would be ridiculous if it were not not dangerous—is still not infrequently witnessed of judgment being passed, in India or in England, on new measures within a year or two of their inception and long before they have been really established. With the statistics of five years as a guide the dangers of generalisation would be much less than they are now."

We admit the growth of centralisation but we have not yet concluded to endorse the three methods of the Pioneer for remedying the gsivances of overcentralisation.

---

## वऱ्हाड

हवामान—उन्हाळा अती प्रखर आहे. पारा ११३ अंशावर चढतो. हर्वेत थंडपणा रात्री देखील वाटत नाहीं आणि उन्हाळ्या झळा सारख्या चालतात. पाण्याच्या कमताईमुळें लोकांचे मोठे हाल होतात. लग्न मौंजींची गर्दी यंदा फार आहे.

बोडखे गांवीं पडलेल्या डाक्याची चौकशी चौदापंधरा महिन्यानंतर गेल्या सेशनांत झाली आणि सर्व आरोपी दोषमुक्त झाले. आरोपींस विनाकारण १४ महिनें बंदिवास सोसावा लागला!

कपलेश्वर येथील लुंड्या नांवाच्या एका १७।१८ वर्षाच्या धनगरावर एका घोडीशा सृष्टीविरुद्ध कर्म केल्या बद्दल खटला येथील जिल्हा माजिस्ट्रेटांच्या समोर चालू आहे.

मनात्री येथील डाक्याची चौकशी पोलिस अधिकाऱ्यांनीं इतक्या कसोशीनें केली कीं एका माणसानें जीव दिला किंवा त्याचा जीव गेल्यावर त्याची बांधाबांधी आत्महत्या केल्या प्रमाणें करण्यांत आली; आणि जबरी संभोगाचा ही प्रयोग अगदीं निंद्य प्रकारचा घडला. या प्रकरणांत मुनशी अजिजुद्दीन यांनीं मोठ्या बहादरीची चौकशी केली असून पोलिस सुपरिन्टेंडेंट मि. ग्यालोव हे ही फार बारकाईचा शोध करीत आहेत. या संबंधांतले पोलिस इनस्पेक्टर वगैरे मंडळी सध्यां सस्पेंड आहे.

---

## आकोला बाजारभाव

| | | दर खंडीस |
|---|---|---|
| आळशी | | ७८ रुपये |
| जवारी | ३८ पासून | ४२॥ रु० |
| गहूं ( बनशी ) | | १०७॥ रु० |
| चणे | | ६६। रु० |
| तेल | | ४ रु० मण |
| तूप | | ९ मण |
| मीठ | | ३॥= मण |
| सोनें | | २९ तोळा |
| चांदी | | ७३ |
| कपाशी | | ३९ |
| रुई | | ४३ |

---

### नोटीस

रा. रा. ज्योतीलिंग जंगम राहणार पिंपळगांवकाळे तालुके जळगाव जिल्हा आकोला यास नोटीस देणार दगडी मर्द ज्योतीलिंग राहणार बाळापूर इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून आज अजमासे बारा वर्षे झाहली लग्न झाल्यापासून ह्यावेळ पर्यंत तुह्मी मजला आपले जवळ नेले नाहीं मी आपले माय बापाऱ्या घरी होते. ह्यावेळ पर्यंत अजमासे रुपये ४०० कर्ज काढून झाले आता मजला कर्ज मिळत नाहीं मी उपाशी मरत आहे- व माझे हें दिवस ऐन संसार करण्याचे असून फुकट जात आहेत. तुमच्या शरीरव्याधी मुळें मजला तुह्मी घेऊन जात नाहीं हें उघड आहे परंतु माझी सर्व जवानी व्यर्थ जात आहे याजकरितां तुह्मास नोटिसीनें कळवितें कीं नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसांत सदरील कर्ज रुपये ४०० व पुढें पोटगी बद्दल योग्य बंदोबस्त करून चार जातभाई पंचाची खात्री अशी करून द्यावी कीं तुह्मी सर्व सर्व प्रकारानें मजला घेऊन घरसंसार करण्याच्या विचारांत आहा कोणचीही हरकत नाहीं वगैरे सर्व प्रकारानें पंधरा दिवसांत खात्री पंचाची व माझी ही करून द्यावी. पंचानी सांगितल्यावर व सदरील ज्या ज्या बाबी कळविल्या आहेत त्याचा बंदोबस्त करावा ह्मणजे मी आपले कडेस येण्यास तयार आहे. असे झाले नाहीं तर चार जातभाई पंचाच्या सल्ल्यानें दुसरा घरठाव करीन मग कोणच्याहि प्रकारचा नवरेपणाचा हक्क मजवर तुमचा नाहीं हे तुह्मास ह्या नोटिशिनें अगोदर कळविले आहे. ह्मणून दिली नोटीस सही तारीख १।५।९८ इसवी.

सही
सहीची निशाणी बांगडी दगडी
मर्द ज्योतीलिंग जंगमीण
इच्या हातची असे.

---

## वर्तमानसार

"छिद्रेष्वनार्थो बहुली भवन्ति"

एकदा दुर्दैव हात धुऊन पाठीस लागलें ह्मणजे चारही बाजूंनीं संकटें कशीं कोसळतात, याचें उदाहरण हल्लीं चीन देशावरून चांगलें दृष्टोत्पत्तीस येईल. शिकारींत चीत झालेल्या सावजाच्या वांटण्याविषयीं किरात मंडळींत जसा कलह उत्पन्न होतो, त्याप्रमाणें नुकतेंच जपानच्या लढाईंत पराजित झालेल्या चीन देशाच्या विल्हेवाटीबद्दल पाश्चिमात्य राष्ट्रांत चर्चा सुरू आहे. तोंच खुद्द राजवाड्यांत तेथील राजाधिराजास पदच्युत करून राज्यक्रांती करण्याचा गुप्त कट झाल्याची बातमी बाहेर आली आहे. असें ह्मणतात कीं, या कटांत बरीच बडी बडी मंडळी सामील आहे. "विनाशकाले विपरीत बुद्धिः" दुसरें काय ह्मणावें?

बंगाल्यांत जें मीठ खपतें तें बहुतेक जर्मनींतून येतें. पंजाबांत मिठाच्या खाणी आहेत, तिकडून बंगाल्यांत मीठ आणलें असतां रेल्वे खर्चामुळें तें बरेंच महाग पडतें. पण त्याच मिठाला जर्मनींतून जहाजानें आणण्याला खर्च कमी पडतो. या कारणामुळें बंगालप्रांतांतील व्यापारी पंजाबचें मीठ न मागवतां जर्मन मीठ खरेदी करितात! मद्रासकडेही मिठाचें उत्पन्न पुष्कळ आहे; पण ईस्ट कोस्ट रेल्वे पुरी होऊन ईस्ट इंडिया रेल्वेला मिळाली नसल्यामुळें तिकडील मीठ बंगाल्यांत येत नाहीं. त्या दोन रेल्वे एकत्र मिळाल्यावर मद्रासेहून रेल्वेनें मीठ बंगाल्यांत नेण्यास तें जर्मनीहून आणण्यापेक्षां खर्च कमी लागत असल्यानें, पुढें जर्मन मीठ बंद होऊन मद्रासेकडील मिठाचा जास्त खप होईल असें दिसतें.

स्पेन व अमेरिका–यांमध्यें आतां लवकरच रणसंग्राम सुरू होईल असें ह्या आठवड्यांत आलेल्या तिकडील तारांवरून कळतें. क्यूबाला स्वतंत्रता द्यावी इतक्याच संबंधानें अमेरिकेचें ह्मणणें आहे, व त्यांनीं आपल्या शर्तीही स्पेनला कळविल्या आहेत; परंतु स्पेन तिकडे लक्ष पुरवीत नसल्यामुळें लढाई शिवाय आतां अन्य मार्ग नाहीं असें अमेरिकेस वाटूं लागलें; व त्यांनीं लढाईची सर्व तयारी चालविली आहे. स्पेनच्या माथ्यांतील दुराग्रह जात नाहीं यावरून बुडत्याचे पाय डोहाकडे याप्रमाणेंच स्पेनची स्थिति होणार असें दिसतें. क्यूबांतील लोकांच्या स्वतंत्रते करितां झटणाऱ्या युनायटेड स्टेटला या लढाईंत परमेश्वर विजयी करील यांत कांहीं संशय नाहीं.

सुदानचा बंडखोर खलिफा महमद याजवर सरदार कीशनगर यांजबरोबर सैन्य देऊन पाठविलें होतें. त्या सैन्यानें गेल्या आठवड्यांत फत्तेह करून अमीर महमुदचा किल्ला हस्तगत करून घेतला. बंडखोरांनीं किल्ल्याचें संरक्षण करण्या करितां ब्रिटिश लष्कराशीं फारच निकरानें लढाई केली. पण त्यांस यश न येतां, त्यांचे ३००० लोक मारले जाऊन अमीर महमद सुद्धां पकडला गेला. ब्रिटिश लष्करापैकीं २ अंमलदार ठार झाले व १४ जखमी झाले; आणि १० शिपाई मेले गेले व ९० जखमी झाले. इजिप्शियन लष्करापैकीं ६१ मनुष्यें मारलीं गेलीं, व १४ अंमलदार आणि ३१९ मनुष्यें घायाळ झालीं. ही लढाई आटोपली तेव्हां अमिराचे दोन हजार लोक किल्ल्यांत मेलेले सांपडले. आजूबाजूच्या खांचा नाले वगैरे प्रेतांनीं तुडुंब भरले होते. उत्तर डिगना तर लढाईच्या सुरुवातीसच पळून गेला होता. अशा मर्दांनीं विजय मिळवून सरदार किशनगर परत फिरले, आणि राणीसरकारांनीं त्यांस आभारपूर्वक पत्रें पाठवून मनापासून अभिनंदन केलें. या विजयश्री बद्दल आह्मी सुद्धां सरदारबहादराचें अभिनंदन करतों.

भैथा नांवाचें सबंध शहर आगीनें जळून भस्म झालें असें रंगूनच्या ता. २० चे तारे वरून समजतें.

बलरामपूर स्टेशनानजीकच्या विसनापूर नामक गांवांत आग लागून अर्धा गांव जळाला त्यांत एक दोन माणसें गतप्राण झालीं ह्मणतात.

निजाम हैद्राबादेस अतिशय तुफान होऊन, कित्येक तासपर्यंत जोराची वृष्टी होत होती गाराही सपाटून पडल्याचें कळतें.

अफ्रीदी लोकांचा पेहेराव करून कित्येक मुसलमान गेल्या दोन तीन महिन्यापासून रावळपिंडी कडील भागांत लुटालूट करीत आहेत. स. वि.

पंजाबांत ६३ गांवांत प्लेग झाली आहे, व त्यामुळें २००० लोक लागले व १२०० वर मृत्यूपावले.

एका चिनी प्रवाशानें यूरोपांतून स्वदेशीं एक पत्र पाठविलें त्याचा सारांश येणेंप्रमाणें आहे. "येथील लोक आठवड्याच्या आठवडे तांदळावांचून काढतात. व मोठ्या दुष्टपणें बैलांची कत्तल करून त्यांच्या घाणेरड्या मासाचा फन्ना पाडतात. त्याबद्दल त्यांना कोणत्याही प्रकारचा खेद होत नाहीं. रोज रोज आपल्या अंगाची घाण घालविण्यासाठीं अंघोळ करितात ते तरी याच साठीं. तरी पण यांच्या अंगाची कुजक्या मांसाची घाण निवत नाहीं ती नाहींच. जेवणास बांबूच्या कांड्या न घेतां तीक्ष्ण शस्त्रांचा उपयोग करितात. त्यामुळें हे जेऊं लागले ह्मणजे असें भय पडतें कीं यांचीं बडीं सपाटीं नाकें कापतील; किंवा याचे डोळे फुटतील. यांना जेवतांना पाहून एकाद्या गारोड्याच्या हातचलाखीचा खेळ पाहण्यास आपण बसलों आहों असेंच वाटूं लागतें. लोकांस आपण कसें दिसतों हें ज्याचें त्याला समजूं लागलें तर काय होईल?

सोलापूर येथील पोलिस हेडक्वार्टरचे चीफ कान्स्टेबल हे एका चांभारास कांहीं अभद्र शब्द बोलल्या वरून त्या चांभारानें क्रोधावेश होऊन हातांतील रापी चीफ कान्स्टेबलांचे पोटांत खुपसली! चांभारास कैद केला असून कोतवालांस दवाखान्यांत उपचार चालले आहेत.

थोडे दिवसांपूर्वीं गोव्याचे गव्हरनर जनरलानें श्री शंकराचार्य स्वामी मठ संकेश्वर यांस आमंत्रण देऊन पंजीस आणिलें. स्वामी आले त्या दिवशीं त्यांस सामोरें जाण्यास व त्यांच्या बरोबर मिरविण्यास कौन्सिलरसह लष्करी लोक आले होते. स्वामीची पालखी राजवाड्या समोर आली तेव्हां गव्हरनर जनरल साहेबांनीं जसा आपल्या बिशपास मान देतात तसा टोपी काढून, गुडघे टेंकून आणि हात जोडून मान दिला. गव्हरनर जनरल साहेबांनीं निमंत्रणाचा हेतु दर्शवितांना असें सांगितलें कीं, सर्व वर्णांनीं आपापल्या वर्णा श्रमधर्मानें चालून इह परलोक सुख भोगावें अशी योजना व्हावी यावर स्वामीनीं आशीर्वादपूर्वक सांगितलें कीं, राजाश्रय जर उत्तम प्रकारें मिळेल तर स्वधर्मतत्वें आणि नीतितत्वें यांचा प्रसार करून राजा व प्रजा यांचे ऐक्य ठेवणें हें या मठाचें काम आहे तें त्याप्रमाणें होईल. दोनतीन वेळ भेटी गांठी झाल्या व गव्हरनर जनरल साहेबांनीं एक रत्नजडित मुकुट आणि अभिषेक करण्या करतां सुवर्णाचें सुंदर काम केलेलें गव्याचें शिंग स्वामीस अर्पण केलें. स०

ज्यूनियर ऑक्सफोर्ड लोकल एक्झामिनेशनमध्यें एक सोळा वर्षांचा हेनरी डॅगिट या नांवाचा आंधळा विद्यार्थी नुकताच पास झालेला आहे तो अगदीं जन्मांध आहे परीक्षेला विषय गणित, व्याकरण, इतिहास व शेक्सपिअरच्या नाटकांपैकीं ज्युलियस सीझर असून त्याशिवाय जर्मन होतं. त्याला सगळ्या विषयांत अगदीं पहिल्यानंबरचे गुण मिळाले हा जन्मांध मुलगा इतक्या बिकट विषयांत पास झाला हें पाहून पुष्कळ डोळस विद्यार्थ्यांस व दुसऱ्या मोठामोठ्या लोकांस पराकाष्टेचा अचंबा वाटला. त्याच्या शिक्षकांचें नांव मिस् थॉर्नी हें होतें. त्या बाईसही त्याच्या अंगच्या अलौकिक बुद्धि विषयीं मोठें कौतुक वाटलें. व यःकश्चित् आंधळ्या मुलाच्या हातून आपलें नांव इतकें पुढें आलें व आपली त्यानें चहूंकडे कीर्ति केली याबद्दल तिला मोठें धन्य वाटलें.

उत्तर अमेरिकेंत बोस्टन शहरीं एक मोठे श्रीमंत गृहस्थ आपल्या बायकोसह सतरंज्याचा कारखाना पाहण्यास गेले. कारखान्यांत ते गेल्याबरोबर त्या कारखान्याच्या म्यानेजरनें त्यांच्याबरोबर एक शिपाई देऊन त्या दंपत्यास ती कारखान्याची सर्व इमारत दाखविली. इमारत मोठी भव्य व पाहण्यासारखी होती. दुसऱ्या मजल्यावर एक भला मोठा हॉल असून त्याच्या दाराला कुलुप लावून त्यावर "आंत जाण्यास परवानगी नाहीं." अशीं अक्षरे लिहिलेलीं होतीं. तेव्हां अर्थातच त्या श्रीमंत गृहस्थाच्या बायकोस आंत काय हें पाहण्याची मोठी इच्छा झाली आणि ह्मणाली "आंत असें न पाहण्यासारखें काय आहे?" त्यावर तो शिपाई ह्मणाला, "आंत कांहींच चमत्कारिक वस्तु नाहींत. आंत बायका सतरंज्या विणीत आहेत. त्यांचें लक्ष दुसरीकडे जाऊं नये. व वेळही फुकट जाऊ नये ह्मणून ही व्यवस्था केलेली आहे. आंत एकंदर दीडशे बायको आहे. कोणी कारखाना पहायला आलं ह्मणजे त्य उगीच इकडे तिकडे पहात बसतात. आणि मग त्यांच्या हातून काम कमी होतें. प्रत्येकीनें जर नुसतीं दोन मिनिटें इकडे तिकडे घालविली तर दीडशे बायकांचीं तीनशे मिनिटें फुकट कांहींएक काम न करितां वाया गेलीं असें समजा. ह्मणजे पांच तास व्यर्थ गेले. असे जर पांच तास रोज फुकट जाऊं लागले, तर कारखान्याचें किती तरी नुकसान होणार आहे. कारण आपल्याप्रमाणें रोज कोणी ना कोणी तरी आमचा कारखाना पाहण्यास येतो. मग आह्मी खावें काय आह्मांला पैसा कोठून द्यावा पडणार. यजमानाला नफा झाला तर आह्मांला पगार. आणि तुह्मांला मी खचित सांगतों व्यापाराच्या कामांत वेळ हाच पैसा आहे." हें त्या शिपायाचें भाषण ऐकून ते सभ्य गृहस्थ मुकाट्यानें खालीं उतरले. क०

धर्मार्थ विवाह—सोलापुरचे सुप्रसिद्ध, लोकप्रिय आणि उदारचरित नगरशेट श्रीयुत मल्लाप्पाअण्णा ऊर्फ अप्पासाहेब वारद यांचे कन्येचा विवाह येत्या वैशाख शुद्ध ११ रोजीं होण्याचा ठरला असून, ह्या आपल्या कन्याविवाहप्रसंगीं त्यांनीं आपल्या ज्ञातीच्या (वीरशैवांच्या– लिंगाईतांच्या) जितक्या विवाहाई कन्या असून त्यांचे विवाह घरच्या गरीबीमुळें होण्यास कठीण पडत असेल त्या सर्व कन्यांचे विवाह आपल्या खर्चानें करण्याची आपली तयारी आहे, असें त्यांनीं जाहीर केलें आहे. मागें त्यांनीं आपली कै. वा. प्रिय कन्या श्रीमती संगवाबाई इचा विवाह मोठ्या थाटानें केला; त्या वेळींही अशींच धर्मार्थ १०८ लग्नें केलीं असून, खुद्द त्यांच्या द्वितीय विवाहप्रसंगीं त्यांणीं अशींच १३ धर्मार्थ लग्नें केलीं होतीं. श्री. अप्पासाहेब वारद यांची उदारता आणि धर्मबुद्धि वाखाणणी करण्यासारखी असून, त्यांचे आपल्या ज्ञातीच्या उन्नतीकडे व सुस्थितीकडे विशेष लक्ष्य आहे हें त्या ज्ञातीचें मोठें भाग्य होय ज्ञातीमध्यें अशीं श्रीमंत माणसें असून ज्ञात्युन्नती कडे लक्ष्य असणें हें ज्ञातीचें महाभाग्यच ह्मणूं नये तर काय ह्मणावें?

कराचीस प्लेग वाढत्या प्रमाणावर आहे. तथापि लोक बांहेर जाऊन राहात असल्यामुळें, तो विशेष वाढून मनुष्यहानि करील असें वाटत नाहीं.

सिंहाचा पाहरा—मोरोक्कोच्या सुलतानाचे जवळ सात पाळीव सिंह असून रात्रीच्या वेळीं हे सिंह त्याचे वाड्याचे भोंवतीं मोकळे सोडलेले असतात. त्याचें कारण सुलतानाच्या जनानखान्यांत कोणीं चोरून जाऊं येऊं नये. राजवाड्या भोंवतीं त्या सिंहांचा हा पाहराच असतो ह्मणाना.

कागदी देऊळ—नॉर्वेदेशांत बर्जेन नांवाचें शहरांत एक कागदी देऊळ आहे. ह्या देवळांत एक हजार एकशे (११००) लोक बसतील येवढें तें विस्तृत आहे. ह्या देवळाला भिंती, माळ्या, आढें, छप्पर, खिडक्या, दारें, कोनाडे वगैरे सर्व कागदाचे बनवले असून, तें देऊळ जलाग्निदाहप्रतिबंधक आणि मजबूत बनवलें आहे.

कलकत्यास प्लेगची स्वारी गेली असून तेथें मोठा हलकल्लोळ उडाला आहे! काय होईल तें होवो!

पार्लमेंटसभेस अर्ज—"आपला भ्रतार आणि दीर यांस सरकारकारानें अटकेंत ठेवून आह्मास दुःखांत ठेवलें आहे; कांहींच दाद मिळत नाहीं तर ह्याबद्दल विचार व्हावा;" अशा मजकुराचा एक अर्ज पार्लमेंटाकडे श्री० बाळासाहेब नातूंची पत्नी श्री० सौ० लक्ष्मीबाई यांणीं गेल्या डांकेच्या आगबोटींतून पाठविला असल्याचें कळतें. ह्या बाईच्या अर्जास तरी राणीसरकारच्या राज्यांत निष्पक्षपाती पार्लमेंटकडून दाद मिळून यश येवो. इतर सर्व प्रयत्न व्यर्थ झाले आहेत!

ज्ञा० च०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

सालि अखर " ७ " .
किरकोळ अंकास ......................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

Six monthly........ 3 ............... 8 as
Single copy ..............................4 as
Advertisemen
Below 10 lines ......2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII — AKOLA MONDAY 9 MAY 1898 — NO 18

वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख ९ माहे मे सन १८९८ इ० — अंक १८

### नोटीस

रा. रा. चिनकाजी वा पुंजाजी माळी राहणार कान्हेरी तालुका अकोले यास नोटीस देणार जानु व तानु वा सोनाजी पाळी राहणार अकोले नोटिसीनें असें कळवितो कीं गेल्या दुष्काळांत तुह्मी आह्मापासून जवारी खंडी पांच अकोल्याची दिढीनें सुगीवर देण्याच्या करारानें घेऊन गेला परंतु ह्या वेळपर्यंत तुह्मी जवारी आह्मांस परत केली नाहीं. ज्या वेळीं जवारी तुह्मास तुमचे मागण्या वरून दिली त्यावेळीं दिवस कठीण होते व तुह्मी आमचे बापाच्या बहिणीचे यजमान ( नवरा ) व भली माणसे आहात अशा अनेक कारणें व वेळ पाहून तुह्मांस जवारी दिली. व त्याजबद्दल कागदपत्र वगैरे कांहीं करून घेतले नाहीं. कारण तुह्मी आमचे व चांगलीं भलीं माणसें आहा ह्मणून मागितल्या बरोबर तोंडीं मागण्यावर जवारी दिली. परंतु ह्या वेळपर्यंत परत केली नाहीं तर नोटिशीनें असें कळवितों कीं नोटीस पावल्यावर पंधरा दिवसांत आमची जवारी मुळखंडी पांच व त्याची दिढी ह्मणजे खंडी साडेसात आणून देऊन निकाल करावा असें झालें नाहींतर ह्या वेळीं बाजारांत जवारीचा दर खंडीस जो भाव आहे त्या प्रमाणें भाव साडेसात खंडीस लावून तुह्मांवर फिर्याद करून खर्चा सुद्धां अखेर निकाल होईपर्यंत नुकसान व ह्या नोटिसीचा खर्च असे सर्व भरून घेतलें जाईल हें तुह्मास कळावें ह्मणून दिली नोटीस. ता० ३ माहे मे सन १८९८ इसवी.

( सही )

सहीची निशाणी वखर जानु व तानु वा सोनाजी माळी राहणार अकोले यांच्या हातची असे.

---

### नोटीस

रा. रा. लालचंद ओंकारदास साहू दुकान आकोट यांस.

या लेखानें कळविण्यांत येतें कीं मयत रमाबाई मर्द मल्हारी वंजारी इनें तुमच्या दुकानावर खालील वर्णनाची अमानत ठेविली:—

| | |
|---|---|
| रोख नगदी रुपये | १००० |
| सोनें व चांदी यांचे दागिने किंमत रुपये | १८४ |
| एकूण रुपये | ११८४ |

ही अमानत वसूल करण्याविषयींच्या हक्काचें सरटिफिकीट विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब बहादूर सिव्हील जज आकोला कोर्टानें दिवाणी क्लास १९ मिसल नंबर १८९४ मध्यें तारीख २४।२।९४ रोजीं माझ्या नांवानें दिलें आहे.

सदर्हू सरटीफिकीटाअन्वयें मला वरील अमानत परत पाहिजे तर आपण नोटीस पोचल्या तारखे पासून ८ दिवसांच्या आंत सदर्हू अमानत पोचती करावी. तसें न केल्यास रीती प्रमाणें दिवाणींत फिर्याद करून अमानत वसूल करण्यांत येईल आणि सर्व खर्च व इतर नुकसानी तुह्माकडून कोर्टा मार्फत भरून घेतली जाईल. कळावें. तारीख ३ मे १८९८ इ.

सही

बलवंता वल्लद हनवंता वंजारी
राहणार सावरगांव तालुके
आकोट निशाणी
वखर.

---

### नोटीस.

रा० रा० केशव बापुजी राजंदेकर राहणार राजंद. यांस

नोटीस देणार रामकृष्णा वल्लद रामजी व रामजी वल्लद सखाराम सोनार राहणार राजंद नोटिसीनें असें कळवितो कीं तुह्मी तारीख ११ माहे एप्रील सन १८९८ इसवीच्या शुद्धवऱ्हाडी वर्तमानपत्रांतून आह्मास नोटीस दिली ती पावली. नोटीसींतला मजकूर सर्व समजला तुह्मास असें कळवितो कीं मौजे राजंद येथील शेत सर्वेई नंबर २३२ एकंदर २३ गुंठे ८ एकर आकार रुपये ३८ यांतील तुमचा ८४८७ चार आणे सात पाईचा हिस्सा तुह्मी आह्मास विकत देऊन त्याचें किंमतीबद्दलचे रुपये १९० दिडशे पौष शुद्ध १९ पौर्णीमा पावेतों आह्मी तुह्मास द्यावे असे ठरले त्या प्रमाणें कायदेशीर सदर्हू शेतातील ८४८७ चार आणे सात पैचा हिस्सा आमच्या नांवें ह्या वेळपर्यंत तुह्मी करून दिला नाहीं याजबद्दल आमचें जें नुकसान होईल तें तुह्मास भरून द्यावे लागेल शेतातील ८४८७ चार आणे सात पैचा हिस्सा कायदेशीर व रीतशीर आमच्या नांवानें करून दिल्याशिवाय व आमच माल आमचे पदरांत पडल्याशिवाय आह्मी रुपये तरी कसे द्यावे तुह्मी नोटिसीमध्यें सदर्हू रुपयाचे व्याज घेऊं, नुकसान घेऊं वगैरे गोष्टी आह्मास कळवितां याजबद्दल मोठें नवल वाटतें. तुमचा ठरलेला सवदा आमचा आमचे पदरांत घालून घालावा व आपले रुपये चुकते घ्यावे. तुमचे रुपये तयार आहेत व सवदा ठरले बद्दल २ दोन रुपये विसार दिला आहे. असा सर्व प्रकार असून पुढें मागें तुह्मी फिर्याद वगैरे कराल तर त्याजबद्दलचे कोणच्याही प्रकारचे जबाबदार आह्मी नाहीं. हें तुह्मास ह्या नोटिसीनें कळावें. ह्मणून दिली नोटीस सही. तारीख ९ माहे मे सन १८९८ इसवी.

सही

रामकृष्णा वल्लद रामजी सोनार
राहणार राजंद दस्तुर खुद्द.
रामजी वल्लद सखाराम सोनार
राहणार राजंद दस्तुर खुद्द.

---

## गोरक्षण कीं कन्यारक्षण?

स्त्रियांस ऊर्जित अवस्था प्राप्त व्हावी अशी इच्छा असेल तर त्यांस शिक्षण देण्याचे कामींच सर्व प्रयत्न खर्च केले पाहिजेत. इतका महत्वाचा दुसरा उपायच नाहीं. त्यांच्या हिताची ह्मणून जीं जीं कामें करावयास जावें त्यास अज्ञानामुळें प्रथम त्यांचाच अडथळा येतो. ह्मणून पहिल्यानें ज्ञानाचें किरण हळूच त्यांच्या मनावर सोडून दिलें पाहिजे.

जशी जनावरांची व्यवस्था खाटिक लावून टाकितो, किंवा मालाची व्यवस्था कोणी मनुष्य आपल्या मर्जी प्रमाणें करितो तशीच स्त्रियांची वासलात लावण्याचा आपणास पूर्ण अधिकार आहे असें प्रत्येक इंडियन मानीत आहे. आणि विशेषें करून खाटिक बकरीवर आपला पूर्ण अधिकार गाजवितो तसा बाप आपल्या कन्येवर गाजवितो. अरेरे याच्यापेक्षां खाटिक बरा.

या देशांत स्त्री शिक्षणा करितां शाळांची स्थापना, व स्त्रियांचे उन्नती करितां चालू असलेले प्रयत्न आणि स्त्रीस्वातंत्र्याची कल्पना, ह्या सर्व अश्रुत पूर्व गोष्टी होत. आणि हें पाश्चिमात्यांचें उदार पद्धतीचें फल होय असें प्राजळ मनानें कबूल केलें पाहिजे. प्राचीन ग्रंथ गुंडाळून व एखादें उदाहरण पुढें करून आमचे पूर्वज असेंच करीत होते. असा कोटिक्रम प्रत्येक बाबतींत लढविणें आह्मास बिलकूल पसंत नाहीं. सत्यमार्गाचा एकदम स्वीकार केल्यानें आपणास व दुसऱ्यास अनुपम समाधान मिळतें. पण कोणी कोणी हट्टानें आडमार्गांत शिरतात. स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, हे सामासिक शब्द जुन्या कोशांत सांपडणार नाहींत हें आह्मास ठाऊक आहे. असो. लग्नाचे कामांत वधुवराची संमति घेणें या गोष्टीची केवढी बरें अवश्यकता आहे? पण वधू विषयीं ह्मटलें तर आमच्या लोकांत या गोष्टीचा सांप्रत कांहीं उपयोग आहे काय? अशिक्षित व अल्पवयस्क पोरीच्या गळ्यास दावें लावून तिचा बाप जिकडे तिला खेंचून नेईल तिकडे जाणें तिला प्राप्त आहे. जोशी, उपाध्याय, यांचें काय? दोघांची गांठ घालून व दक्षिणा उपटून पळून जातात. व अन्यजनही तसेंच करितात. द्रव्याचे लालचीनें कितीकांनीं आपल्या पोरीचे गळे चर चर चिरून टाकले आहेत. कर्ज फेडण्या करितां ह्मणून पोरीचा पैसा घेतात किंवा उदर निर्वाहाचे साधनाचा अभाव असल्यामुळें तो घेतात अशी सबब सांगण्यांत येते. पण कन्याविक्रया पेक्षां दिवाणी तुरुंगांत बसणें किंवा, उपासमार होऊन मरून जाणें देखील अधिक भूषणास्पद आहे.

विवाहांत वधुवरांचें वय ही सर्वांत अत्यंत विचारणीय बाब आहे.

परस्परांस, सर्व प्रकारें विसदृश असें एक जोडपें थोड्या दिवसां पूर्वीं आमच्या प्रवासांत आह्मांस आढळलें. ज्याचें वय ६९ वर्षाहून कमी नाहीं, ज्याचे सर्व दंतांनीं रजा घेतली आहे, आणि शुभ्र किंवा पिंगट केश पुंजांनीं ज्याचें सर्व शरीर चमकत आहे तो विवाहित नवरा मुलगा, आणि १२ किंवा १३ वर्षांची मुलगी ही त्याची वधु असें सांगण्यांत आलें. नवरा मुलगा नवीन शिक्षणा वरून ओढलेला आहे असेंहि समजतें. अशा नरपशूंस सुशिक्षित असें ह्मटल्यास त्या शब्दाचा केवढा अपमान व दुरुपयोग होईल बरें? ह्या वृद्धाजोबास हें युक्त होतें कीं, त्यानें आपल्या वयास शोभणारी निदान ४० वर्षांचे वयाची गतभर्तृका पाहून तीस पुन्हा संसारांत घ्यावयाचें असतें. आणि खरोखर तो तसें करिता, तर त्याच्या कृतीबद्दल लोकांनीं त्याचें अभिनंदन केलें असतें. पण लोकापवादास भिऊन त्यानें हें अत्यंत निंद्य व छी, थू करून घेण्या सारखें आचरण केलें आहे. वर दिलेलीं वधुवरांचीं वयें नक्कीच आहेत असें समजावें.

आतां ती मुलगी ह्मणजे काष्ठ पाषाणादि निर्जिव पदार्थ, ज्यांस आत्मा नाहीं, मनोविकार नाहींत, अशीच केवळ नव्हे, असें जर तिचा बाप समजत असेल तर ती ज्या ज्या वेळीं आपल्या पतीचें मुख अवलोकन करील त्या त्या वेळीं तिचे काळिजांत चर चर होईल. आणि ही त्या गृहस्थाची पत्नी असें ह्मणून जेव्हा जेव्हां तिजकडे लोक बोटें दाखवितील त्या प्रत्येक वेळीं तिला नवीन मृत्यू प्राप्त होईल यांत शंका नाहीं. या गृहस्थानें विधवेशीं विवाह केला असता तर किती प्रशंसनीय गोष्ट होती बरें! हा गृहस्थ लोकापवादास भ्याला, ह्मणजे पुनर्विवाह करिता तर लोक नावें ठेविते, ह्मणून रूढीस अनुसरला. पण बिचाऱ्यास निर्भय स्थळ कोठें मिळालें? इकडून खेटरें खाणें व धिडवडे करून घेणें नशिबीं आहेच. जेव्हां दोन भयें येऊन गांठितात व दोन्ही टाळणें अशक्य होतें तेव्हां अल्प भयाची निवड करून घेणें, हें चातुर्य व धैर्य या दोहींचें दर्शक होय. वरील गृहस्थानें अल्प भय ह्मणून पतकरिलें असेल तर त्याचें उग्र स्वरूप अनुभवण्याची वेळ पुढेंच आहे.

मी आपणास खात्रीनें सांगतों कीं, रूढींत अल्प स्वल्प फेरफार करण्याचेंही आह्मास सामर्थ्य नाहीं, अत्यल्प फेरफार करण्याचे वेळींहि, डोक्यावर मोठा पर्वत कोसळल्याप्रमाणें, व वीज कडकडून पडल्या प्रमाणें आमची त्रेधा होते.

एरव्हीं पांडित्य करितांना आढळतात तरी आपल्याच पोरीवर आकाशाची कुऱ्हाड पडली असें पाहून लोक आपापल्या द्रव्यार्जनाचे धंद्यांत निर्लज्जपणें खालीं माना घा-

सून जातांना दिसतात. अशांचे हातून स्त्रियांची उन्नति केव्हां होईल ती होवो.

सूज्ञ वाचकहो, एक उदाहरण तुम्हापुढें ठेवितों. तें नुसतें वाचण्या करितां नव्हे. तर मनन करण्या करितां, चालूं स्थितीशीं ताडून पाहण्या करितां, व न्याय आणि अन्याय याचा निवाडा करण्या करितां होय. समजा कीं एका श्रीमंत गृहस्थास १२।१३ वर्षांचे वयाचा एकुलता एक मुलगा आहे. विद्या, रूप, स्वभाव हीं सर्व अनुकूल आहेत. आपल्या मुलाचा थाटाने विवाह करण्याचें श्रीमानू गृहस्थाचे मनांत आलें ह्मणून त्यानें वधूचा शोध करून ती नेमस्त केली व पत्रिका काढिल्या. पत्रिकेंत लिहिलें कीं गांवांत पेंळपाट लादणें घेऊन फिरणारी दरिद्री, गतभर्तृका साळूबाई जिची उमर ६०।६९ वर्षांहून जास्त नाहीं, जी निराश्रित आहे, व वयाचे मानानें तिची स्थिति आहे. ती, तिच्या दारिद्र्यावस्थेच्या कळवळ्या मुळें वधु निश्चित केली आहे. अशी जाहिरात पाहून तुह्मास काय वाटेल बरें? मनांत प्रथम उठणाऱ्या तरंगास वश होऊन तुह्मी त्या पत्रिका काढणाराची व या लेखाची निर्भत्सना कराल. पण दुसरे विचार तरंग तुह्मास तसें करूं देणार नाहींत. हांसून वेळ मारून नेण्यासारखें यांत कांहीं आहे काय? तसें केल्यानें सहृदयपणा, सहानुभूति यांस फांटा दिल्यासारखें, व भराभर ग्रंथ वाचून केवळ भारवाहक झाल्या प्रमाणें होत नाहीं, काय? वरील निरनिराळीं दोन उदाहरणें पर्यायानें एकाच स्थितींत नाहींत काय? आमची खात्री आहे कीं, सूज्ञ व विचारशील वाचकांचे हृदयावर या विचारांचा ठसा उमटेल आणि यांत विषमता कोठें आहे तें पाहण्याकडे यांची प्रवृत्ति होईल व युक्त उपाय ते शोधून काढतील आणि अमलांत आणितील. १२ वर्षांचे मुलास ६० वर्षांची वधू मिळोंवी असें खचीत कोणी चहात नाहीं पण तितक्याच वयाचे मुलीचें नशीब पहा कसें खडतर आहे तें ! !

मुलामुलीची संमति न घेतां, तीराजवळील पोहणारांनीं ती देणें आणि बहुत प्रकारांनीं टिपणावर विश्वास सोंपवून स्वस्थ बसल्यानें असे परिणाम घडले आहेत कीं, मुलगी नक्षत्रासारखी तर नवरा दांतरा, किंवा पिचका, किंवा लंगडा, अथवा अगदीं शिद्दीसारखा. यजमानांचा टिपणावर विश्वास असल्या मुळें जोशीबुवा ह्मणाले महाराज, मुलगा पहाणें असेल तर तो तिरवा, पिचका व दांतरा, कृष्णवर्ण आणि अक्षरशत्रु आहे. हें मी स्पष्ट सांगतों, पण टिपणांत सर्व गुण उतरले आहेत.

यजमानांचा पत्रिकेवर भरंवसा असल्यामुळें त्यांनीं सर्व गुण संपन्न पुतळी खईसाचे गळ्यांत बांधिली. असें केल्यानें या लोकीं तर कांहीं अलभ्य लाभ दिसत नाहीं, स्वर्गांत मिळेल. मुलीच्या जन्माचें मातेरें केलें इतकें दिसून येतें.

कोणी आपल्या मुली जन्मांधास किंवा अंधास दिल्या आहेत. जर त्यांस सुशिक्षित केलें तर असली नीच अवस्था त्या पतकरितील काय?

पुष्कळ सुधारकांच्या घेरी विधवा होऊन घरांत बसल्या आहेत, व त्यांचीं निर्दयपणें निष्ठुरपणें वपनें होत आहेत, पण सुधारकांनीं आपलें मनही दगडा सारखेंच करून ठेविलें आहे. लग्न करण्याकरितां केवढा उत्साह व केवढी हौस आणि लाखों रुपये खर्च करण्याची तयारी—पण असा कांहीं विपरीत प्रकार घडल्यास त्या गांवचेही नाहींत. अहो झालें काय ? शोक कां करितां कांहीं उपाय आहे काय, असेल तर शोधून काढा, ह्या सर्व प्रश्नास उत्तर नाहीं, व मुलीचे बापास हा जो व्याधि जडला असतो त्यास चिकित्सक मिळत नाहीं.

हे रूढि सर्व वेद, शास्त्रें सारासारविचार, ‘दया व न्याय यांस तूं पायांखालीं तुडवीत आहेस तेव्हां तुझे सामर्थ्य केवढे ह्मणून सांगोंव, वैदिक असो पंडित असो, साधारण गृहस्थ असो तसेंच तो राजा कीं रंक असो सर्व तुझे गुलाम बनले आहेत.

राष्ट्रोन्नति होण्यास स्त्रियांस ज्ञानसंपन्न करणें अत्यंत जरूर आहे, आणि विवाह संबंधी वर दाखविलेला अनर्थ व पीडा, यांचें निवारण याच उपायें करून अगदीं सहज होईल.

ज्या देशांत अज्ञानरूपीं अंधार पसरलेला असतो तेथें कोणीहि राजा होऊं शकतो. पण सुधारलेली राज्यपद्धति चालविण्यास, सामाजिक स्थिति प्रथम सुधारली पाहिजे व राज्य शकटाची दोन्हीं चाकें सपान केलीं पाहिजेत. नाहीं तर, लोकाचा प्रतिनिधि या नात्यानें पदारूढ झाल्यावर मान खालीं घालावी लागेल.

आपल्या मुलींचे गळे चरचर कापीत आहेत आणि गोरक्षणा करितां घांव ठोकीत आहेत.

ह्मणून गोरक्षण कीं कन्या रक्षण ?
आधीं कोणतें ?

२४।४।९८ वि०

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ४ शके १८१९

‘मराठीची दैन्यावस्था’ या विषयावर थोड्या दिवसांमागें सुधारकांत औरंगाबादचे प्रिन्सिपाल रा. रा. काळे यांनीं प्रसिद्ध केलेलें एक पत्र वाचण्यांत आलें. हल्लीं सुशिक्षित लोकांत सुद्धां मराठी भाषे विषयीं कळ कळ दृष्टोत्पत्तीला यावी हें सुचिन्ह आहे रावसाहेबांनीं जो विषय हातीं घेतला आहे तोही दिवसें दिवस अधिक अधिक स्फुटतेनें मराठी भाषेच्या पुस्तककर्त्यांच्या नजरेस येऊं लागला आहे. मराठी कोश तयार करणारांच्या मार्गांमध्यें पहिली अडचण येऊन पडते ती हीच कीं कोणत्या संस्कृत शद्बांस मराठी कोशांत स्थान द्यावयाचें याचा निवाडा करावयाचा. गद्यपद्यात्मक समूळ वाङ्मय घेतलें तर कोणत्याहीं संस्कृत शद्बास बहिष्कृत केलें असतां वाजवी दिसणार नाहीं. सर्वमान्य अशा ग्रंथकारांनीं लिहिलेले गद्यग्रंथ जरी घेतले तरी सुद्धां त्यांमध्यें संस्कृत कोशांतले कानांस अपरिचित असे शद्ब आपणास जागोजाग आढळून येतील. संस्कृत शद्बाचा मराठींत इतका भरणा असण्याचें कारण मराठीच संस्कृत भाषेपासून प्राकृत भाषेच्या द्वारें झाली हें होय. अलीकडे आमच्या भाषेला जो भारदस्तपणा किंवा जें सौंदर्य आलें आहे त्याचें सर्व श्रेय गर्वाण भाषेकडेच आहे नवीन शास्त्रीय शद्ब घडणें हें तर तिच्या साहाय्यावाचून फार कठीण गेलें असतें ज्या तत्वावर शद्बांची निवड करावयाची ते पंक्तिप्रपंच न करतां ठरवितां येण्या जोगें आहे काय? उदाहरणा साठीं कांहीं मुख्य तत्वें देतों:—

१ कोशकाराची लहर—या तत्वावर शद्बाचे ग्राह्याग्राह्यत्व ठरविणें गैरवाजवी होणार आहे. कारण निरनिराळ्या कोशकारांची लहर निरनिराळ्या तऱ्हेची असूं शकेल. उदाहरणार्थ—रा. रा. काळ्यांना कठीण वाटत असलेला ‘प्रयाण हा शद्ब इतरांना नेहमींच्या प्रचारांतला वाटण्याजोगा आहे.

२ शद्बामधील वर्ण संख्या—या धोरणावरही शद्बाची निवड करणें अन्याय्य होईल. कारण बहु वर्णत्वामुळें ‘करतलामलकवत् सकृतदर्शनी’ ( हा शद्ब रा. काळ्यांनीं वरील टीका लेखांत योजिला आहे ) अशा सारख्या परिचित शद्बांना फाटा द्यावा लागेल.

३ गद्यांतील शद्ब व पद्यांतील शद्ब ही दृष्टीही आपल्या फारशी उपयोगी पडावयाची नाहीं याचें कारण वर सांगण्यांत आलेंच आहे. शिवाय गद्य व पद्य ग्रंथांत लेखन पद्धती संबंधानें फार तफावत असणें इष्ट नाहीं.

४ सामासिक व इतर शद्ब—हा भेद ठेवणेंही रास्त होणार नाहीं याचें कारण वर आलेंच आहे.

सारांश, आमच्या दृष्टीनें कोणतें तरी एक निवडणुकीनें तत्व ठरविण्या पेक्षा याबद्दल मुळींच चर्चा न करणें हें बरें. इंग्रजी भाषेंत जॉन्सनच्या सारखे कठिण ग्रंथही लोकप्रिय झाले आहेत हें लक्ष्यांत बाळगिलें असतां आपणास मराठी भाषेबद्दल फिकीर करण्याचें कारण पडणार नाहीं. इतर गोष्टी प्रमाणें लेखन पद्धतींतही वैचित्र्य दिसून येणें हें स्वभाविक आहे तसेंच इष्टही आहे. गणिणे तर भाषेंतील वाक्य संप्रदाय जसेचे तसेच उचलणें हें अनिष्ट आहे व टाळण्याजोगें आहे हें आह्मी कबूल करितों. पण ज्याप्रमाणें लॅटिन भाषेंतील संप्रदाय मिल्टन सारख्याच्या ग्रंथांत क्षम्य इतकेंच नाहीं, तर अलंकृतिरूपही वाटतात त्याचप्रमाणें संस्कृत भाषेंतीलही आमच्या मराठी भाषेंत अस्थानीं दिसणार नाहींत. पुष्कळ वेळीं एखाद्या संस्कृत शद्बा बरोबर हजारो मनोरम कल्पना डोळ्यांसमोर उभ्या रहातात, त्याबद्दल तद्वाचक मराठी शद्ब वापरला असतां उभ्या रहात नाहींत असा अनुभव आहे. मराठी भाषेच्या बाल्यावस्थेंत संस्कृत भाषेचा आश्रय झुगारून देणें हें मातेवर पोसले जाणाऱ्या अर्भकानें तिचा त्याग करण्या सारखें होणार आहे हल्लीं मराठी ग्रंथांची मोजदात केली तर त्यामध्यें रा. रा. काळे यांनीं निषिद्ध केलेल्या ग्रंथांची संख्याच फार आढळून येईल. निबंधमाला घ्या केसरींतील निबंध घ्या. दाभोळकरांची ग्रंथमाला घ्या. जिकडे तिकडे संस्कृत भाषेचे साम्राज्य आढळून, येईल. संस्कृत भाषेला झिटकारणें ह्मणजे वर नमूद केलेल्या सर्वोत्कृष्ठ ग्रंथांची किंमत कमी करणें आहे. हा वाद २०-४० वर्षांपूर्वी ह्मणजे मराठी भाषेचें कायमचें रूप ठरण्या पूर्वी निघाला असता तरी त्याचा निकाल समाधानकारक रीतीनें झाला असता कीं नाहीं याची शंकाच आहे. हल्लीं तर हा वाद फार उशिरानें उपस्थित झाला आहे असें ह्मणणें भाग आहे.

ज्या लेखावरून रा. रा. काळे यांस आपलें टीकारूप शस्त्र उचलण्याचा प्रसंग आला तो हल्लींच्या एका विद्वान् पदवीधराकडून ‘विविधज्ञान विस्तारांत’ प्रसिद्ध होत असतो ज्या ग्रंथकारानें या पूर्वींच आपल्या २-३ ग्रंथांनीं चांगलें नांव मिळविलें आहे, त्यांच्या ग्रंथांनीं हल्लींच्या उत्तम ग्रंथांत अग्रेसरत्व संपादिलें आहे. त्यांच्या इतर ग्रंथापेक्षां टीका विषयक ग्रंथ विषयास अनुसरून बऱ्याच सुबोध पद्धतीनें लिहिला गेला आहे. असें असतां त्यांनीं ‘रत्नागिरीस प्रयाण केलें’ या सारख्या साध्या वाक्यांस दुर्बोध ठरवून एकंदर ग्रंथास नादान ठरविणें हें निष्पक्षपाल सहृदयांच्या शीलास शोभण्या जोगें नाहीं, इतकें लिहून हा लेख येथेंच संपवितों.

---

मनुष्याची धर्मावर आणि ईश्वरावर अतोनात निष्ठा व भक्ती असते. एखादी गोष्ट ईश्वरास आवडणार नाहीं असें एकदां त्याचे मनानें घेतलें कीं मग ती गोष्ट त्याचे हातून कालत्रयीं घडणार नाहीं. ईश्वरासाठीं, पारलौकिक सुखासाठीं आणि सत्कृत्यांसाठीं प्राण खर्चीं पडला तरी त्याचा विषी निषेध नसतो. ईश्वरा शिवाय दुसऱ्या कोणाचीही त्यास भिती वाटत नाहीं. पण आतां आमचा ईश्वर विश्वर तितपतच उरला आहे. सद्यां ऐहिक गोष्टींनीं आमचे मन घेरलें आहे. आह्मी अगदीं निर्भय ( निर्लज्ज सुद्धां ) झालों ह्मणायाला हरकत नाहीं. चांगल्या वाईटाबद्दल दरकारही विशेष उरली नाहीं. जर थोडें बहुत मन भीत असेल तर तें सरकार दरबारला थर्र कापत आहे. शारीरिक दंडदोषाला मात्र अद्याप मन निरढून निगरगट्ट बनलें नाहीं.

मनाची जी गत तीच सर्व गोष्टींची. मनोराज्याच्या ऱ्हासा बरोबर सर्वांचा ऱ्हास होऊं लागला. मनच खचलें तर शरीर जोर कितपत टिकणार ! कांहीं काम करीन म्हटलें तर त्राण उरलाच नाहीं. मनानें माघार घेतल्यावर उचल कशी होणार? आह्मी नीतिभ्रष्ट, दैवभ्रष्ट, आणि राज्यभ्रष्ट, सर्वच भ्रष्ट झालों, अशा आमच्या दैन्य स्थितींत आह्मांस कोण तारणार असेल तो असो.

पूर्वींचें आमचे ब्राह्म तेज व क्षात्र तेज नष्ट झालें. आह्मी सर्वतोपरी निस्तेज झालों. पूर्वी महाभारत रामायणादि धर्म पुस्तकांच्या परिशीलनानें तसेंच रामदास एकनाथ यांच्या उपदेशानें जी वीरश्री आंगांत संचार करी व जी स्फूर्ती मनास चढत असे ती हलके हलके नाहींशी होत चालली. अद्याप ही शिवाजी, बाजीराव सारख्या नामघोषानें बाहू स्फुरण पावतात. पण आह्माला ‘हरीहरी’ करण्यापलीकडे कसली जरूरच उरली नाहीं. आमच्या उदार सरकारनें आमची रक्षा

करण्याचा आमचा सर्व प्रकारचा जिम्मा आपल्या माथ्यावर घेतला आहे, तरी पण आमच्या अगांत जी रग व धमक रसरसती आहे तिचा त्यांनीं जर उपयोग करून घेतला तर मग इंग्रज सरकार व आह्मी हे दोघे जण सर्व शत्रूंस अजिंक्य होऊं ह्यांत नवल नाहीं. आमच्या अष्टाधिकारावर आह्मांस पुन्हां अधिष्ट त्यांनीं करावें ह्मणजे झालें. मग समशेर गाजवून इंग्रजी व हिंदु या नांवास शोभेलशी करणी करून दाखवू फक्त इंग्रज सरकारनीं आमचा निरपक्षपणानें वालीपणा स्वीकारावा.

× × ×

इतिहास व दंतकथा यांच्या पृथःकरणांवरून आपल्या अंगीं 'शापादपि किंवा शरादपि' कांहीं तरी बल असे पण आता अगदींच कसें निःसत्व झालों आहोत कालचक्राचा चांगलाच गरका मिळाला आहे. तनमनधन सर्व विलरून गेलीं आहेत. ईश्वरानें काना डोळा केला तर मग आपलें काय चालणार आमच्यावर ईश्वरी क्षोभाची वृष्टीच होत आहे. दुष्काळ, कारग्रहवास, खून धरणीकंप प्लेगादि अरिष्टांनीं आमचा पूर्ण पिच्छ पुरवला आहे. एकातून पार होत जावें तर दुसरें तयार आहेच. आमच्यानें आतां धीर धरवत नाहीं. आह्मी जेरीस येऊन गाईहून गाय झालों आहोंत. आमचें इतकें दिवसांचें धैर्य, तेज कोठें लोपलें कोण जाणे. प्रसंगाखेरीज अंतस्थ तेज चमकत नाहीं. पण आमच्या तोंडचें पाणी पळालें आहे, अन्न गोड लागत नाहीं कीं निद्रा सुखाची येत नाहीं यावरूनच आमच्यात कांहीं उरलें नाहीं दिसतेंच आहे.

आपल्यावर अनेक परचक्रें आलीं. नादीरशहा, अब्दाली सारख्याच्या स्वाऱ्या झाल्या पण आमचा हिय्या, आमची कुवत आमचें धैर्य कांडी इतकें कमती झालें नाहीं. बलाढ्य शत्रूशी सामना देण्यांत आह्मी आपला पाय कधीं माघारा घेत नाहीं. कोणी डोळा उघडून आमचेकडे पाहण्याची छाती नव्हती. आह्मांस ईश्वराखेरीज दुसऱ्याची भीति माहीत नव्हती. पण आतां ईश्वरास इतकें भीत नाहीं पण दुसऱ्या गोष्टींना फार भितो. प्लेगची स्वारी झाल्या पासून आह्मी कसे भित्रे झालों आहो आमचा अगदीं धीर तुटून गेला आहे.

आज काल प्लेग स्वारीचा काय पग दरारा आहे. चोहोंकडे त्याच्या नुसत्या नांवानें सर्वांची गाळण उडाली आहे. जीव मुठींत धरून लोक सैरावैरा पळतात. पण त्यानें मोठमाठ्या शहरीं अगदीं नाकेबंदी नाकेबंदी केली आहे. बाहेर कोठें पळून जाणें दुरापास्त झालें आहे. कलकत्यास तर नुसत्या प्लेगच्या हुलीवर लोक नाचविले जात आहेत. मुंबई, पुणें, कराची, नाशिक आदिकरून मुख्यमुख्य या प्लेगची ठाणीं आहेत. आणि येथून दुसऱ्या इलाख्यावर त्यानें मोर्चा बांधला आहे.

आपल्याला प्रत्यक्ष प्लेगस्वारीची मुलाखत घेण्यास इतकी भीति वाटत नाहीं. पण त्याचा कालस्वरूपी लवाजमा पाहून, क्वारंटाईनाचीं वर्णनें ऐकूनच हातपाय लटलट कापतात. मनुष्य प्रत्यक्ष स्थितीला इतका भीत नाहीं पण परिस्थितीला फार भितों असें ह्मणतात तें खोटें नाहीं. प्रत्यक्ष संकट दत्त ह्मणून आ पसरून उभें राहिलें तर भिती वाटण्या इतका अवकाशच नसतो. पण त्याच त्या संकटाच्या गोष्टी ऐकिल्या तर उरांत धडकी भरते. सर्व खरें पण भ्यायचें किती. वाघोबा ह्मटलें तरी खाणार, वाघ्या ह्मटलें तरी खाणारच. मग दोन हात करून मर्दां प्रमाणें कां मरूं नये. ह्मटलें आहेः—

यदि समरमपास्य नास्ति मृत्यो र्भयं युक्त
मितोऽन्यतःप्रयातुम् ।
अथ मरणमवश्यमेवंजतोः किमिति मुधा
मलिनं यशः कुरुध्वं ॥

पण प्रीती आणि भीति या आंधळ्या ह्मणतात तें खरेंच. एकदा भीतीनें घेरलें ह्मणजे मग पात्रापात्र, योग्यायोग्य विचार रहात नाहीं. या कामीं दुसऱ्यानें कितीही तातडीनें दोन गोष्टी समजुतीच्या सांगितल्या तर त्या रुचत नाहींत. प्रत्यक्ष पारखून मग डोळे उघडे तरी सुद्धां नशीब. नाहींतर बुडत्याचे पाय डोहाकडे चाललेच आहेत. आमचे सरकार आपल्या कडून होईल तितका धीर देत आहे पण आमचा मुळांतच धीर तुटतो त्याला तें काय करणार बापडें.

---

या प्लेगामुळें सर्वांचेंच नुकसान होत नाहीं ही गंमत आहे. कोणाच्या दथ्यावर वाईट गोष्टी पडत असतात. एकाचें अमृत तें दुसऱ्याचें विष अशी एक ह्मण आहे. अलीकडे प्लेगमुळें डाक्टर लोकांच्या उदरीं शनी आला आहे असें ह्मणूं लागले आहेत. या प्लेगा साठीं नवीन नवीन कडक कायदे कानू, चाकर नोकर वगैरे पुष्कळच एस्टॅब्लिशमेंट वाढलें आहे. डाक्टर व पोलीस यांनीं हातमारून घेण्याची अमोलिक संधि दवडूं नये त्यांतल्या त्यांत त्यांनीं आपल्या ज्ञानाचा व अधिकाराचा जनांचे कष्ट कमी करण्याकडेस उपयोग केल्यास बट्टा लागणार नाहीं. ह्या वेळीं वैद्यकीचें ज्याच्या अंगीं खरें कसब असेल त्यानें दाखवावें. वैद्यांना लोक आजारी पडावेत असें वाटत असेल काय? मनविवेचक शास्त्रज्ञाना हा प्रश्न छानसा सांपडला आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY, MAY 9 1898.

The Indian politics have become a forbidden fruit in the long run. The Anglo—Indian patriotism condemns out-right our political movement. A spirit of despair rules supreme in the minds of the educated natives. An Indian leader is thwarted in all walks of life and if he does not show perfect perseverence, he will have to retire from the political field this day or a day hereafter. Fortunately for us the political battle is being faught with calmness, dignity, and confidence in the righteousness of the English people. The interests of an Indian citizen clash with those of a Britisher, and there is always the un-willingness on the part of the latter to admit the former to the rights and privileges of a British subject. The western education has taught an Indian citizen what his rights are in common along with an Englishman. He has been inspired with an elevated notion of a British subject and the ambitious cravings of his mind run counter to the narrow and sorrid interests of the Anglo—Indians. Human Nature is averse to the good side of altruism and herein lies our greatest duty to awaken the English people to the suicidal effects of a bureaucratic government. No body denies that political victories are not a matter of a day. but our state of hopelessness arises from another direction altogether. There is not the slightest indication of an onward motion if we understand aright the fast progress of imperialism or the policy of repression which is being pursued in the most faithful manner. One can easily see how the chances of success a e d w ndling faster and how the Indian public opinion fails to attract attention of the government or is shelved aside as a condemned article of political faith. It seems to us that the gulf between the rulers and the ruled is being widened instead of its being bridged over. However, the saving element in the situation is the distant hope of success which throws light on our way in the dark atmosphere of the present time. The ray of hope comes from the feelings of devotion to the throne and the inherent goodness of the English people. Try again is the motto of political movers and we think that it is the only way to achieve national works wherein we must count our time by centuries.

---

Our political activities are thus at a stand—still. We are often times lulled into a sleep of despair. But the sad turn of affairs concentrates our attention in some other important problems of the day. People are contented no doubt but they feel the want of independence which wealth alone can purchase. People feel as a matter of fact that they are nothing but mere hangers—on on the government's favour for the simple purpose of bread. Thinking minds trace this utter degradation to the present system of education in a more or less degree. It is a common talk that the present education is ill suited to the requirements of the people in the ordinary run of life. To put the argument as it is we would say that the present education ill equips our young people to fight out the battle of life, and makes them quite useless for earning their livelihood. Young men are turned out from schools and colleges who prove a burden to their families. Education according to the present standards means a good deal of mental strain and a clear sacrifice and waste of the energies of young people in the name of the *blessed* liberal or general education. An attempt is made to take a complete survey of the world's store of knowledge or to present a bird's eye—view of the same. But we think that the attempt is a complete failure. The present education does not multiply the power of the eye to see, of the ear to hear, or of the hand to execute; and fails to put a mind well stored with knowledge into active contact with faculties capable of translating it into action. Pure development of mind will not do unless it is coupled with that of our physical faculties. Education that will cultivate both mind and body together, should be the first stepping stone to technical education and it is then the wide spread of the latter that will improve the material prosperity of a nation. This result we arrive at from a careful reading of the history of England since the time of Adam Smith and the growth of the English nation will alone illustrate what we have to attain in order to raise India to the scale of a prospering and thriving nation.

---

## वऱ्हाड

हवामान—उष्णतेचें मान गतसप्तकांतल्या प्रमाणें प्रखरच आहे. पण वारा चांगला जोराचा सुटतो व रात्रीं लवकर थंडपणा वाटूं लागतो. उन्हाळ्याचे आजार लहान मुलांस फार बाधा करितात आणि त्या मानानें मुलें पुष्कळ मेलीं.

रा. रा. गणेश बापूजी उटगीकर एक्स्ट्रा असि. कमिशनर यांची बदली यवतमाळाहून वाशिमास होत आहे असें कळतें.

वऱ्हाडच्या वकिलीची परीक्षा येत्या सप्टेंबरच्या ५ वे तारखे पासून उमरावतीस सुरूं होईल. जुलै १ ल्या तारखेच्या आंत उमेदवाराचे अर्ज पोंचले पाहिजेत.

रा. रा. देवराव जयकृष्ण, एक्स्ट्रा असि. कमि. तेल्हारा यांस १॥ महिन्यांची हक्काची रजा चालूं महिन्या पासून मिळाली.

हायर व लोअर परीक्षांचा निकाल विषयवारीनें खालील प्रमाणें आहे:—

| मिस्टर. | विषय. |
|---|---|
| बी. क्रे | दिवाणी व फौजदारि हायर. |
| ए. सी. करि | फौजदारी, मुलकी व मराठी हायर. |
| सय्यद मोहिनुद्दीन खान | मुलकी. लोअर. |
| एफ. एल. क्राफर्ड | फौजदारी, आकौंट हा. व मराठी |
| हरीहर काशिनाथ | आकौंट - हायर |
| महमद अझिमुद्दीन | " |
| कृष्णराव पुरुषोत्तम | मुलकी - लो. |
| सय्यद मझार हुसेन | अकौंट-लो. मराठी |
| दत्तात्रय विठ्ठल सरंजामे | आकौंट - लो. |
| धोंडू हरी लळींगकर | फौजदारी - लो. |
| लक्ष्मण विश्वनाथ दांडेकर | आकौंट - लो. |

मि. क्रे हे हायर परीक्षेंत व रा. रा. धोंडू हरी हे डिपुटी क्लार्कच्या दर्ज्याच्या परीक्षेंत मागील परीक्षांच्या गोळाबेरजेनें संपूर्ण पसार झाले.

मि. एफ. एल. क्राफर्ड असि. कमिशनर यांस माजिस्ट्रेट वर्ग १ चे अधिकार मिळाले.

रा. रा. जी. सुब्रायलू नायडू हे एक्स्ट्रा असि. कमिशनर झाल्या कारणानें त्यांच्या १ ले वर्ग तहशीलदारीच्या संबंधानें वर्गावर्गी येणें प्रमाणें झाली:—

| रा. रा. | तहशिलदारीचा वर्ग |
|---|---|
| गोविंद गंगाधर दामले | १ ला. |
| नारायणसिंग बभूतसिंग | २ रा. |
| महमद अझिमुद्दीन | ३ रा. |
| कृष्णराव पुरुषोत्तम | ४ था. |
| लक्ष्मण नारायण गोखले | ५ वा. |

रा. रा. विठूजी नारायण यांनीं पेन्शन घेतल्यामुळें त्यांची वर्ग ३ ची तहशीलदारी रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर, दर्यापूर यांस मिळाली.

रा० रा० रघुवीरसिंह दुनियासिंह, नायब तहशिलदार, दर्यापूर यांस ३ महिन्यांची हक्काची रजा देऊन त्यांच्या जागीं रा. रा. रामकृष्ण अमृत यांस नेमिलें.

रा. रा. गोविंद दामोदर नायब तहशिलदार, वणी यांस १ महिन्याची रजा मिळाली असून त्या जागीं रा. रा. लक्ष्मणराव डोळे यांस नेमण्यांत आलें.

---

## वर्तमानसार

हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्यांनीं आणि नेटिव व्यापाऱ्यांनीं फायदा करून घेण्यास चुकूं नये. अमेरिका व स्पेन यांच्या दरम्यान लढाई होण्याचें ठरल्यापासून ४८ तासांच्या आंतच विलायतेंत गव्हांचा भाव विलक्षण प्रकारचा वाढला. अर्थात दोन्ही पक्षाचे सर्व शिपाई एकत्र होऊन लढाईचें रणकंदन झपाट्यानें सुरू झालें कीं, विलायतेस गव्हांचा पुरवठा कमी होऊन गव्हांचा भाव याहीपेक्षां वाढून जाईल. अशावेळीं गहूं पिकविणाऱ्या देशांतल्या लोकांनीं व गहूं पिकविणाऱ्या शेतकऱ्यांनीं आपला फायदा करून घेण्यास चुकूं नये.

चीनच्या लीओटींग प्रांताचा कमांडर इनचीफ जनरल संग चिंग हा हल्लीं पोर्ट आर्थर पासून १८ मैलांवर चिंचो येथें आहे. त्यास तेथेंच राहण्याचा व तेथें शत्रूच्या बचावा करतां तटबंदी करण्याचा हुकूम झाला आहे. हल्लीं तेथें त्याच्या हाताखालीं १४,००० फौज आहे, रशियाची मोठी फौज त्या हद्दींत शिरल्यामुळें, मोंगल व मंचुरी नावाच्या डोंगरी लोकांस हत्यारबंद करून आपल्या मदतीस घेतल्या वाचून व त्यांस नवीन जातीच्या हत्यारांनीं सज्ज केल्यावांचून रशियाचे पुढें येणें बंद करतां येणार नाहीं असें आतां अनुभवास आलें असल्यामुळें नव्या जातींचीं १३,००० हत्यारें आणविलीं आहेत. लिओंग प्रांतांत रशियानें अलीकडे आपली फौज आणून जें वर्तन केलें त्यावरून रशियाशीं मित्रत्वाचें वर्तन ठेवण्यांत आपली चूक झाली असें चीनच्या बड्या अधिकाऱ्यांस आतां वाटूं लागलें आहे व ते मित्रत्वाचें नातें मोडून टाकण्याच्या विचारास ते लागले असून त्याकरतां ली हंग चंग हा पुन्हा एकदां युरोपाच्या प्रवासास जाईल असें अनमान आहे.

चीनचें टेलनवान नावाचें जें बंदर रशियानें आपल्या ताब्यांत घेतलें त्या बंदरांत परकीय राष्ट्रांतल्या व्यापारी गलबतांसही येऊं द्यावयाचें नाहीं असें रशियानें ठरविलें आहे यावरून यापुढें इंग्रज कारभाऱ्यांनीं रशियाच्या बोलण्यावर विश्वास ठेवूं नये असें इंग्रजपत्रें ह्मणूं लागलीं आहेत.

अमेरिकेचीं लढाऊ गलबतें क्युबाकडे जाऊं लागलीं व अमेरिकेची फौज होईल तितक्या घाईनें क्युबा बेटांत उतरणार आहे.

हावाना येथें जाणारी तार अमेरिकेनें कबज केली.

क्युबा बेट खालसा करण्याचा अमेरिकेचा इरादाच नाहीं असें प्रसिद्ध केलें. त्या बेटांतल्या अन्नार्थी लोकांकरितां अमेरिका धान्य पाठविणार.

स्पेनच्या कांहीं आगबोटी अमेरिकेनें कैद केल्या.

गहूं भरून अटवर्प येथें जाणारें अमेरिकेचें एक गलबत स्पेननें कैद केलें.

क्युबा बेटाचा पश्चिमभाग आपल्या फौजेनें अडविण्याचें अमेरिकेनें ठरविलें.

अमेरिकेची एक टारपेडो बोट स्पेननें कैद केली.

स्पेननें आपल्या हावाना किल्यावरून अमेरिकेच्या आरमारावर शनवारी तोफा डागल्या, पण अमेरिकनांचें कांहीं नुकसान झालें नसून त्यांणीं उलट तोफाही डागल्या नाहींत.

आपल्या बंदरांतल्या अमेरिकन गलबतांनी ३० दिवसांत निघून जावे असें स्पेननें ठरविलें.

अमेरिकेचीं ९ गलबतें हांगकांग येथून गुप्त हुकूम घेऊन निघालीं.

स्पेन पैशाची जमवाजमव करीत आहे.

अमेरिकेच्या बदरांतल्या स्पेनच्या गलबतांनीं २१ मेच्या आंत निघून जावें असा अमेरिकेनें जाहिरनामा लावला.

अमेरिकेचीं लढाऊ गलबतें क्युबाकडे जाण्यास निघालीं.

या लढाईत इंग्लंड. तिऱ्हाईतासारखा राहणार असून त्याप्रमाणें कोणत्या लढाऊ गलबतास कोणत्याही प्रकारची मदत वगैरे करावयाची नाहीं असें ठरवून तिकडून हिंदुस्थानसरकारानेंही तसेंच वागावें असा हुकूम आला आहे.

याचप्रमाणें फ्रान्स व इटाली यांणी तिऱ्हाईत राहण्याचें ठरविलें आहे.

अमेरिकेच्या गलबतांनीं मटंझा येथील वाट रीवर तोफांचा भडीमार करून त्याचा नाश केला. अ०

निजाम हैद्राबादेस अतिशय तुफान होऊन कित्येक तासेंपर्यंत जोराची वृष्टी होत होती गाराही सपाटून पडल्याचें कळतें.

जाळण्याच्या तेलांत जर एक चमचाभर मीठ टाकलें तर दिव्याचा प्रकाश स्वच्छ पडतो लोकांनीं अनुभव पहावा. आ. व.

तापी व्हाली रेल्वे.— ही खानदेशांतून गुजराथेकडे जाणारी आगगाडीची सडक झपाट्यानें चालू असून, येत्या जूनच्या अखेरीस तिचें एकंदर काम पुरें होऊन त्या रेल्वेनें गाड्या येऊं जाऊं लागतील, असा अनमान आहे.

वर्षाकाळारासून सुरुवात.—जिला छोटी बसींत असें ह्मणतात त्या वर्षाकाळाला कोलंबो येथें ता० ९ एप्रिल रोजीं सुरुवात झाली. ह्मणजे सदर तारखेपासून सुमारें तीन आठवड्यांनीं आपल्या ह्या प्रांतांत पर्जन्यकाळाला सुरुवात व्हावयाची असें धोरण असतें. ह्यावरून, यंदा दरसालपेक्षां इकडे पावसाळा लवकर सुरू होणार असें वाटतें.

१८०१ सालचा वर्षदीन.—इसवी सन १८०१ च्या जानेवारीची पहिली तारीख अनेक महत्वाच्या गोष्टींनीं सुप्रसिद्ध आहे. त्या दिवशीं ऐरिश पार्लमेंट सभा मोडून ऐर्लंड ग्रेटब्रिटनदेशामध्यें सामील केलें. ह्या दिवसापासून त्या देशाचें स्वातंत्र्य नष्ट होऊन त्याला पारतंत्र्य आलें व त्या दिवसापासून ऐरिश लोकांना दुःखाचे दिवस आले असें समजलें पाहिजे.

बोड्यांत प्लेग—सोलापुरास घोड्यांना प्लेग होऊं लागला आहे! एकाएकीं घोडे तप्त होतात आणि नंतर त्यांच्या जांघांत गोळे येऊन एक दोन दिवसांत मरतात असें कल्पतरूवरून कळतें. सोलापुरास पूर्वीं मांजरे, कुत्रीं, कावळे वगैरे पशुपक्ष्यांनाही प्लेग होत असल्याची उदाहरणें घडलीं व आतां ती साथ घोड्यांमध्यें शिरली आहे! हा प्लेग ह्मणजे मृत्यूचा खरा प्रामाणिक आणि अत्यंत प्रीतीचा वस्ताद दूत आहे असें दिसतें. ज्ञा. च.

सुमात्रा ऑईल—कमींत कमी वीस वर्षांपूर्वीं केरोसीन तेलाचें हिंदुस्थानांत नांव सुद्धां माहित नव्हतें. पण हल्लीं पूर्वींचें दिवेल तेल नाममात्र राहण्याची वेळ येऊन, रशिया व युनायटेड स्टेट्स कडून आलेलें केरोसीन तेल जिकडे तिकडे बहुतेक वापरण्यांत येतें. आतां हें तेल खेड्या खेड्यांतीं सुद्धां गेलें आहे. तुकतेंच एक नवीन तेल निघालें आहे. तें इकडील बाजारांत विक्रीकरितां तयार झाल्यामुळें केरोसिनचा खप मंदावण्याचा संभव आहे. हें नवें तेल मद्रासेकडे तयार करतात. याला सुमात्रा ऑईल ह्मणतात हें केरोसीन पेक्षांही स्वस्त भावानें मिळतें. आह्मा कंगाल हिंदुलोकांना स्वस्त मालाची फार अवश्यकता आहे. तेव्हां या स्वस्त आणि देशी तेलाचा खप येथें चांगला होईल असें वाटतें. ईश्वर करो आणि इतरसंस्थेप्रमाणें हाही कारखाना आरंभशूर न होवो एवढेंच मागणें आहे.

बडोदें—कडीप्रांतापैकीं विजापूर तालुक्यातील पिळवाई गांवीं गेल्या आठवड्यापासून पुष्कळ अस्वस्थता उत्पन्न झाली आहे. ह्या गांवच्या लोकांनीं सरकारी लोकांस पुष्कळ मार दिला आहे, व सरफौजदार मि. रावजी रेडे यांस तरवारीची जखम केली आहे. पोलिस कमिशनर, पो सुपरिंटेंडेंट, नायबसुभे, सुभे, वगैरे त्या प्रांतांतील बहुतेक आफिसर व पलटणही बंदोबस्ताकरितां गेली आहे. हा दंगा होण्याचें कारण आमच्या विजापूरच्या बातमीदाराच्या पत्रावरून असें समजतें कीं, विघोटीची मारणी करण्याच्या बाबतींत ह्या गांवचे रजपूत लोक विरुद्ध होते आणि ह्या जमिनीच्या मापणीवरूनच मूळ दंग्यास सुरवात झाली. मापणी करण्यास गेलेल्या लोकांस यथेच्छ चोप देऊन हांकून लावल्याची बातमी ता. २२ रोजीं विजापुरास समजली; व ती समजतांच नायबसुभे, वहिवाटदार. सरफौजदार, फौजदार, ना. फौजदार वगैरे आफिसर मंडळी, स्वार, शिपाई आदि ५० लोक बरोबर घेऊन तिकडे गेली. गांवच्या चोऱ्यांत जाऊन ह्या मंडळीनें मुक्काम केला. तों रजपूत लोकांनीं मोठ्या जमावानिशीं त्यांस घेरा घातला, व "तुह्मीं येथून जातां किंवा मार पाहिजे" असें ह्मणून त्यांच्या घोड्यांच्या अवाढ्या पिछाड्या कापून सर्व घोडीं पिटाळून दिलीं, व या लोकांस चोप देण्यास सुरुवात केली. सरकारी लोक हत्यारबंद होते, तरी रजपूत लोकांचा भरणा मोठा असल्यानें त्यांस जीव घेऊन पळावें लागलें. थोडाबहुत प्रसाद सर्वांसच दिला. परंतु सरफौजदार मि. रेडे, व एक पोलीस शिपाई असे फार जखमी झाले असून, वहिवाटदारांसही जबर लांकडांचा मार सहन करावा लागला आहे. व फौजदार नायब फौजदार वगैरे तीन मनुष्यांस त्या लोकांनीं कैद करून असें कळविलें कीं, आमच्या पकडलेल्या मनुष्यास सोडलें तर आह्मी तुह्मास सोडूं. नाहींपेक्षां तुह्मास आमच्या कैदेंत ठेवूं त्यावरून नायब सुभे साहेबानीं २०० रुपयांचा जामीन घेऊन पकडलेल्या मनुष्यास सोडून दिलें, तेव्हां त्या तिघां पोलीस अमलदारांची सुटका झाली. ह्या धामधुमीत पोलीसची दोन मनुष्यें नाहींशीं झालीं त्यांचा अद्याप पत्ता लागत नाहीं असें ह्मणतात. अशा प्रकारें ह्या अस्वस्थतेची हकिकत आहे हल्लीं कडी प्रांतांतील बहुतेक आफिसर पलटणसह जरी तेथील बंदोबस्ताकारिता गेले आहेत, तरी येथीलही एक पलटण पाठविण्याविषयीं तिकडील सुभे साहेबांनीं मागणी केली आहे. या वरून अद्याप व्हावी तशी शांतता झालेशी दिसत नाहीं. अशा लोकांवर चांगला दरारा बसेल अशा प्रकारची कांहीं व्यवस्था झाल्यावांचून असले दंगे धोपे कमी होणार नाहींत.

ह्या चालू लढाईच्या दरम्यान कोणताही पक्ष न घेतां स्तब्ध रहावयाचें असा इंग्लंडनें एक ठराव करून, त्या प्रमाणें वागण्याविषयीं युरोपांतील इतर राष्ट्रांसही सूचना केली आहे. तसेंच फ्रान्स व इताली या दोन्ही राष्ट्रांनीं या लढाईत कोणताच भाग घ्यावयाचा नाहीं असें प्रसिद्ध केलें आहे, अमेरिकन लष्कराचे ले. रोयन हे क्यूबाच्या पूर्व भागास जाऊन पोंचले आहत. व क्यूबांतील दंगेखोर लोकांस सामील करून घ्याचा त्यांचा विचार आहे. स्पेनचीं तीन लढाऊ मनवारें व सात टारपिडें अटलांटिक महासागरांत गुप्तरीतीनें रवाना झाल्याची बातमी बाहेर आली आहे. मेटनझास जवळ एका अमेरिकन टारपेडचा स्पानिश गनबोटीशीं गेल्या मंगळवारीं सामना झाला. त्यांत अमेरिकन टारपेडास हार खावून परत फिरावें लागलें; व 'सारनाक' नामक एक कोळशानें भरलेल्या अमेरिकन जहाजांस स्पानिश गनबोटीनें कैद करून फिलीपाईनच्या बंदरांत नेलें आहे. स्पेनपेक्षां अमेरिकेची शक्ति सर्व प्रकारें मोठी आहे व या लढाईत त्यांसच यश येईल असें जरी खातरीनें वाटत आहे, तथापि ही लढाई ज्या क्यूबांतील लोकांकरितां होत आहे ते लोक आयते वेळीं कोणास मिळतात याचा संशय आहे कारण क्यूबास स्वतंत्रता देण्याचा अमेरिकेचा जो पूर्वींचा विचार होता, तो लढाईचा जाहीरनामा प्रसिद्ध करतांना गाळला आहे; व क्यूबा आपल्या ताब्यांत ठेवल्यास व्यापाराचे कामीं चांगली मदत होण्याची अमेरिकेस आशा उत्पन्न झाली आहे.

हल्लीं अमेरिकन सैन्य फारच हळू हळू पुढें जात आहे स्पॅनिश लोकही फारशी घाई करीत नाहींत पण दोन्ही राष्ट्रांच्या या दिरंगाईनें क्यूबन लोकांचे फारच हाल होणार आहेत. स्पॅनिश लोकांची त्यांच्यावर अगोदरच नाराजी झालेली, आणि त्यांत अमेरिकन सैन्यानें त्यांस बाहेरून धान्य मिळण्याचें बंद केलें ह्मणजे तें क्यूबन लोकांजवळ असेल नसेल तेवढें धान्य द्यावयास चुकावयाचे नाहींत. असें झाल्यास त्या बिचाऱ्याचे किती हाल होतील याची कल्पना करवत नाहीं. स. वि.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखे „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... ........८१

Six monthly........ 3 ............. 8 as
Single copy ............................4 as

Advertisemen
Below 10 lines ......2 R
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII — AKOLA MONDAY 16 MAY 1898 — NO 19

वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख १६ माहे मे सन १८९८ इ० — अंक १९

जाहिरात.

सर्व लोकांस या जाहिरातीनें मी रामजी वल्लद हैबती लोहार रहाणार जवळें बुजरुक तालुके खामगांव असें जाहीर करतों कीं माझ्या मुलीची मुलगी नामे तान्ही हिची लहानपणापासून आई मेली व तिच्या बापानें दुसरा घरठाव करून मुलीस अजिबात सोडून दिल्यामुळे आमची नात ह्मणून तिला आह्मी लहानाची मोठी केली, व तिचें लग्न किसन वल्लद दगडु लोहार रहाणार मोरगांव यांच्याशी करून देऊन त्याला घरजावई करून आस घरी ठेविलें. व त्याजला घरजावई करून घरांत ठेविला त्याचा करारनामा असा करून घेतला कीं त्यानें आह्मास मरेतावल्काल पर्यंत ज्या प्रमाणें पोटचा मुलगा आईबापाचे सर्व प्रकारें संरक्षण करतो व सर्व निर्गत लावितो त्याप्रमाणें त्यानें आह्मांसि करावें. व यांत कोणचेंहि प्रकारचे अंतर देऊं नये. जर या करारा प्रमाणें त्याचे हातून वागणें सवरणें झालें नाहीं तर त्याजला आह्मी घर जावई करून घेतला तें सर्व करणें रद्द समजून आह्मी आपल्या नातीचा दुसरा घरठाव करून दावा वगैरे करावयाबद्दल रीतशीर कागद करून घेतला आहे. आता अलीकडे अदमासें ५।६ वर्षांत त्याचा कोठेंच कांहींएक कोणत्याही प्रकारानें पत्ता लागत नाहीं. मुलगी वयांत आली आहे. आह्मी थकत चाललों आहो. अशा प्रकारच्या दुर्दैवरीच्या गोष्टीमुळें त्याचा पत्ता लागण्या करितां बहुत प्रकारें शोध केला. परंतु त्याचा पत्ता लागत नाहीं. या करितां निरुपाय होऊन ही जाहिरात दिली आहे. तर सदर्हू मनुष्याचा आह्मास कोणी बरोबर १९ दिवसांचे आंत पत्ता लावून दिल्यास त्यास आह्मी ५ रुपये इनाम देऊं. असें झालें नाहीं तर व सदर्हू मुदतींत पत्ता न लागला तर आह्मी आमचे नातीचा घरठाव करारनाम्या प्रमाणें करून देऊन तिचा मार्ग सर्व रीतीनें खुला करूं. मग कोणचेही प्रकारचें बोलणें तिच्या नवऱ्याचें वगैरें कायद्या रीती प्रमाणें कांहीं राहीलें नाहीं. कळावें, तारीख ९ माहे मे सन सन १८९८ इसवी

सही

सहीची निशाणी ऐरण रामजी
वल्लद हैबती लोहार याचे
हातची असे.

वऱ्हाडसमाचार

मित्ती वैशाख वद्य ११ शके १८१९

इंडियन शेतकरी कर्जबाजारी असून कर्जा मध्यें अतोनात फसले आहेत. कर्जापासून त्यांची मुक्तता करावी ह्मणून सरकारांतून नाना खटपटी चालू आहेत तन्निमित्त सर जान वुडवर्न यांनीं एक कायद्याचा मसूदा कायदे-कौंसिला पुढें मांडला आहे; या मसूदाचा हेतु सावकाराच्या लटपटीमधून शेतकऱ्याला वांचविण्याचा आहे पण हा प्रयत्न शेतकऱ्यांची कर्जमुक्तता करण्याला फारसा उपयोगीं पडल असें वाटत नाहीं. शेतकरी कर्जां खालीं कसा बुडत आहे व त्याचीं कारणें काय काय आहेत याचा विचार योग्य प्रकारें सरकारानें केला नाहीं असें सर वेडरबर्न साहेबांचें ह्मणणें आहे. गेल्या 'इंडिया'च्या अंकांत त्यांनीं एक उत्कृष्ठ लेख लिहिला आहे. ते ह्मणतात कीं इंडियांतलें एक खेडेगांव ह्मणजे सर्व देशाच्या रचनेचे सूक्ष्म असें चित्रच होय. प्रत्येक खेड्यांत शेकडा ८० इसम शेतकरी असतात एका खेड्यांतील शेतकऱ्यास कर्जमुक्त करून सुखी करण्याचा जो राजमार्ग असेल तोच मार्ग सर्व देशांतील शेतकऱ्यांस लागूं पडेल. शेतकरी हा अगदीं सामान्य व गरीब मनुष्य आहे, आणि त्याच्या दुःखाची कारणें शोधण्याला व तीं दूर करण्याचे उपाय योजण्याला सरकारची चौकशी मोठ्या शोधकपणाची व बहुव्यापक अशी पाहिजे.

वीस वर्षां पूर्वीं दक्षिणेंतील शेतकऱ्यांच्या वाईट स्थिती बद्दल कमिशना मार्फत चौकशी झाली होती ती प्रत्येक खेड्याखेड्यातून होऊन चांगली समाधानकारक झाली होती. कमिशनरांच्या रिपोर्टाचे पांच भाग आहेत आणि त्यांतील माहिती इत्थंभूत व विश्वसनीय आहे. त्या वेळच्या कमिशनरांच्या एक महत्वाचा अभिप्राय असा आहे कीं सरकारी सारा रयतेला मोठा भारी वाटत असून साऱ्याचा तगादा मोठा सक्तीचा व कडकपणाचा आहे आणि त्यामुळें रयतेला सावकाराचा उंबरठा पुजावा लागतो. रयतेच्या सर्व दुःखाचें मूळ कारण हेंच आहे. एक वेळ शेतकरी सावकारी पेंचांत पडला आणि त्याच्या मागें दिवाणी कोर्टाचा ससेमिरा लागला ह्मणजे शेतकऱ्याचा समूळ विनाश होतो.

आतां, सर जान वुडबर्न यांनीं नवीन कायद्याचा खर्डा तयार करितांना आपला अनुभव उपयोगांत आणल्याचें दिसत नाहीं. रोग्याच्या रोगाची चिकित्सा बरोबर करून खऱ्या रोगावर योग्य औषधाची योजना होत आहे असें आह्मास वाटत नाहीं. कराराचा कायदा सुधारण्या विषयीं सूचना आणतांना सर वुडबर्न यांनीं जें संभाषण केलें त्यावरून शेतकऱ्याच्या कर्जमुक्ताविषयीं शास्त्रसिद्ध उपाय करण्याचा विचार दिसत नाहीं. १८७९ पासून आलेला अनुभव अगदीं बाजूला फेकून दिल्या प्रमाणें झाला आहे. उलटें, हल्लींच्या नव्या कायद्यानें सावकाराला बळी देण्याचा विचार केला आहे. हा नवा मसूदा अगदीं वरवरचा उपाय आहे आणि मूळ प्रश्न तसाच बाजूस राहिला. कावेबाज सावकाराशी देवघेव करीत असतांना अडाणी शेतकऱ्यांचें संरक्षण व्हावें ह्मणून हा कायदा तयार केलेला आहे. हा मूळ मुद्दाच अगदीं कोता आहे. शेतकऱ्याला जितका अडाणी किंवा भोळसर समजतात तितका तो अडाणी किंवा भोळसर नसतो. सावकाराकडे गेल्याशिवाय तोड नाहीं असें झालें ह्मणजे निरुपायास्तव तो सावकाराकडे जातो. सरकारी सारा मोठा जड जातो; तो वेळेवर वसूल झाला नाहीं तर सरकार जमीन विकून टाकते. शेतकऱ्याला आपली जमीन प्राणाहूनही अधीक मौल्यवान वाटते आणि ह्मणूनच ती आपल्या हातांतून जाऊं नये ह्मणून शेतकरी सावकाराच्या सर्व अटी कबूल करून त्याचें कर्ज काढतो. शेतकरी व सावकार यांच्यामध्यें कपटाच्या व लबाडीच्या देवघेवी फार थोड्या होतात असा वेडरबर्न याचा समज आहे. दुसऱ्याच्या पापाचा पाढा वाचण्याचा सद्गुण मोठा सोपा आहे आणि सावकारावर सर्व अपयश लादतांना सरकारनें परदोषकथनाचा सद्गुण चांगला दाखविला आहे. सर आर इगरटन पंजाबचे लेफटनंट गव्हरनर असतांना त्यांनीं १८७९ मध्यें सरकारच्या या सद्गुणावर चांगली खरमरीत टीका केली होती. ती टीका सर वुडवर्न यांच्या ध्यानांतून चुकली असें वाटतें. सरकारानें सारा वसूल करितांना सावकाराला किस्ता बांधून द्यावा पण तसें न करितां सरकार मोठ्या जुलमी सावकारा प्रमाणें वागतें व आपला सारा वसूल करिते. सावकार व कोर्ट या दोन गोष्टी शेतकऱ्यांचा ऱ्हास पूर्णतेला पोचवितात हें खरें परंतु शेतकऱ्याच्या नाशाचें आदिकारण ह्मणजे सरकारी जबर सारा व तो वसूल करण्याची कडक, सक्तीची व त्रासकारक शीस्त ही होय.

शेतकऱ्याचा खरा बचाव करणयाचा असेल तर सारा माफक करून कायद्यानें तो पक्का करावा, रयतेच्या सुस्थितीला हितावह अशा पद्धतीनें सारा वसूल करण्यांत यावा, आणि इंग्रजी कोर्टें रद्द करून लोकांसाठीं जुन्या पंचाईतीचीं कोर्टें सुरूं करावीं. या गोष्टी शिवाय शेतकऱ्याची पेढी निघून तिजवर माफक व्याजानें शेतकऱ्याला कर्ज मिळावें ह्मणजे जो तो आपापल्या शेतींत कालव्याचें पाणी घेईल किंवा खत घालील व शेती सुधारून आनंदानें व सुखानें राहूं लागेल. सर थिओडर होप ह्मणतात कीं शेतकरी ह्मणजे अगदीं ठार बुडाला आहे, त्याला सर्वत्र निराशा वाटते आणि त्याला आपल्या देशांतच कांहीं अर्थ दिसत नाहीं. कराराच्या व पुराव्याच्या कायद्याच्या सुधारणेनें खरी शेतकऱ्याची सुधारणा होण्याचा संभवच दिसत नाहीं !

---

आज दोन वर्षें मंगल कार्यास मुहूर्त नव्हते. एक सारखी सर्वांची कशाना कशा संबधानें तरी हळ हळ चालली होती. यंदा मात्र पुष्कळ सयोग आहेत. गांवोगांवीं लग्न-मौंजींची गर्दी उडाली आहे. पंचपकान्नांवर सर्वांचीं तोंडें पडलीं आहेत. मंगलमूर्ती वगैरे अभीष्ट देवदेवतांच्या चोहोंकडल्या आमंत्रणामुळें गडबड उडाली आहे. मग आह्मा मानवांची उडेल यांत मोठेंसें नाहीं. बाजंत्री, आचारी, पाणके, भटभिक्षुक, सोनार, शिंपी, दुकानदार रिठोळ गृहस्थ व इतर उद्मी लोक या सर्वांची खरोखरीची लग्नघटका खोळंबली आहे. जरा इकडे तिकडें करीन ह्मटलें तर फुरसत नाहीं. सध्यां सर्व तऱ्हेनें सर्वांचीं तोंडें आनंदानें प्रफुल्लीत दिसतात ही ईश्वराची कृपाच आहे. असेच सुखाचे दिवस सतत आपणास दाखीव ह्मणून ईश्वरास अनन्यभावें सर्वांनीं शरण जावें मग कसलीहि ददात पडणार नाहीं.

हे दिवस ह्मटले ह्मणजे ऐन उन्हाळ्याचे. ऊन, झळा, घाम यांनीं अंगाचें पाणी पाणी होऊन मनुष्य पिळून निघतो. कांहीं काम करायाला उत्साह वाटत नाहीं. हुष हुष करण्यांत जीव थकून जातो. गांवांत कार्यें पुष्कळ होतात. जेवणाचीं आमंत्रणेंही फार असतात. पण या दिवसांत फारच मौज असते. अंगाची तलखी होतच असते. पाय भाजत, ऊन खात. तें जेवणास जायचें. भोजनकाळ येईपर्यंत पोटांत कावळ्यांचा काहूर झाला असतो. पुढें तरी गोड गोड दोन घास घातले नाहींत तोंच तहान लागते. थंडगार पाण्यासाठीं कंठशोष होतो. अशा वेळीं पाणी वाढूं नये, मग जी काय बहार होते ती विचारूं नका. या दिवसांत तर जलमय प्राण असतो. आणि याच दिवसांत पाण्याची हकाटी. नळ, नद्या, विहिरी आटून लोकांचे फार हाल होतात, ज्या गांवांत पाण्या संबंधानें विशेष काळजीनें व्यवस्था राखतात तो गांव सुखी व ते लोक आपल्या अधिकाऱ्यांस दुवा देत असतील यांत शंका नाहीं. जेवणाखाणांत, कामकाजांत व्यवस्था राहील तर किती सुख होईल.

"हौशीला मोल नाहीं" हौस ह्मटली कीं मग त्रास ह्मणून उरत नाहीं. मनुष्य हौशी साठीं काय वाटेल तें करितो, तहान, भूक, ऊन वगैरे कांहींच श्रम वाटत नाहीं. उलटें आनंद दुणावत जातो. कोठें कोठें तर भर दोनप्रहरीं वरात निघते, किंवा पायघड्यांचा विहिणींचा सोस पुरवला जातो. रखरखीत उन्हांतून मिरवण्याची हौस, तळतळत जेवायला जाण्याची हौस. सर्वत्र हौस

मग मध्यें कांहीं आलें तरी मनाचा विरस होणें नाहीं. खरोखर अशी हौस इतर सत्कृत्यें करण्या साठीं जर वाटेल व ती आपण मनसोक्त जर पुरवूं तर काय बरें मजा होईल.

सरदार श्रीमंत बळवंत रामचंद्र उर्फ बाळासाहेब आणि हरी रामचंद्र उर्फ तात्यासाहेब नातू यांस बेळगांवास नेऊन तेथें बंधमुक्त करण्यांत आलें ही मोठी आनंदाची गोष्ट होय ! सरदार तात्यासाहेब नातू यांस प्रथम ठाण्याच्या तुरुंगांतून मुंबईला नेलें आणि तेथून पुण्याकडून बेळगांवास नेलें. त्यांच्या बरोबर पोलिसाचा पाहरा होता. बेळगांवास पोंचल्या नंतर सरदार तात्यासाहेब यांस बेळगांवच्या किल्ल्यांत राहण्यास सांगून तेथें त्यांस कैदेंतून सोडलें. त्यांच्या मागून एक दोन दिवसांत त्यांचे वडील बंधु सरदार बाळासाहेब यांस अमदाबादेहून बेळगांवास नेऊन त्यांस कैदेंतून मुक्त केलें. उभयतां सरदारांस पुण्यास जाण्याची मोकळीक नाहीं तथापि दुःखांत सुख एवढेंच कीं तुरुंगांत दिवस काढण्याचें तापत्रय नष्ट झालें. बेळगांवच्या किल्याची जागा राहण्यासाठीं निर्दिष्ट केली आहे.

लेफटेनंट एअर्स्ट व मि. र्‍यांड यांचे खून पुण्यांतील धुमाकुळीला कारणीभूत झाले. या खुनांस राजकीय स्वरूप देण्यांत आलें, वर्तमानपत्रकर्त्यांवर राजद्रोहाचे खटले झाले, सरदार नातूंस अटकेंत ठेविलें, राजद्रोहाबद्दलचा कायदा नवीन दुरुस्त करण्यांत आला इत्यादि नानाविध गोष्टी मोठ्या दुःखाला कारण झाल्या. राजा व प्रजा यांच्यामध्यें अविश्वास उत्पन्न झाला. सर्वत्र बंडाचें चित्र भासूं लागलें आणि राजकीय वातावरण या राजद्रोहाच्या वायूनें सर्वत्र दूषित झालें. ईश्वरकृपेनें राजद्रोहाचीं अभ्रें दुरावलीं, आकाश स्वच्छ झालें आणि खूनी बिचारा दामोदर चाफेकर फांसावर प्राणास मुकला ! सदर्हू खुना संबंधानें सांकेतिक कट वगैरे नव्हता, व त्या गोष्टींत दुसऱ्या कोणाचें अंग नाहीं अशी मुंबई सरकारची खात्री होत चालली आहे. सत्याचा प्रकाश सरकारच्या हृदयांत पडूं लागल्या पासून पश्चात्तापाची विकृती सरकारला जडली पाहिजे होती. परंतु स्वकृतीला मंडन करण्याची हौस मोठी असल्या मुळें विलायत सरकारा पासून मुंबई सरकारा पर्यंत सर्व अधिकाऱ्यांनीं आपल्या गत चुक बद्दल दुःख देखील प्रदर्शित केलें नाहीं आणि सर वेडरबर्न यांच्या प्रश्नाला उडवाउडवीचें उत्तर देतांना लार्ड हामिल्टन यानीं सरदार नातूंस सोडण्या बद्दलचा सर्व हवाला मुंबई सरकारावर सोंपविला होता.

सरदार नातूंस बंधमुक्त केलें ही सरकारची मोठी कृपाच होय. पुण्यास हल्लीं स्वस्थता व शांतता विलक्षण आहे तथापि देखील त्यांस पुण्यात राहूं देण्याचा सरकारचा धीर झाला नाहीं. सरकारांत प्रांजलपणा व सत्यनिष्ठा कमी आहे असा पुष्कळ विद्वानांचा समज आहे. दोघा युरोपियनांचा खून पुण्यास झाल्याबरोबर सरदार नातूंचा संशय आला व तो संशय अखेरीला खोटा ठरला असें लार्ड सांडहर्स्ट यांनीं बोलून दाखविलें असतें तर त्यांच्या विषयीं लोकांच्या मनांत कृतज्ञता व आदरबुद्धि जागृत झाली असती परंतु हा काल प्रांजलपणाला फारसा अनुकूळ नाहीं ही गोष्ट नव्यानें सांगण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.

सन १८२७ चा २५ वा कायदा मुंबईइलाख्याला लागूं आहे. तो कायदा किती घातुक, अप्रासंगिक व इंग्रजीला काळिमा आणणारा आहे हें प्रजेच्या लक्ष्यांत पक्केपणीं येऊन चुकलें आहे. सुधारलेल्या कोणत्याही राष्ट्रांत प्रजेला बिनदिक्कत गुलामगिरी देण्याचा असा कायदा विद्यमान नाहीं. १८२७ सालीं ज्या कायद्याची जरूरी वाटली तो कायदा १८९८ सालीं चालूं ठेवण्याला ७० वर्षे पूर्वींचीं राजकीय कारणें प्रचलित असलीं पाहिजे होतीं; परंतु या कायद्याच्या अंमलबारीनें सरदार नातूंस निराधार व चवकशी शिवाय कैदेंत ९ महिने रहावें लागलें. या कायद्याची प्रचंड शक्ती सरदार नातूंच्या कैदेनें चांगली व्यक्त झाली तर असा स्वतंत्रतेवर गदा घालणारा कायदा जितका लवकर बंद होईल तितकें फार बरें!

बारिस्टर मि. प्यु हे राजश्री बाळगंगाधर टिळकांच्या खटल्या संबंधानें संभाषण करितांना प्रथम बोलले कीं पुण्यास जर दोघा यूरोपियनांचे खून झाले नसते तर राजद्रोहाचे फौजदारी खटले वर्तमानपत्रकर्त्यांवर झालेच नसते. ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि ह्मणूनच खुनी चाफेकर फांशी गेल्या नंतर आह्मी मुंबई सरकारास विनंती करितो कीं राजश्री टिळका सारख्या शहाजोग रत्नमाणसांवर सरकारनें आपली इतराजी ठेवूं नये, त्यांच्यावर कृपादृष्टी ठेवावी आणि त्यांच्या सारख्यांस कैदेची शिक्षा माफ करून त्यांस पुन्हां समाजांत येऊं द्यावें. त्यांच्या कैदेमुळें अनेक लोकोपयोगी संस्था अनाथ झाल्या आहेत. तर राजश्री टिळक यांस बंधमुक्त करून सर्व इंडियनांस आनंद द्यावा यांत सरकारचा मोठेपणा होऊन परिणामीं निदान भलीभलाई आपोआप मिळेल.

प्रस्तुतचे व्हाईसराय लार्ड एलजिन यांची पांच वर्षांची कारकीर्द संपत आली आहे तेव्हां त्यांच्या मागून नवे व्हाइसराय कोण येतात हें पाहण्याकडे सर्व राष्ट्राचे डोळे लागले आहेत. लार्ड एलजिन यांच्या कारकिर्दींत इंडियन लोकांची निराशा मोठी झाली आहे आणि राजकीय चळवळी मुळें लोकांचीं मनें अत्यंत उद्विग्न झालीं आहेत. लष्करी खात्याचें वर्चस्व झालें, मि. चामर्स यांच्या सल्ल्यानें जुलूमी कायदे नवीन झाले, व मुंबई सरकाराच्या हातून अनर्थप्रद गोष्टी घडल्या, यामुळें लार्ड एलजिन अगदीं अप्रिय होऊन त्यांचा आपल्या कौंसिलावर किंवा स्टेट सेक्रेटरीवर कांहींच दाब राहिला नाहीं. कळसूत्राप्रमाणें लार्ड एलजिन वागत होते. ही गोष्ट त्यांच्या नांवलौकिकाला कमीपणाची होती व तिच्यामुळें इंडियावर नाना अनर्थ ओढवले. अशा संकटाच्या समयीं नवे व्हाईसराय चांगले जोरदार मुत्सदी असावेत अशी इच्छा होणें स्वाभाविक आहे. व्हाइसरायच्या जागेला सध्यां चार पांच उमेदवार आहेत. त्यामध्यें मुंबईचे माजी गव्हरनर लार्ड हारिस हे एक आहेत. यांच्या पेक्षां चांगला मनुष्य व्हाईसरायच्या जागेला जर मिळाला नाहीं तर या देशाचें मोठें दुर्भाग्य होय. लार्ड हारिस यांच्या नांवाचा वीट लोकांस आला आहे आणि त्यांच्या मागील इतिहासा वरून व त्या वेळच्या संपादलेल्या सन्मानाच्या सरटिफिकीटा वरून लार्ड हारिस यांची नेमणूक सर्व बाजूनीं निंद्य होईल यांत काडीमात्र शंका नाहीं. मि. कर्जन यांचें नांवही विद्यमान उमेदवारांत आहे. हे गृहस्थ तरुण आहेत आणि त्यांच्या ज्ञानाचा विकास आणखी कांहीं वर्षांच्या अनुभवाशिवाय चांगलासा होणार नाहीं. यांचीं मतें सरहद्दी वरील लढाईला अनुकूळ होतीं! त्यांच्या मताला अनुभवाची वजनदारी अद्याप आली नाहीं आणि सांप्रतच्या वेळीं नवशिक्या किंवा कोत्या विचाराचा व्हाईसराय कांहीं कामाचा नाहीं. नव्या व्हाईसरायाला इंडियाची माहिती इत्थंभूत पाहिजे आणि त्या कारणासाठीं आह्मी लार्ड बालफोर यांची नेमणूक देखील पसंत करीत नाहीं. लार्ड लारेन्स जसे बहादर व्हाईसराय होऊन गेले तसा बाकबगार व अनुभवी मुत्सद्दी आह्मास सध्यां अवश्य पाहिजे. लार्ड बालफोर पेक्षां आह्मी वायव्य प्रांताचे लेफ्टेनंट गव्हरनर सर ए. म्याकडोनाल्ड यांस मोठ्या प्रेमादरानें कबूल करूं. सर म्याकडोनल्ड लार्ड नाहींत हें खरें पण त्यांच्या हातून इंडियाचें कल्याण होऊन ब्रिटिश सरकारच्या कीर्तीला कांहींसा उजळा मिळेल. सर म्याकडोनल्ड प्रमाणें लार्ड क्रोमर जर व्हाईसराय होतील तरी देखील आह्मी आनंद मानूं. महापुरुष लार्ड रिपन यांच्या वेळीं हे इंडियाचे फडणीस होते. लार्ड रिपन साहेबांच्या तालिमेंत तयार झालेले गृहस्था विषयीं सर्व राष्ट्र माना डोलवील. गेल्या १५ वर्षांत इजिप्त मध्यें इंडियाचे जुने फडणीस सर डेव्हीड बारबर यांनीं उत्तम कारभार चालविला आणि ह्मणूनच ते लार्ड क्रोमर या नांवाच्या किताबाला पोंचले. लार्ड क्रोमर साहेबा मध्यें इंडियन लोकांचा मोठा विश्वास आहे आणि त्यांची नेमणूक लार्ड एलजिनच्या मागून होईल तर इंडियन राष्ट्राला सुदिन उगवल्या प्रमाणें होणार आहे.

कलकत्यास प्लेग उद्भवला असल्या विषयीं सरकारी जाहिरनामा लागल्या पासून कलकत्यास सर्वत्र दंगा व कल्लोळ उसळला होता. प्लेगाला प्रतिबंधक उपाय सरकारांतून योजण्यांत आले या संबंधानें गैरसमज अतिशय झाला. लोकांचीं मनें बिथरलीं. प्लेगाच्या दवा जुलूमानें दरमाणशीं काढतात, घरोघर तपासणी सूरू आहे, ताप आलेल्या मनुष्यास निराळा ठेवितात इत्यादि गोष्टी सर्व श्रुत झाल्या बरोबर मोठा अनर्थ उसळला! लोकांनीं आपले धंदे सोडले. ते घरांत लपून राहूं लागले. आणि ज्यांस फावलें ते कलकत्ता सोडून सैरावैरा पळूं लागले. अशा आपत्तीच्या वेळीं बंगाल्याच्या नेटिव वर्तमानपत्रांनीं सरकारची सेवा मोठी केली आणि लोकांचीं मनें स्वस्थ व शांत केलीं. 'बंगवासी' पत्रकर्त्या संबंधानें 'पायोनिअर' पत्रानें मोठी वहावा केली आहे. नेटिव वर्तमानपत्रें सरकारास केवढी दांडगी मदत करितात ही गोष्ट कलकत्याच्या सांप्रतच्या स्थिती वरून कळण्या सारखी आहे. प्रत्यक्ष प्लेगा पेक्षां त्याच्या प्रतिबंधक उपायांनींच सर्वत्र दंगा उसळून दिला होता. सरकारी अंमलापेक्षां लोकांच्या हातून बंदोबस्त चांगला उत्तम होतो हें कलकत्याच्या उदाहरणावरून शिकण्यासारखें आहे.

पुण्याच्या वर्तमान पत्रांवर एक चिकित्सक कमिटी नेमण्यांत आली असून मुंबई सरकारनें सध्यां सिटी माजिस्ट्रेट, मामलेदार व पोलिस इनस्पेक्टर यांस कमिटींत सरकारतर्फें सभासद नेमून रावबहादूर विष्णु मोरेश्वर भिडे व प्रोफेसर गणेश गोपाळ गोखले यांस लोकांच्या बतीचे सभासद नेमिलें आहे. या कमिटीनें पुण्याच्या पत्रांतील लेखावर नजर ठेवावी असा सरकारी हेतु दिसतो. वर्तमानपत्रांचें कर्तृत्व आपल्या हातीं प्रत्यक्ष घेतलें नाहीं तथापि वर्तमान पत्रांला दिशा दाखविण्याची कर्तुमकर्तुम शक्ति आपल्यो हातीं ठेविली आहे. नव्या कायदा प्रमाणें वर्तमान पत्रकर्त्योंकडून जामीन घेण्या पेक्षां मुंबई सरकाराचा हा उपाय विशेष माणसकीचा आहे ही गोष्ट आह्मांस कबूल आहे. या कमिटीच्या चरका खालीं देशी पत्राचे स्वातंत्र्य चक्काचूर होईल. कमिटी ह्मणजे सरकारचा कोतवाली पाहरा होय. त्याच्या देखरेखी खालीं सरकारच्या विरुद्ध कोणी पत्रकर्त्याची लेखणी चालेल अशी शंका देखील घेण्याला स्थळ नाहीं. पुण्याचीं पत्रें सध्यांच निराश होऊन कुचकामाचीं होत चाललीं आहेत आणि तशांत ही कमिटी बसली ह्मणजे पत्रकर्त्यांवर एका प्रकारची कोतवाली देखरेख राहील.

या कमिटीचा कांहींच फायदा होणार नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं. पण तत्वशः ही कमिटी चुकीच्या पायावर रचलेली आहे. राजद्रोहाच्या नव्या कायद्यानें जबरदस्त उपांग ह्मणजे ही नवी कमिटी होय. मतभेदाचें प्रायश्चित्त या कमिटीच्या कृपेनें चांगलें मिळेल, प्रसंगोपात कमिटीच्या शिफारशीवर पत्रकर्त्योंकडून सद्वर्तना बद्दल जामीन घेण्यांत येईल आणि अखेरीला फौजदारी खटला करून त्याला शिक्षा करण्या पर्यंत देखील मजल पोहोंचेल. मुंबई सरकारचें अनुकरण इतर प्रांतिक सरकार करितील अशी आह्मास खात्री नाहीं पण अनुकरणाची इच्छा बलवत्तर असते ही गोष्ट राजश्री टिळक यांच्यावरील खटल्याच्या वेळीं चांगली कळून आली. मुंबई [illegible] राष्ट्रीय सभेच्या वेळीं वऱ्हाडच्या अधिकाऱ्यांनीं जोरानें चालू केलि होती पण ईश्वर कृपेनें सर्व गोष्टी निर्विघ्नपणें पार पडल्या. मुंबई सरकारानें जशी वर्तमानपत्रावर चिकित्सक कमिटी नेमिली आहे तिच्या धर्तीवर प्रांतोप्रांतीं हें कमिटीचें वेड सुरूं होण्याची मोठी भिती आहे. विचारस्वातंत्र्य व लेखनस्वातंत्र्य ही ब्रिटिश राज्याची उत्युत्कृष्ट देणगी आहे आणि ती जर आमच्या हातून कृत्रिम उपायांनीं हिरावून नेली तर इतक्या वर्षांचा ब्रिटिश अंमल खरोखर दुःखाला मूळ कारण झाला असें होईल. सध्यां राजनीतीचें जहाज वाऱ्याच्या झोंकानें झुकांड्या खात आहे आणि तें स्थीर स्थावर करण्या लायक व्हाईसराय आह्मांस मिळेपर्यंत कोणतेहि आ-

शासुख देखील या देशाला मिळण्याचा संभव नाहीं!

इंडियन नाण्या संबंधानें मोठे फेरफार करण्याचें घाटत आहे. उत्तरोत्तर सोन्याचा भाव तेजीवर आहे ह्मणजे त्या मानानें चांदीचा भाव उतरत आहे. या फरकामुळें इंडियाच्या कारभारांत मोटा घोटाळा झाला आहे. सोन्याचा भाव चांदी मध्यें वाढल्यामुळें सरकारला विलायतेस पाठविण्याच्या रकमा पौंडा मध्यें ह्मणजे सोन्याच्या नाण्यामध्यें असल्यामुळें पूर्वी पेक्षां रुपये अधीक पाठवावे लागतात पूर्वी पौंडा मागे १० रुपये पाठवावे लागत त्या ऐवजीं आतां १५ रुपये देऊन देखील भागत नाहीं. विलायेशीं इंडियाचा संबंध सर्वस्वी पडल्यामुळें राज्यकारभाराचा व व्यापाराचा बोजा इंडियावर अधीक पडूं लागला. या जादा रकमेला हुंडणावळीचा खर्च असें ह्मणतात गोऱ्या अधिकाऱ्यांस पूर्वींच्या रुप्याच्या नाण्यामधील पगार कमी वाटूं लागला कां कीं पूर्वी १० रुपयांनीं विलायतेंतल्या १ पौंडाचें काम होत असे तेथें आतां १५ किंवा १६ रुपये प्रत्येक पौंडा मागें पाठवावे लागतात; ह्मणून सरकारी हुद्देदारांनीं आपापल्या पगारावर हुंडणावळीची मनोती ह्मणून कांहीं जास्त रक्कम आकारून घेतली. चांदीचा पुरवठा कांहीं कमी होईना आणि सोन्याचा भाव वाढत चालला तेव्हां मोठ्या पराकाष्ठेनें सन १८९३ सालीं इंडिया सरकारानें आपल्या चांदीच्या रुपयाची किंमत कमी न होऊं देण्याची युक्ती काढली. ती युक्ती अशी कीं रुपयांचें नाणें व्यापारी लोकांस नवीन पाडून देऊं नये असा १८९३ च्या जून मध्यें ठराव केला. या ठरावा प्रमाणें सरकारी टांकसाळी खानगी नाण्या साठीं बंद करण्यांत आल्या. रुपयाच्या चांदीची जी किंमत बाजारभावानें येईल तिच्या पेक्षां रुपयाची किंमत नाण्याच्या रूपानें वाढविली. सरकारी रुपया चांदीच्या किंमतीनें कमी भरला तरी सरकारांत त्याची किंमत कायमच ठेविली. नवीन नाण्याचा पुरवठा बंद झाला, जुन्या नाण्यावर सर्व लोकाची भिस्त पडली आणि अर्थात गेल्या पांच वर्षांत सरकारी नाण्याची कृत्रिम किंमत वाढली आहे. व्यापारांत जें नाणें गुंतलें आहे त्याचा खजिना कमी कमी केला तरी देखील सरकाचा इष्ट हेतु पूर्णपण सिद्धीस गेला नाहीं. [illegible] हेतु असा कीं एका पौंडाची किंमत १५ रुपया [illegible] १५ रुपयावर पौंडाचा भाव येऊन बसला ह्मणजे सरकारचा संकल्प सिद्धीस गेला असें होईल. १८९३ च्या युक्तीनें पुरेसें यश आलें नाहीं ह्मणून यंदा त्याच तत्वाचा प्रसार जोरदारीनें करण्याचा सरकारचा विचार आहे. गेल्या पांच वर्षांच्या अनुभवानें असें निदर्शनास आलें आहे कीं १८९३ सालीं जो रुपयांच्या नाण्याचा सांठा होता तो त्या पुढें वाढला नाहीं तरी तो व्यापाराच्या व इतर जरुरीला पुरेसा होता. तेव्हां आतां विचार असा आहे कीं हा नाण्याचा पुरवठा कमी करण्यासाठीं हल्लीं चालूं असलेलें नाणें कमी करावें व तें सरकारांत जमा झाल्या बरोबर वितळवून त्याची चांदी करावी. सुमारें २४ कोट रुपये उपयोगांतुन कमी करावे आणि त्यांच्या ऐवजी १ कोट ६० लक्ष पौंडाची सोन्याचीं नाणीं इंडियांत चालूं करावी. सरासरी ६ कोट रुपयांचें नाणें दरसाल व्यापारांत खेळत असतें. १६० लक्ष पौंड नाणें इंडियांत आणण्यासाठीं त्या मानानें सोन्याचा खजिना इंडिया सरकारापाशीं शिल्लकींत पाहिजे. इंडिया सरकार कर्जबाजारी आहे व त्या सरकारची बाजारांत मोठीशी पत आहे असें दिसत नाहीं ह्मणून विलायत सरकारनें पार्लमेंटाच्या हुकूमानें इंडिया सरकारला जामीन व्हावें आणि २ कोट पौंड किंमतीच्या सोन्याचा पुरवठा इंडिया सरकारानें त्या जामिनकीच्या जोरावर कर्जाच्या रूपानें उभारावा. एवढें कर्ज काढलें ह्मणजे इंडियाच्या रुपयाचा भाव दर पौंडास १५ रुपये प्रमाणें येईल आणि हल्लींच्या चलनी नाण्यांतून हा भाव येण्या इतकें नाणें ह्मणजे सुमारें २४ कोट रुपयांचें नाणें नाहींसें होईल. या २४ कोट रुपयांत सरकारी कागदी नोटांचाही समावेश होतो.

या कृत्रिम उपयांनीं रुपयाची किंमत वाढली तरी सरकार कदाचित् आपल्या विलायतच्या कर्जाचा बोजा कमी करील. परंतु त्याचा परिणाम गरीब रयतेला मोठा अपायकारक होण्याचा संभव आहे. नवीन कर बसविण्याची सोय नाहीं ह्मणून सरकार अप्रत्यक्ष रितीनें रयतेवर आपला कराचा बोजा वाढवीत आहे. इंडिया देश मूळ शेतकीचा आहे आणि साऱ्याचें उत्पन्न ह्मणजे सरकारच्या एकंदर उत्पन्नापैकीं दांडगी बाब होय. रुपयाची किंमत वाढल्यामुळें १०० रुपये जुना सारा ह्मणजे नवीन किंमतीच्या मानानें ११५ किंवा ११६ रुपये हल्लींच्या भावानें भरावे लागतील ह्मणजे पूर्वींपेक्षां साऱ्याच्या रकमे साठीं अधीक धान्य विकवें लागेल. या प्रकारानें प्रजेवर एक निराळाच कर लादल्या प्रमाणें होणार आहे. इंडियन शेतकरी आला माल साऱ्या पुरता विकतो. आणि बाकीच्या मालावर आपला चरितार्थ चालवितो. त्याच्या सर्व गरजा थोड्या व माफक असतात आणि त्या मानानें त्याला हुंडणावळीच्या भावामध्यें फरक पडला तरी फिकीर नसते. परंतु रुपयाची किंमत लटकीच वाढविली तर साऱ्याच्या रूपानें त्याला अधीक कर पडेल, त्याच्या चांदीची किंमत उतरल्यामुळें त्याची ऐपत पूर्वी पेक्षां कमी होईल आणि या नव्या कृत्रिम उपायांनीं इंडियन राष्ट्राचें सर्वथैव नुकसान होईल. ह्या नुकसानी संबंधानें सरकारच्या विरुद्ध आपण निकरानें व राजमार्गानें लढलें पाहिजे. [illegible] बसण्याची वेळ निघून गेली आहे आणि आतां सरकारला लोकमत अगदीं निर्धास्तपणानें व नम्रपणानें कळविलें पाहिजे.

The Berar Samachar

MONDAY, MAY 16 1898.

Educationists of note have found fault with the present system of education in India. It fails to develop the whole of the human organism. Education is purely literary and calls forth into activity the mental energies. The physical development is neglected altogether. The mind is trained to the utter loss of all bodily forces. A sound mind in a sound body is no longer the real motto of the modern education. This short-coming is vividly put forth in a striking light when we find our educated people lacking in the bodily strength to pursue any work of honest manual labour. An educated man looks up in his face as one who is quite knocked down by the mental strain and cannot put up with any profession that asks of him a certain measure of physical labour. The effect is plain enough. The mind does not go on well with the body and one splinters away to create a crack in the physique of man. Mr. Vishnu Moreshwar Mahajani, a darling jewel of the province, is alive to these defects. He is however highly optimistic and constructive in his theories. He is rather prophetic in his efforts in the educational department when he has already set in motion the mission to improve the physical side as well as the mental one of the rising generation. He is thinking of a plan that will change even the venue of education. The class—room is not the only place where education is imparted. He would add an experimental field to teach agriculture or a smith's furnace to train the hand or the eye. His power of control is of course limited but he advocates liberal education as the stepping stone or the threshold to any training of a technical kind. Education is liberal when he finds it to develop both the mental and physical sides of mankind. Mr. Mahajani bases his theory of *liberal* education upon the course of nature. Nature is the great agent and factor in education and it is of no use to arrest or stop the progress of physical energies by straining, to the extreme degree, the mind so as to assimilate the rich literature that the world's store of books spreads before it. The book of nature must be opened as well. In Bacon's time there was the reversal of the scholastic philosophy and men then tried to return to nature to study its secret workings. The central idea of education was then to extend our control over nature and to make it subserve the mankind to the greatest glory of god. In India, there is at present a similar danger. India is now purely agricultural. She has ceased to be an industrial nation. The manufacture of the European nations has closed the Indian industries. The steam and the electricity have no magic power with an Indian though he sees that the triumph over these forces of nature have made the present nations what they are. India is down—trodden and grovelling in ignorance whereas England, Germany, the United States and even Japan have won the highest victories of the day. They thrive as nations. In India, education fails to train up the rising young people to the necessary standard of making India an industrial and materially prospering nation. In short, there is neither the liberal edu—cation nor the technical one that should precede the rise of India as a nation. The present want is to fit up our young people with a certain fund of mental and physical education. It should be a preparatory ground and should give a fair start to the young student in his next course of training himself for some profession or the other. We are very backward as a race because we cannot keep pace with the educational systems in the most civilized countries in the world. Our political movements also come to a stand-still because there is the absence of the real fire or steam to move on the engine of material wealth which is the fountain—head of all in—dependence, self—dignity and loyalty to the throne.

We maintain that the proposed change in the Law of contract is a half—hearted measure and will be as useful as a reed or a straw to a drowning agriculturist. He is immensely indebted to his money—lender and no change as foreshadowed in the legislative measure will avert the danger. The great want of the day is 1st the institution of the agriculturel banks and 2ndly that sort of technical training which will make people more conversant with their daily business. We give below a similar opinion of the learned editor of the Pioneer in support of our view because it comes from the well known organ of the government:—

"The most elaborate and intricate code of regulation will overlook the contingencies that will actually arise. But the whole problem would be solved once for all if the principle were recognised that courts are not bound to enforce contract merely as such: that a contract as such is merely a memorandum of agreement between two persons or more, and that all persons must mainly depend for the fulfilment of contracts on their own judgment of character and on the all-round *bona fides* of the engagements into which they enter. The law need not— under such a dispensation as we are imagining—refuse in any narrow and bigoted fashion to enforce contracts; it would merely say to the plaintiff "what are the peculiar circumstances of this case that make you think the contract one that ought to be specially enforced?" It would be for him to show some good reason outside the bare fact that he had been disappointed in his bargain, before he could set the machinery of the law in motion. At one blow, of course, such a rule of law would put an end to all immoral money-lending transactions. Probably many people brought up in prevailing habits of thought will say such a remedy would be worse than the disease; but it has often been said that almost all the legislative triumphs of advancing intelligence consist in the abrogation of law that a less advanced intelligence had enacted in the first instance. That law—as it stands —consists largely, how largely we will politely leave uncertain, in the rules bequeathed by the imperfect wisdom of our ancestors is tolerably obvious. Whether in the progress of reform it will ever be decided that the whole law of contracts belong to that category, is a question that different readers will no doubt decide dif—erently."

## वऱ्हाड

हवामान—उष्णतेचें मान फार उतरलें वारा मोठ्या सोसाट्याचा वाहतो. मध्यंतरीं पाऊसही किंचित् पडला. यंदा पर्जन्यकाळाला प्रारंभ लवकर होईल असा रंग दिसतो. किरकोळ दुखणीं जोरावर आहेत.

मि. मीर अनवर अल्ली एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे रजा संपतांच वाशिमास रुजूं व्हावयाचे होते पण त्यांची बदली अकोल्यास झाल्या प्रमाणें ते येथें दाखल झाले.

रा. रा. गणेश बापूजी उटगीरकर एक्स्ट्रा असि. कमिशनर हे अकोल्यास दोन दिवस मित्रमंडळीच्या भेटीसाठीं राहून गेल्या शुक्रवारीं वाशिमास रवाना झाले.

येथील नदीच्या काठीं खोंदलेल्या दहिहांडा वेशीजवळील विहिरींत एक बाई पडून मरण पावली.

मे. मीडो साहेब डिपुटी कमिशनर यांची स्वारी आकोटास कचेऱ्या तपासण्यासाठीं गेली असून आजच्या कचेरीला परत येईल.

वर्तमानसार.

प्लेगचा रोग सुरू झाल्यानें कलकत्त्याची स्थिती फार चमत्कारीक झाली आहे. शहरांतले हजारों लोक विशेषेंकरून बायका व मुलें शहर सोडून पळून जाऊं लागलीं आहेत. रेलवे, नावा व रस्ते अगदीं भरून चालले आहेत. मागच्या शुक्रवारीं नुसत्या रेलवेनेंच नेहमींपेक्षां १२,००० उतारू अधिक बाहेर गेले, व त्या करतां पांच स्पेशल गाड्या काढाव्या लागल्या. जलमार्गानें व पायवाटेनें गेलेल्यांची संख्या निराळीच आहे. शनिवारीं सहा स्पेशल गाड्या निघून ४०,००० उतारू बाहेर गेले. दिवसा व रात्रीं स्पेशल गाड्या सारख्या चालूंच आहेत. हौरा येथील पायवाटेच्या पुलावर प्रवाशांची इतकी गर्दी होते कीं, त्यांस चालण्यासही वाट मिळत नाहीं. गाडीवाल्यांचा दुष्काळ झाला असून गाड्यांचीं भाडीं इतकीं वाढलीं आहेत कीं ४ आण्याच्या ठिकाणीं ४ रुपये भाडें मागतात व लोक तें भराभर देतात. म्युनिसिपालिटीच्या रस्ते झाडणाऱ्या वगैरे लोकांत फारच चळवळ झाली आहे, पखालींनीं पाणी शिंपणाऱ्या भिस्त्यांनीं आपलें काम बंद केलें आहे. एक भिस्ती आजारी होऊन मेला. व त्यास एका म्युनिसिपल डाक्टरानें एक गोळी दिली व तो मेला अशी इतर भिस्त्यांची समजूत झाल्यानें लोकांत अनेक प्रकारच्या बातम्या पसरूं लागल्या आहेत. मुसलमानलोकही फार चवताळल्या सारखे दिसत असून ता. ३० रोजीं दंगा होण्याचीही भीती वाटत होती.

स्पेन व अमेरिका यांच्या दरम्यानची लढाई थोडे दिवस तरी चालेल असें वाटत होतें, पण त्याचा आरंभ व शेवट एकदमच झाला. स्पेनसारख्या लहानशा राष्ट्रानें अमेरिकेशीं सामना करण्यास तयार होणें हेंच मुळीं आत्मघातकीपणाचें आहे आणि परिणामीं तेंच खरें झालें. या लढाईचा आद्यंत एकदमच झाल्यामुळें पुष्कळ प्राणहानी वाचली हें चांगलें झालें, स्पेनसरकार चांगली तयारी केल्यावाचून लढाईस उभे राहिल्यानें स्पेनच्या सगळ्या लोकांची नामोशी झाली याबद्दल स्पेनचे लोक जे चवताळले आहेत त्याचा परिणाम स्पेनची राजसत्तात्मक राजव्यवस्था नष्ट होऊन प्रजासत्ताक होण्याचा जो रंग दिसूं लागला आहे त्याचें काय होतें हें पहाणें आतां फार महत्वाचें झालें आहे.

कलकत्ता मुनिसिपालिटीकडून पुढील प्रमाणें एक जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत आलाः—कलकत्ता शहराविरुद्ध सरकारातून क्वारन्टाइन बसविण्यांत येणार नाहीं. घरांतल्या सर्व माणसांनीं टोंचून घेतल्यास त्यांच्या वर सेग्रेगेशनची सक्ती करण्यांत येणार नाहीं. म्युनिसिपालिटीनें नेमलेल्या योग्य अशा स्त्री अगर पुरुष डाक्टरनें रोग्यास पाहून त्याची तपासणी केल्या वाचून तो प्लेगचा रोगी आहे असें ठरविण्यांत येणार नाहीं कोणाही स्त्रीस किंवा पुरुषास त्याच्या कुटुंबापासून वेगळें करण्यांत येणार नाहीं. बाहेर काढणें भाग झाल्यास जेथें पडद्यांत राहणाऱ्या स्त्रियांची योग्य व्यवस्था राखण्यांत येईल अशा एकाद्या ठिकाणीं कुटुंबाच्या सगळ्याच माणसांस नेण्यांत येईल, आणि या रोगाच्या कारणानें कोणाच्या कांहीं मालमिळकतीचा नाश करण्यांत आल्यास त्याच्या नुकसानीची रकम जागच्या जागींच त्यास देण्यांत येईल. योग्य व्यवस्था करतां येण्यासारख्या घरांत आपल्या व आपल्या भाऊबंदाच्या घरांतल्या रोग्यांस औषधोपचार करण्याच्या कामांत लोकांस चांगलें उत्तेजन देण्यांत येईल. डाक्टरच्या हुकुमावाचून कोणाही माणसास घरांतून काढलें जाणार नाहीं व कोणा माणसास तपासण्याचा किंवा घरांतून काढण्याचा अधिकार पोलिसास देण्यांत येणार नाहीं.

कलकत्त्याची ही व्यवस्था प्रथमदर्शनी बरी दिसते, पण त्याचा परिणाम काय होतो हें पहाणें आहे.

सामान्यतः सर्पदंशापासून मनुष्यप्राण्याची जी हानी होते तींतून त्याचा बचाव करितां येईल, अशा रीतीचा उपचार शोधून काढण्याचें एका फ्रेंच विद्वानानें आज बरेच दिवसपर्यंत प्रयत्न चालविले होते, शेवटीं त्यास गेल्या पंधरवड्यांत यश मिळून त्यानें काढिलेला उपाय चांगला लागू पडतो असें निदर्शनास आलें आहे. मो. कालमेट नांवाच्या फ्रेंच विद्वानानें शोध चालविला त्या वेळीं त्यांस असें आढळून आलें कीं, सर्पाचें वीष हें सर्पाच्या शरीरांतील एका विवक्षित पिशवींतच मात्र असतें व त्याचें रक्त हा त्या विषावर खरा उतार आहे. ईश्वरानें सर्पाच्या रक्ताच्या अंगीं असें सामर्थ्य ठेविलें आहे कीं. त्या रक्ताच्या योगानें तदंगभूत विषाची बाधा सर्पास होऊं नये. या विद्वानानें असाही शोध केला आहे कीं, ज्याला इंग्लिश भाषेंत 'ईल' ही संज्ञा आहे त्या 'वाम्ब' नांवाच्या माशाच्या रक्ताच्या अंगीं सर्पविषाचा प्रतिकार करण्याचें फारच जास्त सामर्थ्य आहे. सुईच्या द्वारें त्या रक्ताचा प्रवेश विषबाधा झालेल्या मनुष्याच्या शरीरांत केल्यास किंवा तें रक्त त्यास पिण्यास दिल्यास मनुष्य दगावत नाहीं. सर्पाच्या रक्ताच्या अंगीं किंवा 'वाम्ब' माशाच्या रक्ताच्या अंगीं कांहीं वाईट धर्म आले आहेत असें वाटेल, तर त्या रक्तास ५८ डिग्री 'सेन्टीग्रेट उष्णता दिल्यास तें रक्त दोषविरहित होऊं शकतें. या विद्वानानें असाही एक शोध लाविला आहे कीं, मनुष्यास सर्पविषाची बाधा होऊं नये यासाठीं मनुष्याच्या अंगांत सर्पविषाचा थोडासा प्रवेश फार हळू करविल्यास व त्यास 'वाम्ब माशाच्या रक्ताचा उपचार करण्याचा क्रम हळू हळू सुरू ठेविल्यास शेंकडो मनुष्यें व जनावरें यांच्या वर विषाचा संस्कार घडूं शकणार नाहीं. या उपायाचा उपयोग जंगलांत राहणारे व शेतकींत राबणारे लोक यांस विशेष होण्याचा संभव आहे.

मो॰ कालमेट या फ्रेंच विद्वानानें हा जो 'अपूर्व' असा शोध केला आहे. त्यांपैकीं 'वाम्ब' नांवाच्या माशाचें रक्त सर्पदंश झालेल्या मनुष्यास पाजण्याचा रिवाज आज शेंकडो वर्षांपासून कोंकणांतील कातोडी लोकांस ठाऊक आहे, इतकेंच नव्हे तर त्याचा उपयोग या लोकांकडून प्रसंगोपात होतही असतो असें ह्मण तात; अर्थात सुधारलेल्या देशांतील विद्वान लोक सांप्रत जे उपाय शोधण्याच्या नादास लागले व ते जे उपचार शोधून काढितात, त्याचें ज्ञान या देशांतील 'जंगली' ह्मणविलेल्या वर्गांत परंपरेनें चालत आलेलें असावें, हें फारच विचार करण्यासारखें आहे.

बंगवासी लिहितो क्षेत्र गया येथेंही एक चमत्कारिक दावा चालला आहे, त्यांत खुद्द कलेक्टर साहेब फिर्यादी असून आरोपी एक लहानसा नेटिव्ह मुलगा आहे या दाव्यांतील हकीकत अशी आहे कीं, आरोपी मुलानें एके दिवशीं कलेक्टर साहेबांच्या कंपाऊंडांतील बगीच्यांतील झाडाचें एक फूल तोडिलें तें तोडताना साहेबांनीं त्या मुलाला स्वतः पाहिलें आणि मुलास 'खडे रहो' असें बोललें परंतु मुलगा ते शब्द ऐकून पळूं लागला साहेबांजवळ त्यावेळेस चपराशी वगैरे कोणीही मनुष्य नव्हता, सबब साहेब स्वतः त्या मुलामागें त्यास धरण्यास पळूं लागले पळता पळतां रस्त्यात धूळ अतिशय होती तींतील खळग्यांत साहेबाचा बुटासुद्धां पाय अटकून साहेब पडले व मुलगा पळून गेला. सर्व तोंडांत माती गेली व दाढीमिशी आणि सर्व कपडे धुळीनें व्याप्त झाले नंतर ऊभे राहून थूथू करीत असतां लोक भोंवताली जमले होते त्यांस अगोदर त्या मुलाचें नांव विचारून घेऊन तें लिहून ठेविलें आणि नंतर अंगावरील धूळ झाडिली. असा प्रकार झाल्यानें अत्यंत क्रोधायमान होऊन त्यांनीं त्या मुलावर फौजदारी खटला चालविला आहे. निकाल अद्याप झाला नाहीं, काय होतो पहावा.

येई हई वेई या बंदराची मालकी आमच्याकडे आल्यानें जर्मनीच्या हक्कास बाध येणार नाहीं व त्या भागांत रेलवे करण्याचा आपला इरादा नाहीं असें इंग्रज प्रधान मि. बेलफोर यांनीं सांगितलें. या गोष्टीबद्दल ता २९ रोजीं बराच वादविवाद झाला. शांतंग हें ठिकाण जर्मनीच्या मालकीचें आहे असें कबूल करण्यांत इंग्लंडानें चूक केली आणि पोर्टआर्थर बंदरांतून इंग्लंडानें आपलें आरमार काढून घेतलें हें वाईट केलें असें सर हर्कोर्ट ह्मणाले सरकारतर्फे मि. बेलफर यांणीं सांगितलें कीं, जर्मनीची मालकी व्यापारापुरती असून ती कबूल करण्यांत तह मोडला असें होत नाहीं. पोर्टआर्थरकरतां लढाई सुरू करणें चांगलें नाहीं. वेई वाई घेण्यानें रशियाशीं कायमचें वितुष्ठ केलें असेंही होत नाहीं.

ठा॰ अ॰

पंजाब प्रांतापैकीं गरशंकर नामक गांवीं सरकारी नोकर व गांवकरी यांच्यांत जबरदस्त दंगा होऊन त्यांत ९ मनुष्यें ठार मेलीं व ३० असामी जखमी झाल्याची बातमी आली आहे. दंगा होण्याचें कारण इतकेंच कीं, ह्या गांवीं प्लेग सुरू झाल्यामुळें लोकांस गांवाबाहेर काढण्याकरितां सरकारी लोकांनीं त्याजवर सक्ती वापरली, व त्यामुळें लोकांचीं मनें बिथरून त्यांनीं सरकारी लोकांवर धोंडे मारण्यास सुरुवात केली. त्या दगडवृष्टीपासून एका दोघा कान्स्टेबलांस व असि. कमिशनर मि. स्टो यांस साधारण जखमेशिवाय फारसें नुकसान किंवा प्राणहानि झाली नव्हती. सरकारी अधिकाऱ्यांनीं थोड्या शांत मनानें व युक्तीनें काम घेतलें असतें तर तेव्हांच हा दंगा मिटून, लोक सरकारच्या हुकमाधीन झाले असते. परंतु पोलीसांतील व बहुतेक युरोपियन अधिकाऱ्यांस आपण हिंदुस्थानचे प्रति राजे आहोंत असें वाटत असल्यामुळें, काळे लोकांची किंमत जनावरांपेक्षां अधिक नाहीं, अशी त्यांची समजूत झाली असल्यामुळें काळ्या लोकांशीं त्यांचें वर्तन बहुधां बेपर्वाईचें होतें. याप्रमाणेंच वरील दंग्याचे प्रसंगीं पोलीस अधिकाऱ्यांनीं पुढील मागील विचार मुळीं न करितां, गावकरी लोकांवर एकदम गोळीबार करण्याचा हुकूम सोडला. व एका क्षणांत ९ मनुष्याचे प्राण हरण करून २७ इसमांस घायाळ केले! मुंबईच्या दंग्याचे प्रसंगीं ब्रिवीन साहेबांनीं गोळीबार करून आपल्या उतावेळ व मूर्खपणाची कमाल केली, ह्मणून त्यांस जें दूषण हजारों लोक देत होते त्याच्या भरतीस हें एक उदाहरण पडलें आहे! ही दैन्यावस्था कधीं दूर होईल ती खरी!

स्पेन व अमेरिका यांमध्यें युद्ध जुंपल्यामुळें, इंग्लंडांत गव्हांचा तोटा पडूं लागला आहे. हें पाहून इकडील व्यापारी भराभर गहूं खरीद करून परदेशीं पाठवीत आहेत. यामुळें अलाहाबादपासून कलकत्त्यापर्यंत, व जबलपुरापासून मुंबईपर्यंत गव्हांचा भरणा रेलवेच्या मार्गांनींतून सारखा होत आहे. या निर्यात वाढीमुळें गव्हांचा भाव मध्यप्रांतांत फार वाढला आहे. पूर्वीं दर रुपयास १४ शेर पक्के गहूं मिळत असत; पण हल्लीं दहा शेरांवर मान येऊन बसेल असा रंग आहे. मागें दुष्काळानें लोकांचें अन्न हिरावून नेलें; आतां ही लढाई आली. एतावता गरिबांचें पोट उपाशीं तें उपाशीं. इंग्रज सरकार पडलें खुल्या व्यापाऱ्याच्या मताचें तें गरिबांची सोय जाणून देशी संस्थानिकांप्रमाणें गहूं निर्यात होण्याशीं थोडीच बंदी करणार आहे?

हिंदुस्थान सरकारानें टांकसाळी बंद केल्या त्यामुळें नाण्याची भीड अगदीं असह्य झाली आहे. ती इतकी कीं बँकेंत 'सरकारी कागद' (प्रामिसरी नोटा) गहाण ठेवले तरी सुद्धां दरसाल दरशेंकडा पंधरा या भारी व्याजानें कर्जाऊ रकमा मिळत नाहीशा झाल्या आहेत व सरकारी कागदांचा भाव रोखीचा ९२ रुपये १२ आणे दर शेंभरास झाला आहे. बाजारांत नाणेंच नाहीं त्यामुळें धान्यादिकांचे भाव मनस्वीच उतरले आहेत. सरकारच्या खजिन्यांत हल्लीं १६ कोटी रुपये आहेत ते आतां व्यापाऱ्यांस मिळतील अशी तजवीज अवश्य करावी ह्मणून इंग्रज पत्रकार व व्यापारी एकसारखी हांकाटी [illegible] राहिले आहेत [illegible] ऱ्यांचे हे हाल! मग आमच्या गोरगरिबांची गोष्ट कशास बोलावी!

मोंगलाई हैद्राबादेस टांकसाळ बंद आहे. त्यामुळें तेथें नाण्याची भयंकर भीड पडून हलक्या वजनांचीं जुनी नाणीं फार बाजारांत येत आहेत तेथील बंगाल बँक आणि सरकार तिजोरी यांत हीं नाणीं घेत नाहींत, यामुळें लोक फार त्रस्त झाले आहेत. पण आमच्या इकडे कशी काय स्थिती आहे याचा कोणी विचार तरी करीत आहे काय?

स. वि.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... ......८१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ................................4 as
Advertisemen
Below 10 lines ......2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII — AKOLA MONDAY 23 MAY 1898 — NO 20
वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख २३ माहे म सन १८९८ इ० — अंक २०

मिती ज्येष्ठ शुद्ध ३ शके १८१९

प्लेगाचा आजार होऊं नये ह्मणून प्लेगाच्या देवी काढण्याचा उपाय डाक्टर हाफकीन यांनीं शोधून काढला अहे हा उपाय उत्तरोत्तर सरकारच्या व लोकांच्या आदरास पात्र होत आहे आणि तो उपाय चांगलासा व विश्वसनीय वाटल्या वरून अनेक स्थानिक सरकारांनीं हा उपाय जारीनें अमलांत आणिला आहे. हा उपाय प्लेगाला प्रतिबंधक आहे. प्लेगाचा विकार झाल्या नंतर हा उपाय कितपत लागूं पडतो या विषयीं खात्रीलायक माहिती कांहींच कळत नाहीं. प्लेगाच्या देवी लोकांनीं काढवाव्या ह्मणून सरकार प्लेगानें त्रस्त झालेल्या प्रांतांत थोडाबहुत सक्तीचा हुकूम करीत आहे. लोकांच्या कल्याणार्थ सरकार खटपट करीत आहे तरी तिचा खरा मतलब व उपयोग समजून न घेतां कलकत्याच्या लोकांनीं मोठा दंगा उसळून दिला होता त्याला अगदीं थोडे दिवस लोटले आहेत. या प्लेगाच्या देवी संबंधानें कांहीं जरूरियात माहिती लोकांस असणें अगदीं अवश्य आहे आणि सध्यां या इलाजाचा उपयोग प्लेगाच्या प्रतिबंधाकडे कसा काय होतो या विषयीं अनुभवशीर गोष्ट कळणें तसेंच अगत्याचें आहे.

अलिकडील शास्त्रीय शोध असा आहे कीं प्रत्येक रोगाचे उत्पादक सूक्ष्म कृमि असतात. जो रोग संसर्गजन्य आहे त्याचे सजीव कृमि धरून ते प्राणिमात्राच्या शरीरांत घालावयाचे असतात. शरीरांतील [illegible] मांसल भागावर शस्त्रानें प्रथम टोंचून नंतर त्या ठिकाणी त्या [illegible] संचार करवितात. अशा कृतीला देवी काढणें ह्मणतात. ज्या रोगाच्या देवी काढतात त्या रोगाचा प्रतिकार त्या देवीमुळें होतो. ते कृमि आपला रोग देवी काढलेल्या मनुष्या मध्यें उत्पन्न करितात. अशा रीतीनें उत्पन्न केलेला रोग प्राणाला फारच कमी पीडाकारक होतो आणि संसर्गानें किंवा स्पर्शमात्रानें जेव्हां एखादा रोग उद्भवतो तेव्हां तो देवी काढून उत्पन्न केलेल्या रोगापेक्षां विशेष घातुक, पीडाकारक व प्राणहारक असतो. हा अनुभव आपणास देवीच्या आजाराच्या वेळीं चांगला येतो. एकाला देवी आल्या आणि त्याच्या संसर्गानें दुसऱ्याला देवी आल्या तर त्या फार वाईट होत पण संसर्गानें देवी येण्यापूर्वीं देवी आलेल्या माणसाची लस दुसऱ्याच्या अंगात घालून त्यास देवी आल्या तर या सौम्य स्वरूपाच्या येऊन जीवाला तितक्या अपायकारक होत नाहींत. कुत्र्याच्या विषा संबधानें देखील असाच अनुभव येत चालला आहे. प्रत्येक रोगाच्या देवी काढल्यात ह्मणजे त्या त्या रोगाची बाधा होणार नाहीं असा साहजिकच कोटिक्रम निघतो. पण तो युक्तिवाद चुकीचा आहे. जशा देवी न काढल्या तर त्या बहुतकरून प्रत्येक माणसाला येतात असा अनुभव आहे तशी गोष्ट प्रत्येक रोगासंबंधानें नाहीं. शिवाय देवी काढल्यामुळें तो रोग अगदींच नाहींसा होत नाहीं तर संसर्गजन्य रोगा पेक्षां देवी पासून उत्पन्न झालेला रोग विशेषसा सहन करण्या सारखा, सुखकर व निरुपद्रवी होतो. माता देवी काढण्याच्या पद्धती संबंधानें मुख्य अपवादक गोष्टी तीन आहेत. (१) देवी काढल्या नंतर देवी येऊन ही बरेच लोक मरतात असा अनुभव आहे; (२) देवी काढल्या नंतर कमीजास्त प्रमाणानें देवी येऊन त्यांचे व्रण कायम राहतात; आणि (३) देवीमुळें त्या रोगाचें बीज कायमचें शिल्लक राहतें आणि त्या बीजा पासून रोगाचा फैलाव होण्याचा संभव असतो या अपवादाचें निरसन डाक्टर जेनर यांनीं उत्तम प्रकारें केलें. त्यांनीं असा शोध काढला आहे कीं मनुष्या पेक्षां गायीवर देवीचा आजार कमी चालतो आणि ह्मणूनच गोस्तनावरील लशीनें देवी काढल्या पासून कमी पीडा होते. हा शोध अखेरीला खरा ठरला. आणि अलिकडे गोस्तना वरील लशीनें देवी काढण्याचा परिपाठ पडला आहे.

वरील तत्वावर टांनकीनचे डाक्टर यरसिन यांनीं प्लेगाच्या देवी काढण्याचा शोध काढिला. त्यांनीं प्लेगाचे कृमि घोड्या मध्यें घालून त्याच्या लशीनें मनुष्याला टोंचण्याचा प्रयत्न केला होता पण तो बराच निर्फळ झाला. प्लेगाचे कृमि उष्णतेनें मारण्याच प्रयत्न केला होता पण कांहीं कृमि जिवंतच [illegible] होत आणि यामळें डाक्टर यरसिनच्या देवीमुळें कधीं कधीं प्लेगाचा आजार जबरदस्त होत असे. डाक्टर हाफकीन यांनीं थोडासा फरक केला प्लेगाचा कृमि त्यांनीं चरबी सारख्या पदार्थांत ठेविला आणि त्याची वाढ संपूर्ण झाल्या नंतर त्या कृमीस निर्जीव करून त्यांच्या देवी डाक्टर हाफकीन काढीत असतात.

डाक्टर हाफकीनच्या देवी काढण्याच्या पद्धतीला पुष्कळसें यश आलें आहे असें चांगले चांगले डाक्टर सागतात. डाक्टर हाफकीन यानीं प्लेगच्या देवी काढलेल्या माणसांची नोंद ठेविली आहे आणि त्या आंकड्यावरून त्यांनीं पुष्कळ अनुमानें बांधलीं आहेत. परंतु तीं अनुमानें आमच्या दृष्टीला माहितीशीं समर्थक वाटत नाहींत. डाक्टर कॉच यांनीं पटकीवर असाच उपाय थोड्या वर्षांपूर्वीं [illegible] होता पण ते अखेरीला कुचकामाचा ठरला. प्लेग प्रत्येक माणसाला होतोच असें कांहीं प्रमाण नाहीं किंवा देवीप्रमाणें तो संसर्गजन्य आहे असाही अनुभव नाहीं. हाफकीन यांच्या देवी एकदां काढाव्या नंतर प्लेगाची विकृती होत नाहीं असा पक्का अनुभव नसून त्या खेरीज या देवींच उपयोग किती काल पर्यंत होतो हें देखील अनियमित आहे. सारांश, प्लेगाच्या देवीचा जितका उपयोग वाटतो तितका खरोखरच होतो असें खात्रीपूर्वक सांगता येत नाहीं. डाक्टर हाफकीन यांची पद्धतीही अजून नवीन आहे. तथापि लोकांनीं हें विसरतां कामा नये कीं प्लेगावर उत्तम रामबाण दवा आढळे पर्यंत हा देवीचा प्रतिबंधक उपाय अनुभव घेऊन पाहण्या सारखा आहे.

---

अलिकडे मुनसिपाल कमिट्या देखील लोकांस फारशा आवडत नाहींत सार्वजनिक कार्यें करण्यास शिकण्याची प्राथमिक शाळा ह्मणजे मुनसिपाल कमिटी होय; परंतु सरकारी राजनीती बदलल्या पासून मुनसिपालिट्यांवर कामें पुष्कळ लादण्यांत आलीं, त्याचें उत्पन्न कमी करण्यांत आलें, आणि तिच्या सभासदांचे अधिकार अगदीं संक्षेपांत येत चालले आहेत. मि. बुलक यानीं गेल्या वार्षिक रिपोर्टांत असा अभिप्राय दिला आहे कीं सभासद निवडण्याचा अधिकार लोकास संभाळता येत नाहीं, आणि निवडणुकी पेक्षा सरकारी नेमणुकांनीं मुनसिपालिट्यांचीं कामें चांगलीं चालतील. मुनसिपालिट्यास जो शेरा लागूं आहे तो लोकल बोर्डासही सारखाच लागूं पडतो. सरकारी राजनीती अगदीं चमत्कारिक झाली आहे. बादशाही दडपशा चालूं करण्याकडे सर्व धोरण आहे. मुनसिपालिट्यांची रचना अशी आहे कीं त्यांस स्वतंत्र असा कांहींच अधिकार नाहीं. सरकारी अधिकारी बहुतकरून मुख्य मुख्य जागीं मुनसिपालिट्यांत असतात आणि त्यांच्या प्रभावानें सर्व कार्यें चालतात. बिनसरकारी सभासदांचें तेज चांगलेसें पडत नाहीं. त्यांच्या कृतीला पाठबळ अधिकाराचें नसतें मुनसिपालिटी ह्मणजे सरकारच्या, हातीं एक कळसूत्री घोडा आहे. त्याच्यावर कामें वाटतील तितकीं लादता येतात. सरकार सूत्रें फिरवितें त्या प्रमाणें या घोड्यास वेग मिळतो. हा घोडा उत्तरोत्तर चांगला भारवाहक होत आहे पण त्याच्या परिपोषक नालिका अगदीं शोषून शुष्क होत आहेत हा शोचनीय प्रकार होय.

मुनसिपालिट्यांतील अधिकारी मंडळ असें बनविलें असतें कीं हरएक गोष्टींत सरकारी बाजूचें अत्यंत वर्चस्व राहतें. डिपुटी कमिशनर प्रेसिडेंट असतात. त्यांस प्रेसिडेंट नेमिल्या वाचून गत्यंतर नाहीं असा देखील पुष्कळ अनुभवी सभासदांचा अभिप्राय आहे. डिपुटी कमिशनरास हा श्रेष्ठ अधिकार दिल्यामुळें कमिटीवरील एक तपासणी करणारा अधिकारीच कमी झाला आहे ही वहिवाट फार वर्षांची आहे पण तिच्यामध्यें आतां फरक होईल तर फार बरें! डिपुटी कमिशनराचा अधिकार कायद्यानें मुनसिपालिटीवर स्वतंत्रपणें चालतो; तो प्रचलित करण्या साठीं डिपुटी कमिशनरांस प्रेसिडेंट नेमूं नये असें आमचें मत आहे. मुनसिपालिटींतील ही श्रेष्ठ जागा बिन सरकारी सभासदांस देण्याचा काल हाच आहे. मुनसिपालिटीवर निराळी जबाबदारी पडेल. नित्याचें धुरीण व बदलल्यामुळें सरकारी अधिकारी थोडेसे तिऱ्हाइतपणानें देखरेख ठेवून मुनसिपल कामांत चांगली दिशा लावतील. सरकारी सभासद नुसते सभासद असावेत त्यांच्या हातीं मोठीशी अधिकार सूत्रें ठेवूं नयेत ह्मणजे मुनसिपल संस्थेच्या कारभारांत निराळा जोर व जीव आल्या सारखें होईल. प्रस्तुत लोकनियुक्त सभासद यंत्राप्रमाणें अनेक प्रसंगीं चालतात. त्यांस आपल्याकडे सोंपविलेल्या कामांत स्वकर्तृत्वाचा भाग मोठासा वाटत नाहीं. आपल्या मतें सरकारी सभासदांचें दव्हारें कमी करण्याचा काल हाच आहे आणि तसें करण्यांत त्यांस देखील सुख वाटेल. सर्वत्र अधिकार बजावणें सुस्वभावी माणसास आवडत नाहीं. स्थानिक स्वराज्याची खरी कल्पना प्रस्तुतच्या मुनसिपालिट्यांच्या इतिहासावरून होणार नाहीं. अकोल्याची मुनसिपालिटी पुष्कळ वर्षांपासून नांवाजलेली आहे तेव्हां तिनें आह्मी वर सुचविलेल्या दिशेनें सुधारणा केली तर तिला शोभण्यासारखें आहे. आणि प्रसंगवशात् पुढील सालच्या अधिकारीमंडळाच्या नेमणूका लवकरच होतील तेव्हां सरकारी सभासदांस नियामक अधिकारावर नेमूं नये. ही सुधारणा आह्मास विशेष अगत्याची वाटते आणि सध्यांचा काल स्थानिक स्वराज्याचें साम्राज्य स्थापित करण्याचा आहे. आकोला मुनसिपालिटी जर या प्रसंगीं धारिष्ट धरील तर लोकांवर मोठे उपकार होतील. केव्हां तरी हें पाऊल घेतलें पाहिजे तेव्हां तें वेळेवर घेण्यांत येईल तर ती गोष्ट विशेष हितावह व सुखकर होईल.

---

काटकसर तत्वशः वाईट नाहीं पण तिचा दुरुपयोग केला ह्मणजे मात्र ती व्यवस्थापकास लघुत्व आणते. आकोला मुनसिपालिटीवर खर्चाचा बोजा वाढला आहे आणि उत्पन्नाच्या अनेक बाबी सरकारनें काढून घेतल्या आहेत त्यामुळें मुनसिपालिटीस येथील सार्वजनिक बगीचे देखील संभाळणें कठीण झालें

आहे. आकोल्यास रम्य व मनोहर स्थळें अगोदर नाहींत आणि त्यांतल्या त्यांत एक सुंदर टेंपल बगीचा होता तो देखील आतां ओसाड रानाच्या दशेला येऊन पोंचला आहे. तेथलि वृक्षवेलीवर जणोकाय प्लेग आला आहे! सर रिचर्ड टेंपल वऱ्हाडांत असतांना त्यांचें स्मारक ह्मणून हा रमणीय बगीचा तयार करण्यांत आला होता. काल दशा किती विचित्र पहा! त्याचें सांप्रतचें स्वरूप पाहून खरोखर मोठा खेद वाटतो. मुनसिपालिटी अगदीं गरीब व भिकारी आहे हें खरें पण सरकारनें जेव्हां उत्पन्नाच्या बाबी काढून घेतल्या तेव्हां हा बगीचा आपल्या व्यवस्थेखालीं घेतला असतां तरी शोभलें असतें. चांगली वस्तु वारंवार बनत नसते तेव्हां अशा गांवचा शोभादायक आराम बगीचा न मोडला जाईल तर बरें. सरकारास सर टेंपल यांच्या नांवाचा तरी कांहीं अभिमान वाटावा आणि हा बगीचा मोडून टाकूं नये अशी नागरिक लोकांची इच्छा आहे. मुनसिपालिटीला हा खर्च भिमत नसेल तर सरकारनें तो चालविला पाहिजे. बागबगीचा कधींही उत्पन्नाची बाब नसतो. प्रत्येक गांवाला सरकारी खर्चानें अवश्य सार्वजनिक गोष्टी पुरविण्यांत आल्या पाहिजेत.

आणि नवीन जमाबंदी प्रमाणें सरकारचें उत्पन्न पुष्कळ वाढलें आहे तेव्हां त्या उत्पन्नांतून सरकारनें कांहीं भाग आकोल्यांतील एका सार्वजनिक बागिच्याकडे लावला तर सरकारचा लोकांवर मोठा उपकार होईल. असलें उदार कृत्य सरकारला आवडणार नाहीं ह्मणून मोठी भिती वाटते.

---

## खोटी साक्ष.

खोटी साक्ष ह्मणजे काय हें बहुतेकांस माहित असतें. न्याय कोर्टांत जो प्रतिज्ञेवर आपल्या माहिती विरुद्ध बुद्धिपुरस्सर निराळी गोष्ट सांगतो तो खोट्या जबानीच्या आरोपांत सांपडतो. सामान्यतः खोटें बोलण्यापेक्षां खोटी साक्ष देणें ह्मणजे महत्पाप होय. खोटें बोलणारा स्वतः पतित होतो पण जो न्यायाच्या दरबारांत खोटें बोलतो तो न्यायदेवतेची अप्रतिष्ठा करितो, ईश्वराच्या अधिकारावर बसणाऱ्या न्यायाधिशाच्या डोळ्यांत धूळ टाकतो, आणि व्यक्तिमात्राच्या संसारिक नफानुकसानीसाठीं खरें स्वहित व परहित बुडवितो. सर्व धर्मांत खरेपणाची महती मोठी आहे. किंबहुना 'सत्य तेंचि परब्रह्म' असें सांगून सत्यापरता निराळा धर्मच नाहीं असें आपलीं धर्म पुस्तकें जगाच्या आरंभा पासून शिकवीत आहेत. परंतु व्यवहारिक माणसाची कल्पना अत्यंत कोती असते. त्याला क्षणिक लाभा पुढें दुसरें कांहीं दिसत नाहीं. आपला मनोरथ पुरे करण्याच्या व्यवसायांत असतो. आणि त्यासाठीं तो नाना खटपटी करितो. संसारांतल्या भ्रामक सुखाच्या नादानें त्याचे विचार इतके बदलतात कीं दुनियेंत लबाडी शिवाय गत्यंतरच नाहीं असें तो मानतो. खोटेपणाचा बाजार देखील गारुड्याच्या खेळा प्रमाणें कांहीं काळ नामी चालतो. परंतु खोटेपणाचा घडा केव्हां फुटेल याचा कांहीं भरंवसा नसतो. उजेडात येईल या भितीनें जितके लोक खोटें बोलण्याचें टाळतात तितकें सत्याच्या आवडीनें ते सत्य वचनी होतील तर जगाचा मोठा फायदा होईल. लोक पापाला देखील कमी भितात असें नाहीं. पण राजदंडा सारखें चवदावें रत्न मनुष्याला फार करून ताळ्यावर आणीत असतें.

खरें बोलणें ह्मणजे मोठा सद्गुण नाहीं. पण खोटें बोलण्याच्या दुर्गुणाचा प्रभाव फार फैलावला आहे ह्मणून खरेपणाला फारच फार चांगलपणा आला आहे. खरें बोलणें अगदीं साप आहे [illegible] महत्व येतें तर खऱ्या वर्तनाचें उग्र व कष्टसाध्य व्रत अत्यंत श्रेष्ठ होय. कायद्यानें वरील गुणापैकीं फक्त छोटा भाग घेतला आहे. समाजाला विघातक जेवढा खोटें बोलण्याचा भाग आहे तेवढाच सरकारनें गुन्ह्याखालीं आणिला आहे.

न्यायाधिशाचा अधिकार ईश्वरी आहे तेव्हां त्याचें बोलावणें आल्या नंतर जो अधम बुद्धिपुरस्सर खोटें बोलतो तो ईश्वराला अवमानतो आणि अर्थातच तो मनुष्य कोटींतल्या श्रेष्ठपणाला कितपत जुमानणार आहे हें उघडच दिसतें. अशा नराला कशाचीच भिती राहणार नाहीं ह्मणून न्यायाच्या कामासाठीं न्यायासना समोरील खोटेपणाला चांगला जबरदस्त राजदंड ठेवण्यांत आला आहे.

परंतु न्यायकोर्टाची रचना अशी विलक्षण आहे कीं अलिकडे खोटें बोलण्याला जसा काय ऊत आला आहे. कचेऱ्यांत जाणारा येणारा इसम सहजी सांगेल कीं न्यायाचें काम खरेखोट्याची निवड करण्याचें आहे पण न्यायकोर्टें खोटें बोलण्यास शिकण्याची पाठशाळा बनली आहे. किंबहुना व्यवहारांत खोटेपणाची टांकसाळच न्यायदरबारीं स्थापित झाली आहे असा भास होतो. देवाची याद करून खरें बोलेन अशी प्रत्येक साक्षिदाराला शपथ घ्यावी लागते. ही शपथ ह्मणजे पोपटाच्या विठ्ठल विठ्ठल बोला प्रमाणें निरर्थक बनली आहे. एखाद्या कचेरींतल्या कामाचें चित्र काढा ह्मणजे वरील ह्मणण्याची सत्यता कळून येईल. जसजशी खोट्या साक्षीला भरती येईल तसतशी खोट्या साक्षी देणाऱ्या मनुष्यास शिक्षा करण्याचीं यंत्रें प्रचलित झालीं पाहिजेत. उत्तरोत्तर खोटी साक्ष हा गुन्हा मोठा आहे आणि शिक्षा जबर होते अशी दहशत बसणें फार इष्ट आहे. खोट्या साक्षीचें बंड विलायतेंतही प्रचंड वाढलें आहे. आणि तिकडील न्यायाधीश देखील या गुन्ह्याच्या प्रसारा विषयीं मोठी ओरड करितात. उत्तरोत्तर जीवनकलह बिकट व दारुण होत चालला आहे, व्यवहारिक सुखासाठीं मनुष्य जीव कीं प्राण करितो ईश्वरनिष्ठा मनुष्या मध्यें अस्त पावत चालली आहे, खोटें बोलण्याचीं आमिषें या सुधारणेच्या कालांत वाढलीं आहेत इत्यादि गोष्टी लक्ष्यांत घेतल्या ह्मणजे भावी स्थिती विषयीं मन शंकाच घेतें.

---

असा काल आला आहे कीं खोट्या साक्षीच्या गुन्ह्या संबंधानें सरकारी वक्ता विशेष पाहिजे. या बाबतींत आकोला जिल्ह्यांत सुधारणा अधिक अभिनंदनीय दिसते. मे. गीडो साहेब यांनीं खोट्या साक्षीच्या संबंधानें सत्रच आरंभलें आहे. या गोष्टीनें आमच्या जिल्ह्यांत खोट्या साक्षीची दहशत पडत चालली आहे ही आनंदाची बातमी होय. साक्षीदार खरें बोलण्यास शिकतील किंवा या सत्रामुळें खरें बोलण्याला लागतील अशी आशा सर्वत्रांस वाटत आहे.

खोट्या साक्षीचा गुन्हा अती निंद्य आहे पण तो शाबित होण्याला अनेक अडचणी असतात. लबाड मनुष्या संबंधानें अन्याय झाला तरी देखील कोणास माया येत नाहीं किंवा हळ हळ वाटत नाहीं. परंतु अडाणी [illegible] लेल्या ऐकलेल्या गोष्टी निरनिराळ्या करण्याची माहिती नसते, मनांतले विचार त्यांस नीट कळवितां येत नाहीं, त्यांच्या मनाची स्थिती नीटशी कळत नाहीं, इत्यादी अनेक गोष्टी एखादी साक्ष खोटी ठरवितेवेळीं चांगल्या विचारांत घेतल्या पाहिजेत. मनुष्याचें मन कांहीं विचित्र आहे. केव्हां कशाचें विस्मरण होईल व केव्हां काय होईल याचा धरबंधच नसतो. ह्मणून निव्वळ कागदावर असंबंधता दिसली तर लागलीच खोट्या साक्षीचें कलम चालूं नये अशी आमची न्यायाधीश मंडळीस विनंती आहे. तडजोडीची सौम्य पद्धती ठेवावी. मूढ लोकांचा अनुभव असा आहे कीं आपल्या पुढें बोलणारा मनुष्य काय काय बोलतो तें बरोबर टिपून घेणें मोठें कठीण आहे. तशांत साक्षिदाराच्या मनाची एकाग्रता, त्याची चळवळ, चंचल भाषण इत्यादि गोष्टी सहस्त्रावधि गोष्टी ध्वनित करित असतात. या सर्वांचें मनन योग्य प्रकारें व शांततेनें करून नंतर एखादा साक्षीदार खोटा आहे असा ग्रह झाल्यास त्याच्यावर खटला करण्याच्या नादाला लागावें. कालपरत्वें निरनिराळ्या गोष्टीला महत्व येत असतें. हल्लीं खोट्या साक्षीचें सत्र चालूं आहे तेव्हां एखादी वाईट गोष्ट नाहींशी करण्याच्या नादानें दुसरी वाईट गोष्ट उतावळेपणानें उत्पन्न होऊं नये अशी खबरदारी सध्यांच्या काळाला फार अगत्याची आहे.

---

मि. वुलियम इवर्ट ग्लाडस्टन यास गेल्या गुरुवारीं विलायतेंत देवाज्ञा झाली हें कळविण्यास मोठें दुःख वाटतें. शरिराला मरण ही प्रकृतीच आहे आणि मि. ग्लाडस्टन यांस त्यांच्या ८९ वे वर्षी मरण आलें ही गोष्ट वस्तुदृष्ट्या स्वाभाविकच झाली; पण एवढा मोठा अलौकिक गृहस्थ मरण पावला ह्मणून [illegible] मनुष्यस्वभावाला अनुरूपच होय. अलिकडे मि. ग्लाडस्टन हे वार्धक्यानें बरेंच थकले होते आणि अखेरीस त्यांस व्याधीही पुष्कळ जडली होती. मरणापूर्वी कांहीं आठवडे त्यांचा मृत्यु समीप आल्या विषयीं डाक्टर लोकांनीं सुचविलें होतें. आणि त्यांच्या मृत्यूची वार्ता ऐकण्याला लोकांचीं मनें तयार होतीं. मि. ग्लाडस्टन सारखे अद्वितीय नररत्न हरपलें ही जगाची मोठीच हानी होय. यांचें चरित्र ह्मणजे लवकरच संपणाऱ्या शतकाला इंग्लिश राष्ट्राचा इतिहासच आहे. मि. ग्लाडस्टन हे अप्रतिम लोकनायक होते त्यांचें वक्तृत्व अत्यंत मोहक असून त्यांच्या जीव्हाग्री सरस्वतीच वास करीत होती. जगामध्यें यांच्या तोडीचे वक्ते विरळाच आढळतील. यांची बुद्धिमत्ता विलक्षण कोटींतली होती. यांचें वर्तन नेहमीं प्रामाणिकपणाचें असून नीती विषयीं त्याचा मोठा कटाक्ष असे.

मि० ग्लाडस्टन यांचा जन्म १८०९ च्या डिसेंबर २९ वीला झाला. राष्ट्रीय सभा दरवर्षी आनंदोल्लासानें त्यांच्या जन्मदिवशीं त्यांचें अभिनंदन करीत असे ह्मणून ही तारीख सर्व इंडियनांस चांगली अवगत आहे. [illegible] वेलियावे वर्षीच कालेजांतला अभ्यास पुरा करून राजकीय [illegible] मन घालूं लागले. प्रथमतः यांचे विचार राजपक्षाचे ( टोरी किंवा कान्सरव्हेटीव पक्षाचे ) होते परंतु ते विचार अनुभवानें बदलत बदलत गेले आणि शेवटी मि. ग्लाडस्टन हे पूर्णपणें प्रजापक्षाचे (व्हिग किंवा लिबरल पक्षाचे) मुख्य नायक झाले. मि. ग्लाडस्टन यांच्या चरित्रा संबंधानें मतभेद आहे. त्यांच्या अप्रतिम गुणा बद्दल त्यांचे कट्टे शत्रू देखील मान डोलवितात पण त्यांच्या कारकिर्दीच्या जयापजया संबंधानें लोक द्विधा बोलतात. पायोनियर सारख्या पत्रकाराचा अभिप्राय असा पडतो कीं मि. ग्लाडस्टन यांची कारकीर्द परिणामीं निष्फळ झाली आणि त्यांच्या विषयींचा आदरभाव पुष्कळ कमी झाला. मि. ग्लाडस्टन हे काब्डेन, ब्राइट इत्यादि श्रेष्ठ पुरुषांचे अनुयायी असतांना विशेष यशस्वी झाले व त्यावेळीं खरें धुरिणत्व याच्याकडे नव्हतें; पण हे जेव्हां मुख्य प्रधान झाले तेव्हांचीं त्यांचीं बिलें ह्मणजे आयरिश युनिव्हर सिटी बिल, होम रूल व लार्ड सभा मोडून टाकणें वगैरे बिलें नापसंत झालीं आणि त्यामुळें त्यांचें वजन कमी होत होत अखेरीस त्यांस मुख्य प्रधानकी सोडावी लागली. वरील विचार एकदेशीय झाला. ग्लाडस्टन साहेबांनीं प्रजास्वातंत्र्य वाढविण्यासाठीं महा भगिरथप्रयत्न केले. हे प्रयत्न जगविश्रुत आहेत. यशापयश कोणाच्या हातचें नाहीं व त्यावरून प्रयत्नांची किंमतही कांहीं कमीजास्त ठरत नाहीं. आयरिश लोकांस स्वतंत्रता देण्या साठीं या थोर मनुष्याच्या आयुष्यांतील अखेरीचीं वर्षें व दांडगी उत्साहशक्ती खर्ची पडली हें विसरता कामा नये. त्याच्या परिपक्क अनुभवाला व अचाट बुद्धिमत्तेला एकीकडे ठेऊन आयरिश लोकांस स्वतंत्रता मिळूं दिली नाहीं ही मोठी शोचनीय गोष्ट होय. आयर्लंडातील [illegible] कांहीं फायदा झाला नाहीं. स्वस्थता व शांतता कमी कमी झाली आहे. मि. ग्लाडस्टन यांचें लक्ष आयर्लंडा मुळें इंडियावर जितकें असावयाला पाहिजे होतें तितकें पोंचलें नाहीं हें आमचें दुर्भाग्य होय; तथापि इंडियाला स्थानिक स्वराज्य, कौंसिल सुधारणा इत्यादि गोष्टी लाभल्या आहेत त्या देखील त्यांच्याच प्रसादाचें फळ होय. एकंदरीनें, मि. ग्लाडस्टन यांचें चरित्र अती अद्भुत आहे. त्यांच्या आयुष्यांतील नानाविध गोष्टी वरून आह्मांस पुष्कळ बोध घेण्या सारखा आहे. ईश्वर अशा महात्म्यास उत्तम गती देवो!

# The Berar Samachar

MONDAY, MAY

23 1898.

There are no two opinions as to the fact that the administration of Berar is highly expensive though it leaves large surpluses from year to year to the credit of His Highness the Nizam. The administrative expenditure has reached its highest degree and has left no parallel in the whole of India. When the Imperial expenditure is drawing the nation well nigh into a [illegible] pleasure to see the provincial revenues afford by contrast a comparative relief in so far as they more than fully satisfy the heavy demands of the most expensive machinery of the government in the province It is to be regretted however that the expenditure has outstripped the proper limits of economy and that the revenue has been pushed forward to a degree at which taxation becomes unbearable. Both these facts are bad enough. The natural result is that great works of public utility have been put aside. No sound financier will be satisfied with the surplus budget of this province. There is a very large margin to cut down expenditure to an immense amount, and there are as well excellent opportunities to lighten the burden of taxation on the people. But the general tendency is to let these matters run as smoothly as possible. The British administration feels no constraint in this connection on either side Expenditure knows no limits and revenue also increases by leaps and bounds. There is a sort of apathy and indifference in the matter of the provincial finances. This is due in a large or small measure to the double government under which the province is placed. The British government manages, as it were, this vast estate and puts the net surplus revenue available at the close of each year to the credit of the Nizam's Government. There seems to be no responsibility whatever as to the actual details of the revenue and expenditure.

The absence of proper control removes the feeling of responsibility on the part of the English rulers and the worst effect of this falls ultimately to the lot of the people who have no voice to question the indescrition of increasing the burden of taxation. The heaviest tax in an agricultural province like Berar is the enhanced assessment according to the revised standards. This takes away the lion's share from the income of an agriculturist. A good harvet is no matter of a common occurrence and even in the years of [illegible] the agriculturist is hardly beyond his wants of a [illegible] living. His wants of comfort are few and far between. The story of his miseries need not be repeated when the last year's famine has pictured him in his worst days. There is no staying power amongst the people as a whole. They are fast sinking and cannot rise unless they receive an active help from the Government. The land-tax should be lightened instead of its being enhanced with the rigour of an iron rule. No regard is paid towards the fitness of the people being taxed in the present unwarranted manner. The British Government have a duty to perform towards the people of the province and we hope that they will not let slip the time to improve the lot of their ryots in point of their material advancement. The state has to perform a twofold duty. It must provide the people with both liberal and technical education and should create a field for employment of unused labour—either skilful or otherwise.

---

Our friend who styles himself A. B. C. sends us a communication in which he takes exception to certain presumptions which, he thinks, the casual mention of Mr. V. M. Mahajani will naturally *inspire* in the minds of our readers of the English article in the last issue on the present system of education. We omit the personal references in that letter to our journalistic etiquette and give full publicity to the accurate, adequate view of education as understood from the worthy educationist whose views our correspondent has the best privilege to learn at first—hand and not through any *medium* except the necessary one—viz air the vehicle of sound. We publish below the really useful portion of the letter because it condenses, in a short para, what Mr. Mahajani thinks on the subject-matter of our article in the last Number:—

"Mr. Mahajani's theme was the progress of the conception of Education in modern times. Education formerly meant more or less stuffing the mind with so much stock of knowledge. During the last two generations the civilized world has come to understand that scientific Education means the drawing out of the mind—the development of the mental faculties— so that an educated man in modern times means more a man who is befitted to be a scholar and a student, than a man learned in so many subjects or books. A further progress of ideas has been towards recognizing the great truth that complete Education means not only the education of the mind in the sense indicated above, but also of the Physical organs, of the eye, the hand, and even the less important senses. There are some who make development of the heart and feelings a part and parcel of education. It is thus that education means now a days the development of the mental and moral faculties achieved by means of instruction in the three Rs. with general manual training—as distinguished from teaching a particular craft or profession, be it remembered, superadded. Physical education comes as an accessory and a proper attention to the development of the body becomes important, only because without it, the education of the mind and the heart cannot be sound and perfect and profitable to the individual or the society. Nature has united mind and body and made the one dependent on the other. Hence in developing the one we cannot neglect the other."

---

Here is a nice para to illustrate the English thirst for building up empires in the Eastern continent. China is like a dead corpse and the Western Nations are fighting like so many vultures. Japan has also joined issue with them. If a nation like China falls to the grand we as human beings shall shed a tear at its departing greatness but it may be worth our while to remind our rulers of the sad lesson the history of China as hoary as age can make it, will teach the rest of the world. One should mark the ambition as reflected in the following para we quote below:—

"No Government ever had a better chance of retrieving lost opportunities in China. None ever squandered its opportunities so foolishly. It will be a lasting disgrace to the Salisbury Administration if, acquiescing in Russia's advance into Manchuria and Shingking, it does not insist on a most radical change of policy in China, such as the throwing open of the whole of China to foreign trade. The British Empire is not yet in the arena to fight for its national existence, but the time has come to struggle for her fair share of commercial intercourse with the millions of China. If it is to be a contest between Russia and Great [illegible]ministration was ever more certain of general support than Lord Salisbury's. Lord Salisbury and his colleagues might well be justified in appealing to force of arms to defend our interests in China—not to drive Russia out of Port Arthur so much as to prevent the Russianisation of a very valuable portion of the Chinese Empire and the closing of the door to British commerce. There is no mistaking Russian antagonism. Russia means to humiliate us politically, to lower our prestige, and to deprive us of our commercial opportunities in the Far East. We must regain lost ground. If needs be, we must fight for the retention of open markets for the commerce that has made our Empire great."

## वऱ्हाड

हवामान—गेल्या दोन चार दिवसा पासून उष्णता पुन्हा वाढली. रात्रीं थंडपणा लवकर वाटतो. पारा ७८ अंशा पासून ११० पर्यंत चढतो. रोगराई ह्मणण्या सारखी कांहीं नाहीं. सार्वजनिक आरोग्य बरें आहे. पाण्या संबंधानें लोकांचे मोठ हाल होतात.

मे. सी. शामराव साहेब माजिस्ट्रेट वर्ग १ यांच्या समोर मि. मिरझा इमामबेग, आकोल्याचे चिफ कानस्टेबल यांजवर खोट्या जबानी बद्दल मोकदमा चालूं होता. रिधोऱ्याच्या किसन भिल्लानें पांडू भिल्लास डोक्याची धडक मारली आणि त्या धडकीनें पांडू मेला ह्मणून मे. जिल्हा माजिस्ट्रेटा पुढें किसनवर मोकद्दमा चालूं होता. त्यांत चीफ कानस्टेबलांनीं चौकशी केली होती ह्मणून त्यांची साक्ष झाली. त्या जबानींत खोटी गोष्ट सांगितल्या वरून चीफावर खटला होऊन गेल्या शुक्रवारीं त्यांस ३ महिन्यांची सक्त मजूरी व ५० रुपये दंड अशी शिक्षा झाली.

'वैदर्भीत' चमकणाऱ्या वाशिमाकडील फिरस्त्यास वाशिमच्या क्लबाचा एक सभासद कळवितो कीं क्लब चार चार आठ आठ दिवस बंद नसतो असें उघड्या डोळ्यांनीं नीटपणें पाहिलें असतां कळेल तेव्हां अनुभव घेऊन नंतर खरा मजकूर प्रसिद्ध करावा.

उद्यां २४ वे तारखेला महाराणी व्हिक्टोरिआ सरकारच्या जन्म दिवसा निमित्त सर्व ब्रिटिश राष्ट्रांत आनंदोत्सव होतील. या महोत्सवाच्या दिवशीं आपल्या राज्यांतील लोकांस त्यांच्या त्यांच्या योग्यते प्रमाणें बहुमानाचे किताब देण्याचा परिपाठ बहुत वर्षांचा आहे. यंदाच्या पदवीदानांत आमचा प्रांतही पवित्र झाला आहे. वऱ्हाड प्रांतांतील खालील गृहस्थांस त्यांच्या नांवापुढील बहुमानाचा किताब मिळाल्याबद्दल आह्मी मोठ्या आनंदानें त्यांचें अभिनंदन करितोंः—

| रा. रा. | पदवी |
|---|---|
| अलिशान रेसिडेंट प्लौडन | के. सि. एस आय. |
| रंगनाथ नरसिंह मुधोळकर | राव बहादूर |
| बंधूजी जनार्दन चौबळ | " |
| मनसुखराय | राय बहादूर |
| गोविंद व्यंकाजी खोत | राव साहेब |

'अहल्याचरित काव्य' नांवाच्या पुस्तकाचे कर्ते रा. रा. हरि मोरेश्वर शेवडे प्रिन्सिपाल ट्रेनिंग कालेज अकोला यांनीं आपल्या काव्याची एक प्रत आह्माकडे पाठविली आहे तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों.

---

### नोटीस

रा. रा. महादू वल्लद पुंजाजी माळी उगले रहाणार पातूर शेखबाबू व ओंकार अय्या गुरु रामलिंग अप्पा जंगम वस्ती पेठ बाळापूर. यांस

तुह्मास या लेखानें कळविण्यांत येते कीं बाळापूर येथील जंगमाचे मठाच्या इस्टेटीचा स्वामी मी असून त्या मठावर व्यवस्थापक मी नेमीत असतो. ही नेमणूक शिष्यपरंपरेनें मी आज पर्यंत चालूं ठेविली. सध्यां मठाची व्यवस्था शिष्य ओंकार अप्पा हे करितात पण पूर्ण मालकीच्या हक्का संबंधानें व्यवहार करण्याची त्याला मनाई आहे आणि कोणताही विशेष प्रकारचा व्यवहार माझ्या हुकुमाशिवाय करूं नये अशी व्यवस्थापकास माझी ताकीद आहे. असे असून ओंकार अय्या व तुह्मी मिळून जो गहाणखरेदीचा आपसांत व्यवहार केला आहे तो लटका आहे. अनधिकारी मनुष्यामध्यें ही गहाणखरेदी असल्यामुळें ती मला बांधू शकत नाहीं. पण तुह्मी उभयतां व्यर्थ फसूं नये आणि मलाही विनाकारण त्रास होऊं नये ह्मणून मी मुद्दाम ही नोटीस देत आहे. गेल्या तारीख १ जानेवारी सन १८९८ इसवी रोजीं तुह्मा उभयता मध्यें पातूर शेखबाबू येथील सर्व्हे नंबर ९८ एकर गुंठे १५८७ आकार रुपये २७८ या शेता संबंधानें जी गहाण व खरेदी झाली आहे ती बेकायदा असल्यामुळें रद्द आहे. त्याची जबाबदारी माझ्याकडे नाहीं ओंकार अय्या याला या व्यवहारा बद्दल मी दोष दिला आहे आणि त्यानें सर्व गोष्टी न उलगडल्या तर त्याच्याकडे बाळापूर येथील मठाची व्यवस्था न ठेवण्याची मला तजवीज करावी लागेल. ज्या अर्थी ओंकार अय्याकडून तुह्मी खोट्या मसलतीनें सदर्हू शेत खरेदी घेतलें आहे त्या अर्थी तुह्मावरही माझा विश्वास नाहीं.

सन १३०८ फसली साला साठीं मला सदर्हू शेत नफ्यानें दुसऱ्या कुळाकडे ११२ रुपयांस लावून काढावयाचें आहे तर तुह्मी तितक्या रुपयांचा कौलपट्टा नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आत माझ्या नांवानें करून द्यावा तसें न केल्यास व शेत दांडगाईनें माझ्या ताब्यांत न दिल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून सर्व नुकसानी भरून घेऊं व शेत ताब्यांत घेतलें जाईल. कळावें तारीख २२ माहे मे सन १८९८ इसवी.

सही

पंचाक्षरी अप्पा गुरु विरुपाक्ष
अय्या मालक मठ बाळापूर
दस्तूर खुद्द.

---

## वर्तमानसार

देशी वर्तमानपत्रांवर पाहारा करण्याचे उद्देशानें हल्लीं या शहरांत एक प्रेस कमिटी नांवाची मंडळी नेमण्यांत आली आहे. येथील सिटी मॅजिस्ट्रेट मि. एच. एफ. कार्व्हालो हे सदर कमिटीचे अध्यक्ष असून रा. सा. रणसिंग, सिटी मामलेदार, मि. मूर, सिटी पोलिस इनस्पेक्टर व रा. ब. भिडे व गोखले हे या कमिटीचे मेंबर आहेत. देशी वर्तमानपत्रांत येणाऱ्या लेखांवर नजर ठेवून त्या बद्दलचा साप्ताहिक रिपोर्ट सरकाराकडे पाठवावा असे सदर कमिटीनें ठरव आहे. ही योजना ठीक आहे. परंतु या संबधानें आमचे बंधु ज्ञानप्रकाशकार यांनीं ज्या सूचना केल्या आहेत त्या विचार करण्या सारख्या आहेत. या कमिटीच्या साप्ताहिक रिपोर्टाच्या प्रती दशी वर्तमानपत्रकर्त्यांस मिळणें अत्यंत अगत्याचें आहे. ह्मणजे त्यापासून त्या त्यांस कळून त्यांची दुरुस्ती करण्यास त्यास सवड सांपडणार आहे तसेंच आमच्या बंधूनीं सुचविल्याप्रमाणें या कमिटीचे वर्तमानपत्रांत येणाऱ्या प्रजाजनांच्या फिर्यादो व सरकारास हरएक बाबतींत केलेल्या सूचना याही सरकारापुढें मांडण्याचें सरकारानें फर्माविल्यास लोकांची दादें सरकारचे कानापर्यंत जाण्याचा एक उत्कृष्ट मार्ग खुला होणार आहे. या सूचनांचा सरकारानें अगत्यपूर्वक विचार करावा.

निजामहैद्राबाद येथेंही प्लेगच्या संशायित केसिस होऊं लागल्या आहेत.

सगळ्या रेलवेचे दर एकसारखे असावे अशाबद्दल हिंदुस्थानसरकार कमिशन नेमणार आहे.

हिमालयावरील बर्फावरून व सिलोन येथील पावसावरून इकडे पावसाळा लवकर सुरू होईल असें चिन्ह दिसत आहे.

मेसर्स शेरवूड आणि थॉमसन नांवाच्या लिव्हर्पूल येथील एका कापसाचा व्यापार करणाऱ्या पेढीनें दिवाळें काढलें. एकंदर देणें पन्नास हजार पौंड आहे.

सरहद्दीवरचे किल्ले व तटबंदीचीं कामें रॉयल एंजिनिअर्सनींच प्लॅन्स ठरवून बांधावीं आणि त्यांणीं त्यांच्याचकडून दर वर्षीची तपासणी व्हावी असे नियम सरकारानें पसार केले आहेत.

नवें भविष्य—डिंडिगल येथील कृष्णस्वामी पिले नांवाच्या मद्रासी ज्योतिष्यानें असें भीतिप्रद भविष्य केलें आहे कीं, नवंबर १८९९ पासून सन १९०३ च्या मे महिन्यापर्यंत हिंदुस्थानांत दुष्काळ, प्लेग, धरणीकंप व ज्वालामुखीचे भडाके इत्यादि उपायांनीं तीन हिस्से लोकसंख्येचा संहार होईल. वरील मुदतींत अष्टग्रहीचा योग आला आहे त्यानें हा परिणाम घडेल असें सदर ज्योतिष्याचें ह्मणणें आहे. दुसऱ्या एका ज्योतिष्यानेंही हे अष्टग्रहीचे अनिष्ट परिणाम कबूल केले आहेत. परंतु याची बाधा फक्त ६ महिनेच होईल आणि यांतील २॥ दिवस काय ते अतिशय नाशाचे जातील असें वाटलें आहे. मिळून काय! गेलेलीं वर्षें बरीं, अशीं वर्षें पुढें येणार असें हे ज्योतिषी सांगतात.

मंत्रचमत्कार— पंढरपूर येथील प्रसिद्ध वैद्य पांडुरंग ज्ञानेश्वर संत यांचे भाचे शंकरराव यांस बुधवारीं बागेंत सर्पाचा दका लागला होता व त्याच रात्रीं तो सर्प येऊन त्याला डसला. त्यानें पाव तासाच्या आंतच तो बेशुद्ध झाला. त्यावर बावाजी न्हावी नांवाच्या मंत्र्यानें प्रयोग केल्याबरोबर तो सर्प त्याच्या अंगांत येऊन ह्मणाला कीं,--"मी बागेंतील आहे मला त्रास दिल्यामुळें मी चावलों; दूध द्या ह्मणजे मी जातों." त्याप्रमाणें दूध दिल्यावर तो सावध होऊन रात्रीं जागण्यासाठीं देवळांत गेला. घरीं आल्यावर पुनः तो सर्प त्याला कडकडून चावला व १० मिनिटांनीं तो बेशुद्ध झाला. नंतर दुसरे प्रसिद्ध मांत्रिक रा. त[illegible] यांनीं त्याजवर प्रयोग करिताच सर्प त्याच्या अंगांत येऊन 'मी जातीचा मातंग आहे. ह्यानें अन्याय केला आहे, मी त्याला सोडणार नाहीं.' असें ह्मणाला; परंतु ह्या नागमंत्र्याच्या प्रयोगाचें सामर्थ्य फार कठिण असल्यामुळें त्यानें सर्प दीन होऊन शेवटीं 'मी सोडून जातो, मला मारूं नका, असें ह्मणाला व शंकरराव सावध झाले. हा चमत्कार पाहण्यास कोतवाल, पोलिस इन्स्पेक्टर, असि० सर्जन, डॉक्टर करंदीकर हे व गांवांतील शेंकडों लोक आलेले होते. रक्ताभिसरणांत गेलेले विष मंत्रसामर्थ्यानें उतरलेलें पाहून सर्व मंडळी चकित झाली ! ! ज्ञा०च.

फ्रान्सच्या लष्करामध्यें लढाईचे वेळीं शिपाई लोकांना दारुगोळा देण्याचें काम करण्यास कुत्र्यांना शिकविलें आहे. पायरेनियन जातीचे मोठालें कुत्रें या कामाकरितां शिकवून तयार करितात. प्रत्येक कुत्रा पांचशेंपर्यंत काडतुसें नेऊं शकतो. मात्र हें कुत्रे बंदुकीचे आवाजाला फार भितात. हें काम करतांना जर एखाद्या कुत्र्यास इजा झाली तर तो फिरून हे भयंकर काम करण्यास धजावत नाहीं.

ज्वालाग्राही तलाव—क्यान्सास येथें एक तलाव आहे. ह्यांतील पाणी गोठलें ह्मणजे त्यांतील बर्फाचा एक तुकडा घेऊन पेटविला असतां तो एक दोन मिनिटांपर्यंत सारखा जळूं शकतो. ह्या चमत्काराचे कारण बर्फाखालीं बनलेल्या ग्यासाचे बुडबुडे होत.

सोहारा मैदानांतील एक कोटी वीस लक्ष एकर जमीन Artesion विहिरींच्या साह्यानें लागवडीस आली आहे.

मथुरा येथें यमुना नदीचे कांठावर एक भयंकर गोष्ट घडून आली आहे. एक हिंदू मुलगा आपल्या आप्तांसह मथुरा येथें आपल्या लग्नाकरितां गेला होता. तो तेथें गेल्यावर ब्राह्मणानीं त्यास सांगितलें कीं, रात्रीं यमुनेवरून स्नानविधी करून यावें. तेव्हां तो दुर्दैवी मुलगा अंगावर दागिने घालून आपल्या मातोश्रीस व इतर काहीं मंडळीस बरोबर घेऊन स्नानाकरितां नदीवर गेला. मुलगा स्नानाकरितां पाण्यांत जातो आहे इतक्यांत त्याचे पाय धरून त्याला कोणी पाण्यात ओढून नेलें तो पुन्हा दिसला नाहीं काहीं लोक ह्मणतात कीं, त्याला सुसरीनें धरिलें असावें. परंतु आजपर्यंत सुसरीनें धरल्याचें उदाहरण या घाटावर झालेलें नाहीं तेव्हां ह्यांत काहीं तरी गुप्त असावें असा कांहींचा तर्क आहे. काळ.

इटालीच्या राज्यांतही मोठी गडबड सुरू झाली आहे. इटालीच्या राज्यांत वेगळाल्या ठिकाणीं लोकांनीं राजकीय दंगे चालू केले असून सरकारी फौजेशीं त्यांचे सामनेही चालू झाले आहेत. दोन्ही पक्षांचे पुष्कळ लोक ठार होत असून दंगेखोरांनी रेल्वे व ट्रामवे यांचा विध्वंस करण्याचा क्रम चालू केल्यावरून सरकारानें त्या त्या ठिकाणीं लश्करी कायदा सुरू केला आहे. इटालींत हल्लीं राजसत्ताक राज्यव्यवस्था आहे व ती मोडून प्रजासत्ताक करावी असा दंगेखोरांचा रोंख दिसतो. एकट्या मिलन शहरांत सरकारच्या ८,००० फौजेशीं दंगेखोरांचा एक सामना होऊन त्यात दंगेखोरांचे ३०० लोक ठार होऊन १,००० जखमी झाले असें सांगतात.

श्री. रामराव घोरपडे यांच्याकडून खालील हकीकत प्रसिद्ध होण्याकरितां आली आहे, ती आह्मी जशीच्या तशीच येथें प्रसिद्ध केली आहे.

"सतीमाई ह्या कै. जयाजीराव शिंदे सरकार अलिजा बहाद्दर यांच्या वडील भगिनी होत. यांना निजाम हैद्राबाद नजीक करपुडी या नांवाचें एक गांव आहे. तेथें ह्मतवडचे मान्यापैकीं वडील घराण्याची छोटीशी एक राजधानी आहे. तेथील मान्याशी यांचा विवाह झाला होता. याना उपजल्यापासून मातोश्रीचे दुधाची मुद्दां ओळख नाहीं यांचे लग्न झालें त्यावेळेस ह्या तीन दिवस बेशुद्ध पडल्या होत्या. ह्या थोर झाल्या तेव्हां यांचे भ्रतारानें कामवासनेनें त्यांच्या अंगास स्पर्श केला, त्या वेळेस यांचे भ्रताराने मारून न यांस दहन केलें. नंतर तीन वर्षानीं ह्या औदुंबराचे झाडांतून उत्पन्न झाल्या, नंतर यांचे भ्रतार पुढें भेटीस आले, नंतर त्यांनी त्यांची फारच स्तुती केली. ह्या मुंबईस होत्या. श्री मा. महाराणी जमनाबाई यांची तबेत सीक होती त्यावेळेस आह्मी त्यांना येथें आणिलें त्या वेळेस सतीमाई यांनीं सांगितलें कीं, श्री. सौभाग्यवती ताराबाबा तर वारल्याच, परंतु श्री जमनाबाईस मी कांहीं मरूं देत नाहीं. त्यावेळेस श्री. जमनाबाईसाहेब इतक्या सीक होत्या कीं, मुंबईचे प्रसिद्ध डाक्टर भालचंद्र यांनीं व येथील आणखी पुष्कळ वैद्यांनीं श्री. मा. जमनाबाईसाहेब ह्या या आजारांतून वांचणार नाहींत, असा सिद्धांत केला होता. तेव्हां सतीमाईनी या बाईसाहेबास नीट केल्या. हल्लीं श्री. बाइसाहेब यांची तबेत फारच उत्तम आहे. या सत्यनारायणाच्या व सूर्याच्या उपासक आहेत. ह्या दर रविवारीं सत्यनारायणापुढें सूर्योदया पासून सूर्यास्तापर्यंत उभ्या रहातात. या पूर्वीं रोड्यांचे धर्मशाळेंत उतरल्या होत्या त्या हल्लीं श्री भाऊ शिंदे यांच्या मंदिरांत आहेत. यांनीं येथें प्लेगचे आजारांचीं पुष्कळ माणसें बरीं केलीं. प्लेगचा आजार कमी होण्याकरितां यांनी आपलें पोट फाडून आंतील काळीज देवीस अर्पण केलें, तें कृत्य छोटूमियासाहेब व पोलिसचा शिपाई व आणखी पुष्कळ लोकांनीं बघितलें आहे. देवीचा होम चालला होता त्यावेळेस तूप कमी आलें त्यावेळेस एका बाईनें पाण्याचा एक घडा भरून आणला त्याचें देवीनें तूप केलें व आपोआप पुष्कळ नारळ येऊन पडूं लागले. येणेंप्रमाणें देवीची स्थापना केली."

लाहोरचा एक पत्रकर्ता सांगतो कीं, एके दिवशीं तेथील कांहीं शिपाई जंगलांत शिकारीस गेले असता त्यास जंगलांत तांबडा लाल असा एक [illegible] वाघ आढळला. शिपायी लागलीच परत आले व ताप भरून आजारी झाले. ते त्या भयंकर वाघास पाहून भ्याले व आजारी झाले असें त्या पत्रकर्त्याचें ह्मणणें आहे! ते शिपायी त्या वाघाच्या भीतीनेंच आजारी झाले असतील तर खरोखरीच वाईट वाटण्यासारखें आहे.

कलकत्यास प्लेगचा आजार वाढण्याचें बंद झाले आहे. मागच्या बुधवारीं जो एक साहेब मारला गेला तो काण याचा अजून पत्ता लागला नाहीं त्याचें प्रेत ओळखणाराच कोणी सापडत नाहीं. आखियांतला एक इंजनर असावा असें ह्मणतात. [illegible] कारणानें कलकत्ता शहरांत जे कट होऊं लागले होते ते बंद झाले. अ०

विलायतेस विंड सरक्यासल जवळ एका इमारतीचा पाया खोदण्याचें काम चाललें असतांना जमिनींत एक प्रेताची पेटी सांपडली ती उत्तम तऱ्हेनें शृंगारलेली होती तेव्हां ही कोणा थोरा मोठ्याची असावी असें समजून उघडून पाहिली तों असें समजून आलें कीं, १५१३ सालीं मेलेल्या एडवर्ड दी सिक्थचें हें प्रेत होय. मरण समयीं यांचें वय १६ वर्षांचें होतें. त्यांचें सुंदर शरीर जशाचें तसें असलेलें आढळलें. मागचा दाखला काढून पाहतां शेवाची पेटी तयार करण्याला सहा हजार पौंड लागलें होते असें समजलें.

सिरियांत बंड झालें असून तिकडे इंग्लिश लष्कर रवाना करण्यांत आलें आहे. जिकडे तिकडे बंडाळी माजली आहे.

इटली (मिलट) देशांतही बंड झालें आहे. पुष्कळ प्राणहानी झाल्याचें कळतें.

सरकारी कामदारांनीं मानपत्र किंवा देणगी कोणाकडून घेऊं नये असा एक ठराव मागें झाला असून तो बरोबर अमलांत येत नाहीं, तो यावा ह्मणून इंग्लिश सरकारनें पुन्हां सक्त बजावलें आहे.

बक्षीस—संतोषप्रद कामगिरी बजाविल्याबद्दल म्हैसूरच्या महाराणीनें आपले प्रधान सर शेषाद्रि अय्यर यांस पांच लक्ष रुपये इनाम दिले आहे.

कांहीं वस्तु अशा असतात कीं, त्या गरीबास मिळतात, परंतु श्रीमंतास प्राप्त होत नाहींत. त्यांचा पैसाच त्यांच्या आड येतो.

अलीकडे झाडांचे तंतु शिजवून त्यांचें कापड करण्याची फार सुरेख युक्ति निघाली आहे. कापड फार सुरेख निघते.

आरोग्य आपोआप येतें, पण रोग प्राप्त करून घेण्यानें मात्र फार दुःख काढावें लागतें, सृष्टीच्या [illegible] क्रमानें आरोग्य प्राप्त होतें, सुधारणेच्या कृत्रिम जीवन क्रमानें रोग प्राप्ती होत.

राकेलचा रिपू हिंदुस्थानांत घरोबर बोकळलेल्या तेलाचा नक्षा उतरणारे 'सुमात्रा आईल' नांवाचें एक अतिस्वस्त तेल चिनांत निघालें आहे. त्यानें राकलेला चिनांतून बहुतेक घालविलेंच आणि आतां मद्रासेकडे त्या तेलानें प्रवेश केला आहे. स्वस्त आहे तर आमच्या घराची पायरी कांहीं दिवसांनीं तें चढेलच. धा० वृ०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „.७ „१ ८८
किरकोळ अंकास ....................................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly......... 3 ................ 8 as
Single copy ..................................4 as

Advertisemen
Below 10 lines ......2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII — AKOLA MONDAY 30 MAY 1898 — NO 21
वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख ३० माहे मे सन १८९८ इ० — अंक २१

### नोटीस

रा. रा. निळसा वल्लद तुकारामसा माळवी सोनार राहणार कावस बुजरूख तालुके अकोट जिल्हे अकोलें. यास नोटीस देणार भुली मर्द निळसा माळवी सोनार राहणार उंबरें तालुके अकोट जिल्हे अकोलें. इजकडून नोटिशीनें असें कळविलें जातें कीं तूं माझा लग्नाचा नवरा आहेस मी लहान होतें तोंपर्यंत माझें सासर माहेर झालें. मि जेव्हां शहाणी झालें तेव्हां माझ्या आईबापांनें मजला सासरी नेऊन घातलें. मी सासरी आलें ह्मणजे तूं आपल्या मामाच्या घरीं बेलुऱ्यास जाऊन रहात होतास. पुढें कांहीं दिवसानंतर माझ्या नेहमींच्या मजबरोबर वागण्यानें मजला असें खात्रीपूर्वक दिसून आलें कीं नवराबायकोमध्यें जोडप्याचा जो प्रेम पुरुषाच्या ठायीं असतो तो तुजपाशीं नाहीं असें समजलें व खात्री झाली व जातगंगेत गवगवा झाला तेव्हां माझ्या आईबापानीं जात गंगेस विचारलें कीं ह्या मुलीची पुढच्या संसाराची कशी काय व्यवस्था करावयाची आहे, तेव्हां जातगंगेनें माझे मावसभावाचे येथें पाचवी झाली त्या वेळेस तुजला पंचांत बोलावले त्यावेळेस सर्व जातगंगा जमून मकंमपुरास गेले व तेथें तुजविषयीं जातगंगेनें खात्री करून घेतली ते त्यावेळेस पंचांनीं व माझ्या भावांनीं माझे बद्दल फारकती मागिताली तर तूं पंचांतून पंचांस न कळवितां चोरून पळून गेला त्यास आज सुमारें ३ वर्षे झाली या तीन वर्षांत व ह्याच्या पूर्वींच्या ३ वर्षांत ( मिळून सहा वर्षांत ) तूं माझ्या खाण्या पिण्या बद्दल व कपड्यालत्या बद्दल कांहींच विचारपूस केली नाहीं आजपर्यंत मी तुझी वाट पाहिली कीं तूं माझ्या खाण्या पिण्या बद्दल निर्वाहाची कांहीं तरी सोय करशील पण तुझे हातून हें कांहींच झालें नाहीं. व माझा जन्म व्यर्थ जात आहे. नवऱ्यापासून जे कांहीं संसार सुख असतें तें तुझ्यापासून मजला कांहींच मिळण्यासारखें दिसत नाहीं करितां ह्या नोटीशीनें असें कळवितें कीं मी सहा वर्षांत लोकांचें कर्ज काढलें रुपये २१६ दोनशें सोळा ते आणून द्यावें आणि चार जात भाई पंच यांची व माझी अशी खात्रीकरून द्यावी कीं माझ्या जीवाभावास कांहीं दखल होणार नाहीं ह्या दुनीयेमध्यें नवरा बायको एकमेकापासून जे संसारसुख प्राप्त करून घेतात व भोगितात त्याप्रमाणें तूं दुनियेदारीनें वागशील अशी खात्री करून द्यावी. ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसाचे आंत असें तुझ्या हातून न झालें तर सदरहू पोटगीच्या रुपयाबदल व नेहमींच्या खावटीबद्दल रीतिप्रमाणें तुजवर सरकारांत नालीश करून पैसे घेतले जातील व सदरहू लिहिल्याप्रमाणें पंच व माझी खात्री करून न दिल्यास हीच तुझी फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुझा नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं ह्मणून दिली नोटीस तारीख २३ माहे मे सन १८९८ इसवी.

सही

सहीची निशाणी बांगडी भुली मर्द निळसा सोनार दस्तुर भदुसा वल्लद परशराम सोनार राहणार उंबरें दस्तुर खुद.

### नोटीस

नोटीस बेशमी नारायण वल्लद शामजी लोकड्या जात तेली राहणार अकोलें तपलाबाद यास नोटीस देणार राजी मर्द नारायण तेली राहणार अकोलें. नोटिशीनें असें कळवितें कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून आज सुमारें ६ महिने झाले मी आपले मामाचे घरीं आहे. त्या अवकाशांत मी, माझे मामा व इतर पंच यांनीं दोन तीन वेळ तुम्हाला मजला घेऊन जाण्या विषयीं समजाविलें तुम्ही उलट जबाब दिला कीं तुम्ही ६० रुपये, द्यावे ह्मणजे मी फारकती देतों. कारण माझें पोट माझ्यानेंच भरवत नाहीं सबब मी तिजला पोसण्यास असमर्थ आहे. मजला आईबाप वगैरे कोणी नसले कारणानें मामाचे घरीं रहात आहे. इतके दिवस त्यानें माझे नांवावर लोकांचें कर्ज काढून मजला पोसलें. आतां त्याजला कोणी कर्ज देत नसले कारणानें तो मजला पोसण्यास असमर्थ झाला आहे. आतां मजला दुसरा कांहीं आधार नसलेकारणानें मी फार लाचार बनले आहे. करितां तुम्ही ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत माझे खावटीचे रुपये दरमहा ५ रुपये प्रमाणें सहा महिन्याचे रुपये ३० तीस माझे मामाला देऊन मजला घरीं घेऊन जावें असें व केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन व खावटी बद्दल कोर्टांत रीती प्रमाणें फिर्याद करून खावटीचे सर्व रुपये ह्या नोटीसीचे खर्चासह भरून घेईन मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर कोणतेही प्रकारें राहणार नाहीं. ह्मणून दिली नोटीस सही. तारीख २६।५।९८ इसवी

सही

राजी मर्द नारायण तेली राहणार अकोलें निशाणी खुद्द हातची बांगडी.

### नोटीस

रा. रा. रंजाजी वल्लद रत्नाजी पाटील राहणार मौजे नांदखेड तालुके बाळापूर जिल्हा आकोला यांस. नोटीस देणार शामजी वल्लद माहादाजी पाटील व सोनाजी वल्लद महादाजी पाटील रहाणार खामखेड तालुके बाळापूर जिल्हा आकोला याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे खामखेड तालुके बाळापूर येथें सर्वे नंबर ३९ एकर २२४१३ आकार रुपये २३ चे असून त्यांत आमचे मालकीचे ४१०८८ चे हिस्से आहेत. सदरहू हिशाचा तुम्ही अन्यायानें व जबरदस्तीनें कबजा घेऊन ते वांहात आहां सदरहू हिशावर तुमची कोणयाच प्रकारची मालकी नाहीं तरी ही नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसाचे आंत सदरहू हिशाचा कबजा आह्मास द्यावा त्याप्रमाणें वरील मुदतींत तुमचेकडून कबज्या न मिळाल्यास रीतिप्रमाणें सर्व गोष्टी करितां तजवीज करणें भाग पडेल कळावें. तारीख २६ माहे मे सन १८९८ इसवी.

सही

ही निशाणी शामजी वल्लद माहादाजी पाटील याची असे.
ही निशाणी सोनाजी वल्लद माहादाजी पाटील याची असे.

## वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शुद्ध १० शके १८१९

अलिकडे सरकारची राजनीतीच बदलली आहे. नवीन फेरफाराचा भावार्थ असा कीं पूर्वींच्या उदार तत्वाच्या ठिकाणीं सांप्रत अनुदार तत्वांचा प्रसार होत चालला आहे. या राजनीतीचा परिणाम क्रमशः वाईट होत आहे. प्रजेविषयीं वात्सल्य जसें सरकारच्या मनांत वागावें तसें वागत नाहीं. एका प्रकारचा अविश्वास प्रजेविषयीं सरकार दाखवीत आहे. राजद्रोहाचा नवा कायदा प्रस्तुतच्या राजनीतीची उत्तम साक्ष होय. सध्याचें राजकीय धोरण इंडियन प्रजेला प्रतिकूळ आहे आणि सर्व गोष्टींचा ओघ इंडियनाचें हक्क उत्तरोउत्तर कमी कमी करण्याकडे विशेष आहे. मध्यंतरी लार्ड रिपन साहेबांच्या कारकीर्दींत स्थानिक स्वराज्या सारख्या ज्या उत्कृष्ठ गोष्टी इंडियनांस लाभल्या त्यांचा प्रतिकार हल्लीं चालूं आहे. राजकीय चळवळींत आमच्या लोकांचें पाऊल पुढें पडूं पहात आहे तथापि त्यांची पिच्छेहाट नव्या राजपद्धतीनें झपाट्यानें होत आहे. चांगल्या कल्याणप्रद गोष्टींचा असा विपर्यास पाहून सर्वत्रांस मोठा खेद होईल.

जसें कर्णधार सुकाणूं फिरवून प्रचंड जहाजाला निराळी दिशा देतो तद्वत् प्रस्तुतच्या राजकीय पद्धतीनें सर्व राष्ट्राचें जहाज भलत्याच दिशेनें फिरलें आहे. अशा विपर्यासाच्या काळीं आमच्या स्थानिक स्वराज्याच्या संस्था अगदीं कुचकाच्या ठरत आहेत आणि हळूं हळूं त्यांचे अष्टाधिकार काढून घेण्यांत येत आहेत हेंही यथाक्रमच होय. सगळ्या राष्ट्राची जी स्थिती ती त्याच्या घटकावयवांची स्थिती होय वऱ्हाड प्रांतांत देखील बादशाही दडपशा पुष्कळ चालूं झाला आहे. आमच्या प्रांताचें मुख्य सरकार ह्मणजे अलिशान रेसिडेंट साहेब होत. त्यांचा विचार सभासद निवडण्याचा हक्क मुनसिपालिट्या व जिल्हाबोर्ड या संस्थांस असूं नये असा आहे. गेल्या मुनसिपाल रिपोर्टांत हा विचार अगदीं स्पष्टतेनें व खुलावटीनें जाहिर केला आहे. अलिशान रेसिडेंट सर प्लौडन व कमिशनर मि. बुलक या दोघा वरिष्ट अधिकाऱ्यांची मतें या प्रकरणांत बरोबर जुळतात किंवा सरकारी अधिकारी आपला कारभार मुख्य राजकीय धोरण पाहून चालवितात असें दिसतें. वऱ्हाड प्रांताला स्थानिक स्वराज्याची देणगी देतांनाच प्रारंभीं पुष्कळ अडचणी व अपवाद घालून ठेविले आहेत. असें असून देखील हल्लींचे रेसिडेंट पूर्वीं कमिशनर होते तेव्हां मुनसिपालिट्यांचीं व बोर्डाचीं कामें समाधानकारक रीतीनें चालत होतीं आमच्या ह्मणण्याच्या प्रत्यंतराला त्या वेळचें वार्षिक रिपोर्ट पुरेसे आहेत पण कालांतरानें सर्व चांगल्या गोष्टी वाईट दिसूं लागतात. सध्यां मुनसिपालिटी व जिल्हा बोर्ड या संस्था सरकारच्या अनादरास पात्र ठरल्या आहेत आणि सरकारी अभिप्रायाच्या टांकसाळेंत नवीन नाणें असें पाडलें आहे कीं सभासद लोकनियुक्त असणें इंडियन प्रजेला खरोखर फारसें आवडतें नाहीं. व लोकांच्या मनाची प्रवृत्ती लोकमताच्या निवडा निवडीला मोठीशी अनुकूळ नाहीं. लोकांस सभासद निवडूं न देतां सरकारच्या मार्फतीनें योग्य मनुष्यांच्या नेमणुका होत गेल्या पाहिजेत असें नवीन धोरण आहे.

वरील अभिप्राय प्रकाशित होऊन फार काल लोटला नाहीं तोंच दुश्चिन्हांचे डोंगर समीप येऊन कोसळले ! प्रथम तडाखा इलिचपूर शहराच्या मुनिसिपालिटीवर बसला आहे. गेल्या १६ मे तारखेच्या रेसिडेन्सी आरडर्स मध्यें नंबर १६८ चा हुकूम प्रसिद्ध झाला आहे कीं गव्हरनर जनरल इन कौंसिलच्या मंजुरातीनें रेसिडेंट साहेबांनीं इलिचपूर सिटी मुनसिपालिटी निराळी वगळली आणि मुनसिपालिटीचे सभासदांपैकीं कांहीं सभासद लोकनियुक्त असावेत असा जो नियम होता तो नियम यापुढें वगळलेल्या मुनिसिपालिटीस लागूं नाहीं असा ठराव केला. असा हुकूम खरोखर निघेल

अशी गोष्ट गेल्या वार्षिक रिपोर्टांतच ध्वनित झाली होती. दुसरी पाळी उमरावती शहर मुनसिपालिटीची आहे. तेव्हां तिच्या बद्दलही असा हुकूम ऐकण्यास आह्मी स्वतांस तयार करीत आहों. वारा जसा वाहील तशी पाठ देऊन नंतर आपल्या इष्ट कार्याकडे वळलें पाहिजे. चालूं जोरदार प्रवाहाचा प्रतिरोध करून मोठासा फायदा नसतो. प्रवाहच निराळ्या दिशेनें बदलेल असा प्रयत्न पाहिजे.

इलिचपूर सिटी मुनसिपालिटी १८७३ सालीं १ ले एप्रिल रोजीं स्थापित झाली. गेल्या लोकगणती प्रमाणें, या मुनसिपालिटीच्या हद्दींत २६६३७ लोक रहातात. ही मुनसिपालिटी फार जुनी आहे. अकोला व उमरावती मुनसिपालिटीच्या मागून चार वर्षांनीं ही स्थापित झाली तथापि अकोला व उमरावती हीं शहरें जशीं भरभराटीस आलीं तशी गोष्ट इलिचपूर शहराची नाहीं. हें जुनाट शहर आहे पण सरकारी कचेऱ्या अन्यत्र असल्यामुळें इलिचपूरचें स्थानमहत्त्व पुष्कळ कमी झालें आहे. नवीन इंग्रजी राज्यशतींत तेथील लोक पुष्कळ गरीब दशेला पोंचले आहेत आणि गरिबीच्या मानानें तेथील मुनसिपल करांचें प्रमाणही अगदीं कमी आहे. टाऊन फंड व भंगीपट्टी असे दोन कर मुख्य आहेत. त्यांचा बोजा सरासरीनें दर माणशी ५ आणे ९ पै पडतो. लोकस्थितीच्या मानानें ही गोष्ट अगदीं बरोबर आहे पण हें कमिशनर मि. बुलक यांस काडीमात्र खपलें नाहीं आणि कराच्या कमी बोजासंबंधानें त्यांनीं अकांड तांडव आरंभून इलिचपूरचे लोक मुनसिपल हक्काला अपात्र आहे असा अप्रत्यक्ष शेरा दिला आहे. इलिचपूर मुनसिपालिटींत निवडणुकीच्या हक्काची वाहवा इतकी मानतात कीं मत देण्याचा अधिकार ज्या इसमांस पोचतो अशा पैकीं शेंकडा ६३-४ लोकांनीं आपापल्या प्रतिनिधींस गेल्या निवडणुकीच्या वेळीं मतें दिलीं. सरकारी तहशीलदार सेक्रेटरी आहेत हाच काय तो दोष कमिशनरांस दिसून आला. इलिचपूरची मुनसिपालिटी गरीब आहे तेव्हां दुष्काळा सारख्या आपत्काळीं मुनसिपालिटीचा पैसा लोकांकडे थकला ही गोष्ट अगदीं साहजिक आहे. लोकांकडे करांची बाकी राहूं दिली हा मोठा गुन्हा आहे असें आलिशान रेसिडेंट साहेबांचें ह्मणणें आहे आणि ह्या मोठ्या चुकीला शिक्षा ह्मणजे मुनसिपालिटीचा प्रतीनिधी निवडण्याचा हक्क काढून घेण्याचा होय. एकंदरीनें सरकारनें मोठा अन्याय केला आहे. या अवकृपेची छाया इतर मुनसिपालिट्यांवर पडूं नये एवढीच सरकारापाशी प्रार्थना आहे. आणि इलिचपूर मुनसिपालिटीनें सरकारी ह्मणण्या प्रमाणें सर्व दुरुस्त्या केल्या नंतर सरकार मुनसिपालिटीचा हक्क पुन्हा परत करितील अशी आह्मी आशा करितों.

---

गेल्या महाराणी सरकारच्या जन्मोत्सवाच्या दिवशीं पुण्यास दक्षिणेंतील सरदारांचा दरबार भरला होता. वार्षिक वहिवाटी प्रमाणें हा दरबार भरविला होता त्या वेळीं नामदार लॉर्ड साहेब अध्यक्षस्थानीं विराजित होते. त्यांच्या भाषणांत त्यांनीं दुष्काळग्रस्ता विषयीं महाराणी साहेबांचा कळवळा पुनः पुन्हा उच्चारून दाखविला, आणि दुष्काळ, धरणीकंप, प्लेग इत्यादि उपाधी पासून महाराष्ट्र सुटत आहे या बद्दल आनंद प्रदर्शित केला. नामदार लॉर्ड यांच्या भाषणांत एक मोठी आनंदाची गोष्ट कळली. आणि त्या गोष्टीच्या प्रकाशनाबद्दल महाराष्ट्रच काय पण सर्व देश त्यांचा अत्यंत ऋणी आहे. लेफटेनंट एअर्स्ट व मि. र्‍यांड यांचा खून करणारा इसम फाशीवर गेला. त्या खुनांच्या प्रकरणांत पुण्यांतील वजनदार पण राजद्रोही लोकांचा कट आहे व त्या लोकांनीं एका सांगकाम्या माणसा कडून खून करविले अशी प्रथम समजूत होती पण न्यायाधीश या नात्यानें तत्संबंधी खटल्यांत काम करीत असतांना नामदार लॉर्ड साहेब यांची खात्री झाली कीं या खुनांच्या बुडाशी कट वगैरे कांहीं नाहीं; पुण्याची मंडळी या बाबतींत अगदीं अलिप्त आहेत. मोठ्या आल्हादाची गोष्ट कीं सरकारी माणसांस अखेरीला सर्व खरा खरा प्रकार कळून आला आहे. ही आनंदाची बातमी सरकारद्वारा भर दरबारांत कळविण्यांत आली यावरून आह्मांस वाटतें कीं मुंबई सरकारास आपल्या चुक्याबद्दल पश्चात्ताप होत आहे. सरदार नातूंची सुटका पुळपुळीतच झाली आहे. तेव्हां पुण्यांचे जादा पोलीस लवकर उठेल व राजश्री बाळ गंगाधर टिळक यांची बंध मुक्तता होईल अशी आह्मी आशा करितों. सरकारी कृपाच झाली तर लोकांच्या आशावृक्षाला गोड गोड फळें लवच येतील. परमेश्वर सांडहर्स्ट यांची कारकीर्द अखेरीला तरी गोड करो!

---

फॅमिन कमिशन नेमतांना सरकारनें आपल्या पूर्वीच्या कामाची तारीफ केली आहे १८७८ च्या कमिशनानें सूचविलेल्या दुष्काळ प्रतिबंधक योजना अंमलांत चांगल्या आणिल्या आहेत हें विस्तारपूर्वक सांगतांना इंडिया सरकार ह्मणतात कीं दुष्काळ टाळण्याचे उपाय जे सुचविले होते ते बहुतेक योजण्यांत आले आहेत. रेलवे पूर्वीपेक्षां दुपटीनें वाढली आणि कालव्या च्या पाण्याच्या सोयी पुष्कळ वाढल्या आहेत. आग्रिकलचरल खातें प्रांतोप्रांतीं स्थापित केलें आहे, खेडेगांवच्या संस्था सुधारल्या आहेत, शेतकरी संबंधाची नोंदणी दुरुस्त झाली आहे, शेतकरी लोकांस सरकारांतून कर्जें अधिकाधीक मिळतात, शेतीचा सारा सुलभ व माफक आहे, नवीन जमिनी कमी साऱ्यानें उपयोगात आणिल्या आहेत, जंगल खातें पुष्कळ वाढलें आहे, व जमिनीचा मालक व रयत याच्या मधील परस्पर संबंध सुखावह होत आहे. तशीच उद्योगधंद्याची व व्यापाराची अभिवृद्धीही मोठ्या झपाट्यानें होत, आहे. सरकारानें वरील वर्णिलेली स्थिती जर खरी असती तर किती फायदा होईल बरें। या वर्णनाचा एक शतांश तरी अनुभवाला येता तर आह्मी सरकारचे फार आभारी झालों असतों.

वरील वर्णनापैकीं रेलवेच्या विस्ताराचा भाग बराच खरा आहे. कालव्यांचें पाणी पुष्कळ ठिकाणीं अद्याप नेण्यासारखें आहे. रेलवे पेक्षां कालवे बांधण्याकडे सरकार सार्वजनिक पैसा खर्च करील तर फार नामी होईल. रेलवे मध्यें विलायतच्या मंडळीचे भांडवल व्याजीं लागतें ह्मणून त्यांच्या हितासाठीं रेलवे जितक्या निघतात तितक्या आमच्या कल्याणासाठीं निघत नाहींत. सारा फार जबर आहे, शेतकरी कर्जबाजारी आहेत. देशाचें दिवाळें निघण्याचा रंग दिसतो, सरहद्दीवरील लढाया चालूंच आहेत व लक्षावधी रुपयांचा फन्ना उडत आहे इत्यादि गोष्टी आमच्या डोळ्या समोर उभ्या आहेत. त्या शिवाय आमच्या देशचे उद्योगधंदे व व्यापार झपाट्यानें वाढत आहे असें विधान सरकारनें ठोकून दिलें आहे तें स्वप्नांतल्या सृष्टींत देखील खरें वाटणार नाहीं. सरकार फॅमिन कमिशनचा डामडौल मोठा घालतें पण त्या कमिशनांचा उपयोग मात्र जसा व्हावा तसा होत नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

---

आमची मुनसिपालिटीने जे नवीन कर बसवीत आहे ते गरीब लोकांस फार जाचणारे आहेत घरपट्टी, भंगीपट्टी, गाडीपट्टी, घोडेपट्टी इत्यादि पट्या लोकांस अतिशय पीडाकारक होतील. गेल्या तीस वर्षांचा इतिहास पाहिला असतां असें आढळेल कीं शहरगांवची वस्ती सेडून गोरगरिबांस खेडेगांव पाहण्याची वेळ येणार आहे. उत्तरोत्तर करांचा बोजा वाढत चालला आहे आणि तो लोकांच्या ऐपती बाहेर गेला आहे. नवीं नवीं कामें मुनसिपालिटीवर लादलीं आहेत आणि तिच्या उत्पन्नाच्या बाबी सरकारनें कमी केल्या आहेत. आणि या दोन कारणामुळें करांचा बोजा फार वाढला आहे. सरकार उत्पन्न कमी करितें तर मुनसिपालिटीनें आपल्या अंगावरील कार्यें सरकाराकडे परत दिली पाहिजेत. असें करण्या शिवाय दुसरी गतीच नाहीं. जर प्राथमिक शाळांचा खर्च उत्पन्नापेक्षां अधीक असेल तर त्या शाळा सरकाराकडे परत केल्या पाहिजेत हीच गोष्ट प्रत्येक बाबतींत लागूं केली पाहिजे. मार्केटें स्वतंत्र केल्यामुळें, मुनसिपल हद्दीतील जागा सरकारनें घेतल्या मुळें, टाऊन फंड सरकारी नोकरावरील उठविल्यामुळें व अशा नाना कारणामुळें मुनसिपालिटीस नवीन कर बसवावे लागले आणि त्यांचा जांच गरीब लोकास फार होणार आहे.

भंगीपट्टी घराच्या भाड्याच्या किंमतीवर आकारली आहे. तिचा बोजा पूर्वीपेक्षां पुष्कळ वाढला आहे. या भंगीपट्टी संबंधानें लोकांस नोटिसा देखील बरोबर दिल्या नाहींत. दौंडी पिटल्यानें मुनसिपाल आफिसांत घराच्या भाड्याच्या आकारणीचे तक्ते उघडे ठेविल्यानें किंवा अशाच तऱ्हेनें लोकांस त्यांच्यावर नवीन बसणाऱ्या करांची पुरेशी नोटीस होत नाहीं असें आह्मास वाटतें आकोला मुनसिपालिटीनें आपल्या हद्दींतील लोकांस लेखी हुकुमानें प्रत्येकीं निराळी नोटीस द्यावी असें आमचें मत आहे,

---

आकोल्याच्या सडका इतक्या वाईट झाल्या आहेत कीं रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्यां माणसांस व गाडीघोड्यांस लहानमोठ्या दुखापती देखील होतात. ठिकठिकाणीं खळगे पुष्कळ झाले आहेत. गांवांतील सडका पाहून मुनसिपालिटीच्या व्यवस्थापकांस लाज वाटली पाहिजे. या वाईट रस्त्यांची दुरुस्ती या पुढें लांबणीवर टाकण्याची सवड राहिली नाहीं. वेळेवर दुरुस्ती न केल्यामुळें एक वाईट भाग जवळचा दुसरा भाग देखील वाईट करितो. ह्मणून आह्मी उमेद बाळगतो कीं रस्त्यांची दुरुस्ती लवकरच होईल. आकोल्यास नळाच्या पाण्यानें मुनसिपालिटीवर खर्चाचा बोजा मोठा पडला पण तो खर्च आतां निरर्थक वाटूं लागला आहे किंवा निदान खर्चाच्या मानानें लोकांस सुख कांहींच नाहीं नदीचें पात्र अगदीं कोरडें पडलें आणि लोकांचे पाण्यासाठीं हाल अतीशय होत आहेत लोकांच्या यातनेला सीमाच नाहीं. गांवातल्या विहिरी आटल्या आहेत. गोडें पाणी काय व खारें पाणी काय मिळण्याला मोठे प्रयास पडतात. नळाचें पाणी हरोज अगदीं थोडें मिळतें आणि लोकांची फसवणूक मोठी होते. नळाचें पाणी सोडण्याची देखील वेळ नियमित नसून पाण्याचा पुरवठा कितपत होईल याचाही नेम नसतो. नदींत बावड्या खोदतात पण त्या नीटनेटक्या न बांधल्या मुळें पाणी बरोबर मिळत नाहीं, मनुष्याच्या जिवाला धक्का पोचतो, व अजच्या विहिरी उद्यांला बुजून जातात. मुनसिपालिटी नदींत विहिरी चांगल्या प्रशस्त, मजबूत व टिकाऊ बांधतील तर लोकांवर मुनसिपालिटीचा उपकार होईल.

---

# The Berar Samachar

MONDAY, MAY 30 1898.

Lord Salisbury plays the part of a cynic when he spoke the other day at the Primrose—League about the nations in the East. The prime—minister indirectly suggests that the nations in the far East will fall a victim to the civilisation of the European nations. The Spanish—American war illustrates very well how a powerful nation like the Uunited States is finally shaking to its foundations the Spanish empire Might is right: this proverb Lord Salisbury peculiarly examplifies in his new division of living and dying nations He observed:—

"You may roughly divide the nations of the world as the living and the dying. On one side you have great countries of enormous power growing in power every year, growing in wealth, growing in dominion, growing in the perfection of their organization. * * * By the side of these splendid organizations, of which nothing seems to diminish the forces and which present rival claims which the future may only be able by a bloody arbitrament to adjust—by the side of these there are a number of communities which I can only describe as dying, though the epithet applies to them of course in very different degress and with a very different amount of certain application."

This was the very theme when Sir George White justified the Frontier wars of the Indian Government. Civilization and barbarism cannot consistently co-exist. The claims of war are in short the demands of civilization, and if we view our Indian matters in this light, the result is appalling. India is then a dying nation unless we are admitted in right earnestness to the full rights and privileges of a British Citizen. The canker of debasing the whole nation

is already at work. The retrograde policy of repression is pushing on the decay of the Indian Empire and we can hardly guess what a powerful downfall we are passing through in the last quarter of the British rule in India. The Indians are not a rich people, they do not form a powerful portion of the British dominions, their industries and commerce have given way before the absorbing free trade principles of Great Britain. The English industries conducted with the help of steam and electricity have monopolized the Indian markets, and all things have been so shaped as to draw away the life—blood of this ancient nation. The picture is, no doubt, gloomy and dismal; but we cannot throw it away in our sober mood because it represents the real state of India Such a sad conclusion we can hardly harbour in our minds when all our hopes centred in the righteous and generous rule of the British nation. The present wave of Imperialism is, we hope, a matter of accident. Our loyalty to the British throne is proverbial and our rise as a nation under the benign British Government predicts a future very different from what we are at present in the last decade or two, at the most. The National Congress exactly explains our position in the scale of nations. Just as telegraph and railway annihilates distance and time so the British rule is destined to do away with race and creed distinctions and to lift us all to the noble and proud status of a British citizen. The unifying cement is the assimilating process of the British rule. Herein lies the great secret of success in our future political battles. We would only request our British rulers to be kind and sympathetic. There should be no step—motherly love towards India in the Victorian era. A change in the right direction will set right the present tendency towards dis—content. The only remedy lies in the reversal of the present policy of the India Government.

Mr. R. C. Dutt has contributed to the columns of "India" a very learned article on the recent changes proposed in the rent—law Bengal. His view is specially to be honoured because he bases his arguments on actual experience and stern facts. After condeming the proposed bill of the Bengal government he writes towards the close in a strain of an honest historian on the out-come of the present policy of repression. We give below in the eloquent terms of the writer himself his opinion in the above connection:—

"It is sad to contemplate how many of the old safeguards for good go-vernment have been swept away within the last two years, and how repressive and retrograde legislation is swamping the very foundations of a wise and just system of administration. We have seen the law of sedition altered in India, and a new law passed, which for its vagueness and its Draconian severity has shocked public feeling in England and in India. We have seen the rights of municipal self-government being tampered with in Calcutta, in Madras, and in Bombay, under the idea—which our own experience tells us is false—that a few nominated workers can or will work more zealously than the elected re-presentatives of the people. And lastly, we find a new rent-law passed for Bengal which withdraws from tenants in Government estates those cherished rights which they have enjoyed for the last forty years of appealing to courts of law for the final settlements of the rent—rights which their brother tenants living in private estates are still allowed to enjoy. Those who think that this series of retrograde, unwise and mischievous laws is strengthening British rule in India are mistaken. Such laws, unsympathetic and uncalled for, are alienating the sympathies of moderate and sensible men in India and are creating a mischievous im-pression that British rule in India has broken away from its past traditions, and is becoming arbitrary and despotic day by day. Such laws, forced down the throats of the people against their wishes and in spite of their protests, are weakening British rule in India and alienating the affections of the people. India is "a vast whispering gallery." as an able speaker lately said in the Houte of Commons, and every piece of unwise and retrograde legislation, withdrawing rights which were granted by wise administrators in the past creates a feeling of dissatisfaction and distrust which spreads from one end of the country to the other, which is discussed in town and village which embitters the feelings of the people. Never was there a time within the memory of the present generation when the rights and privileges enjoyed by the Indian subjects of her Majesty were so rapidly and recklessly with-drawn by a succession of coercive, retrograde, and repressive laws. And never was there a period when the confidence of the Indian nation in the justice, the benevolence and the good government of British rulers was so rudely shaken as at the present mo-ment. We appeal to wise administra-tors to stop further mischief, and to share legislation in the future, as has been done in the past, with some regard for feelings and the wishes of the people."

## वऱ्हाड

हवामान— उष्णता प्रखर आहे. पारा ११४ अंशावर चढतो रात्रंदिवस उकाडा विलक्षण होतो उन्हाच्या झळा एकसारख्या चालतात, व उन्हाचे आजार लवकर जडतात. पाण्या संबंधानें लोकांचे हाल मोठे आहेत. वारा सुटतो तेव्हां नकोसा होता. मध्यंतरीं थोडा पाऊस देखील पडला. यंदा पर्जन्यकाल लवकर सुरू होईल असा रंग दिसतो

येथील श्रीमान व्यापारी रा. रा. मोतीलाल बनसीलाल हे पिनलकोडांतील घरफोडीच्या शाब्दिक अपराधा खालीं सांपडले होते पण मे. जिल्हा माजिस्ट्रेट यांनीं अपिलांत त्यांस निर्दोष ठरवून खालील कोर्टानें दिलेली चार महिन्याची कैद व दंड ही शिक्षा रद्द केली. त्यांच्या बरोबर त्यांचे मुनीम व दोन नोकर यांची ही सुटका झाली.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं येथील हायस्कूलचे असिस्टंट मास्तर रा. रा. रामचंद्र आबाजी पन्हाळकर यांस अन्नद्वेषाच्या विकृतीनें गेल्या मंगळवारीं देवाज्ञा झाली. राजश्री रामभाऊ चांगले शिक्षक असून मोठे कल्पक होते पण त्यांच्या एककल्ली श्रमाला फारसें यश आलें नाहीं !

वऱ्हाड हास्पिटल असिस्टंटाच्या परीक्षेंत चार विद्यार्थी पसार झाले आहेत तेः—

रा. रा.
त्रिम्बक
गोविंद वैद्य
केशव काळे
लाल महमद

मध्य प्रांताचे जुडिशिअल कमिशनर मि

इमे हे येत्या शुक्रवारीं रजेवर जाणार आहेत आणि ती जागा कायमची मिळत असेल तर मि. आवर्ड हे वऱ्हाड प्रांत सोडून मध्य प्रांतांत जाण्याच्या विचारांत आहेत बहुतकरून ही जागा मे. आवर्ड यांस मिळेल असें वाटतें आणि त्यांच्यामागें वऱ्हाडचे ज्युडिशिअल कमिशनरच्या जागीं मि. किटस सी. एस. यांची नेमणूक पुन्हा या प्रांतीं होईल असा अंदाज आहे.

गेल्या मार्च महिन्यांत या प्रांतीं ३६९६ माणसें जन्मलीं व ५५८९ मरण पावलीं. जननाचें प्रमाण दर हजारीं ४६ पासून १९ पर्यंत उतरलें आहे. हा दुष्काळाचा परिणाम होय.

### NOTICE

Under rule 12 of the Municipal Election Rules, it is hereby pub-lished for general information that elections to fill up the vac-cancy of a Member for ward No. III in the Akola Municipal Com-mittee who retires under the operation of Rule 31 of the Mu-nicipal Rules and that of Mr. Laxman Krishna Chiploukar who has resigned, shall take place from 7 A. M. to 5 P. M. on the 13th of June 1898. The following table gives for the ward, names of outgoing members, date and place of election, name of polling officer, and the dates before which nomination-papers under Rule 13 of the Municipal Rules should be delivered to the polling officer.

Dated Akola 28th of May 1898

K. G. Damle
Secretary
Municipal
Committee
Akola.

| Ward | Names of Retiring members | Date of election | Place of election | Names of Polling officers | Date before which nomination papers to be submitted | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| III | Mr. Waman Narayan Kale<br>„ Laxman Krishna Chiploukar (already resigned) | 13th June 1898 | Town Hall | Md. Ismail Esquire Extra Assistant Commissioner | 6th June 1898 | |

Dated Akola 28th May 1898

K. G. Damle
Secretary
Municipal Committee Akola.

## जाहिरात.

म्युनिसिपल नियमांतील नियम १२ अन्वयें जाहिर करण्यांत येतें कीं अकोले म्युनसीपल कमिटींतील तारीख ३१ माहे मार्च सन १८९८ इ. रोजीं वार्ड नंबर ३ करितां ज्या मेंबराची जागा सदहू नियमां पैकीं नियम ३१ प्रमाणें खालीं झाली ती व मि० लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनीं राजीनामा दिल्यामुळें खालीं झालेली जागा भरण्या करितां तारीख १३ माहे ६ सन १८९८ इ. रोजीं सकाळेच सात वाजे पासून सायंकाळचे ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे. खालीं दिलेल्या तक्त्यांत त्या वार्डा पैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें त्या वार्डा करितां होणाऱ्या निवडणुकीची तारीख, जागा, पोलिंग आफिसराचें नांव व उमेदवारांनीं कोणते तारखे पर्यंत पोलिंग आफिसराकडेस म्युनिसिपल नियम १३ प्रमाणें आपले अर्ज द्यावेत. ही माहिती दिली आहे.

अकोला तारीख २८ मे सन १८९८

K. G. Damle
सेक्रेटरी
अकोला म्यु. क.

| वार्ड | मेंबरांचीं नांवें | निवडणुकीची तारीख | निवडणुकीची जागा. | पोलिंग आफिसरचें नांव | कोणते तारखेचे आंत उमेदवारांचे नांवचा कागद द्यावयाचा. |
|---|---|---|---|---|---|
| ३ | मि. वामन नारायण काळे. मि. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर. (यांनीं पूर्वींच राजीनामा दिला आहे. | १३ जून १८९८ | टाउनहाल | मे० महमद शेख इस्मायल साहेब ए. अ. कमिशनर. | ६ जूनचे आंत |

तारीख अकोला २८ मे १८९८

K. G. Damle
सेक्रेटरी म्युनिसिपल कमिटी अकोला

## वर्तमानसार

### युरोपची भावी भयप्रद स्थिती.

विलायतचे एक प्रधान मि. चेम्बरलेन यांनीं ता. १३ रोजीं एक मोठें व्याख्यान देऊन लोकांस अगदीं भयचकित करून सोडलें आहे व त्यामुळें इंग्लंडच्याच नव्हे तर सगळ्या युरोपांतल्या लोकांत जोराची चळवळ सुरू झाली आहे. त्यांनीं आपल्या त्या व्याख्यानांत सांगितलें कीं, परकीय राष्ट्रस्थिती आणीबाणीची व अडचणीची आली आहे, आणि इंग्लंडच्या लोकांनीं आपला देशाभिमान दाखविण्यास तयार व्हावें असें सांगण्याची वेळ फारशी लांब आहे असें वाटत नाहीं. ते आणखी असेंही बोलले कीं इंग्लंड अगदीं एकाकी असल्यामुळें त्यांतील सर्व लोकांनीं एक होणें अवश्य असून आपले जातभाई जे अमेरिकन त्याच्याशीं सख्य जोडणें हें इंग्लंडांतल्या सर्व लोकांचें कर्तव्य आहे. इंग्लंड व अमेरिका यांचा एकोपा असल्यास एखादा कसाही लढाईचा प्रसंग आल्यास तो जड जाणार नाहीं. इतकें झाल्यावर ते चिनी प्रकरणाच्या संबंधानें ह्मणाले कीं, चिनांतला प्रकार अगदींच असमाधानकारक झाला आहे. आपणास कोणी तरी मदतगार असल्या वाचून रशिया बरोबर लढाई सुरू करण्यास इंग्लंड असमर्थ आहे. चीनांत आमचे फार मोठें हित आहे व त्यामुळें तें प्रकरण फार विचाराचें झालें आहे इंग्लंडच्या सल्यावाचून चिनी प्रकरणाचा निकाल करण्याचें ठरल्यास इंग्लंडास आपला संबंध तोडतां येणार नाहीं. मि. चेम्बरलेन यांचें हें सांगणें फारच महत्वाचें व जबाबदारीचें असल्यामुळें ते बाहेर पडतांच इंग्लंडच्या लोकांत मोठी चर्चा सुरू झाली.

### सरकारचा एक ठराव

जहागिर, सरंजाम वगैरे संबंधानें नवे नियम करण्याचा अधिकार १८९३ च्या ७ व्या कायद्यानें व ५२ च्या ११ व्या कायद्यानें मुंबई सरकारास आहे त्या अन्वयें मुंबई सरकारनें कांहीं नवे नियम करून ते गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध केले आहेत ते नियम येणेंप्रमाणें:—

१. आजपर्यंत केलेल्या ठरावान्वयें किंवा पुढें ठराव होतील त्या अन्वयें सरंजाम चालूं राहतील.

२. वंश परंपरेनें चालूं ठेविलेले सरंजाम ब्रिटिश सरकारनें ज्यास इनाम दिलें असेल त्याच्या वंशांतील वडील घराण्यांत ते चालूं राहतील अथवा त्या वंशांतील एकत्र राहिलेल्या भावाच्या वंशांत चालूं राहील. परंतु या शिवाय इतर वंशांत अगर दत्तक मुलास तो सरंजाम चालूं ठेवणें अगर न ठेवणें सरकारच्या खुषीवर राहील. जेव्हां दत्तक मुलास हा सरंजाम द्यावा असें सरकार ठरवील त्यावेळीं त्यानें पहिल्या वर्षाचें सर्व उत्पन्न सरकारास नजराणा ह्मणून दिलें पाहिजे. आणि हें उत्पन्न सरकार ठरवील त्या हप्त्यानें वसूल करील.

३. सरंजाम चालूं केल्यापासून दोन वंश तो कायम राहून तिसऱ्या वंशापासून पेन्शन देण्याचा ठराव ज्या सरंजामाबद्दल झाला असेल त्या सरंजामाच्या कामीं जिवंत राहिलेला वडील मुलगा हा त्या सरंजामाचा मालक होईल व इंग्रजसरकारानें ज्यास प्रथम सरंजाम दिला असेल त्याचा वडील मुलगा असेल तर तो दुसरा वंश समजला जाऊन तिसरा वंश असेल तर त्यास पेन्शन दिलें जाईल परंतु इंग्रज सरकारनें ज्यास प्रथम सरंजाम दिला त्याचा अगर मुलगे त्याच्या देखतच मरण पावले तर व त्या मुलाचा मुलगा असेल तर आजोबाच्या मरणा नंतर नातवास तो सरंजाम दिला जाईल, व तो दुसरा वंश समजला जाईल पण पुढील वंशास पेन्शन मिळावयाचें नाहीं.

४ वरील नियमांबरहुकूम सरंजाम देण्याबद्दलचे सर्व हुकूम वेळोवेळीं सरकारनें मंजूर केले पाहिजेत.

५. सरंजाम हा एकच वंशापुरता आहे असें समजलें जाईल सरंजामाचा मालक मरण पावल्यावर तो सरंजाम सरकार खालसा करील व त्याच्या वंशास तो नियमाबरहुकूम देणें जरूर असेल तर त्यास नवें इनाम ह्मणून दिलें जाईल. या सरंजामावर कोणत्याही कर्जाचा वगैरे बोजा राहणार नाहीं मात्र त्यावर सरकार स्वतः वाटेल तो बोजा लादूं शकेल.

६. सरंजामाचे विभाग व्हावयाचे नाहींत.

७. प्रत्येक सरंजामदारानें पूर्वीच्या सरंजामदाराच्या विधवेच्या अगर विधवांच्या अन्नवस्त्राची तरतूद केली पाहिजे तसेंच कायदेशीर हक्क असतां केवळ पंगू अगर वेडे बनल्यामुळें ज्या भावाचे हक्क गेले असतील यांचेंही पोषण यानें केलें पाहिजे. जेव्हां अशी व्यवस्था केली जाणार नाहीं, तेव्हां ती व्यवस्था सरकार करील व तशा लोकांस सरकार नेमणूक करून देईल ती त्यानें दिली पाहिजे. पण जे स्वतंत्र रितीनें उपजीविका करीत असतील किंवा ज्यांच्या जवळ उपजीविकेचें साधन आहे असें सरकारास वाटेल त्यांस वरील नेमणूक देण्याचें कारण नाहीं.

वरील नियमा प्रमाणें ज्यांच्याबद्दल नेमणूक करून दिली आहे. त्याची ती नेमणूक त्यांच्या हयाती पर्यंतच कायम राहील

९. ७ व्या नियमान्वयें केलेली नेमणूक कोणत्याही कारणानें देण्यांत आली नाहीं तर त्या त्या परिस्थितीन्वयें सर्व सरंजाम किंवा त्याचा कांहीं भाग सरकार परत घेईल. आणि मग अशा तऱ्हेनें परत घेतलेल्या सरंजामांतून त्या कुटुंबांतील माणसांच्या अन्नवस्त्राची व्यवस्था केली जाईल.

१० जेव्हां असा सरंजाम दिवाणी कोर्टाच्या जप्तीनें अगर दुसऱ्या कांहीं कारणावरून सरंजामदाराहून व्यतिरिक्त मनुष्याच्या हातीं जाईल तेव्हां सरकार तो परत घेईल व परत देण्या संबंधानें अथवा दुसरी व्यवस्था करण्या संबंधानें सरकार त्या त्या वेळीं हुकूम करील.

११. वरील नियम केवळ सरंजामासच लागू आहेत असें नाहीं तर चौथ सरंमजामासही ते लागूं आहेत.

१२ राजकीय बाबीवरून दिलेलें इनाम सनदेंत अगर इनामाच्या हुकूमाच्या अटी अन्वयें चालूं राहील. ज्या कुटुंबाच्या पोषणार्थ असें इनाम दिलेलें असेल त्या कुटुंबांतून तें इनाम जाऊं लागलें तर सरकार तें परत घेईल. मात्र ज्या सनदेंत असलें इनाम दुसऱ्यास देतां येत नाहीं असें लिहिलें असेल त्या इनामासच हा नियम लागूं आहे.

क्युबनची कांहीं हत्यारी फौज काबानास येथें उतरली, पण स्पेननें हल्ला केल्यावरून तीउतरलेली फौज पुन्हा गलबतावर गेली.

स्पेनच्या २ गलबतांनीं हवाना येथें अमेरिकेच्या ६ गलबतांवर हल्ला करून एका गलबताचें बरेंच नुकसान केलें व बाकीच्या चार गलबतांस हाकून लावलें.

अमेरिका आपली १६,००० फौज फिलिपाईन येथें पाठवीत आहे.

मरूं किंवा मारूं अशा प्रकारची अगदीं निकराची लढाई अमेरिकेशीं करण्याचा स्पेनने निश्चय करून त्याप्रमाणें फौजेची तयारी चालविली आहे.

स्पेन व अमेरिका यांची जी मनिला येथें लढाई झाली त्यांत स्पेनच्या १४ गलबतांचा चुराडा होऊन स्पेनचे १,००० लोक ठार झाले असें रंगूनची तार सांगते.

अमेरीकेच्या एका गलबताचा स्पेनच्या गलबतानें नाश केला व १७ माणसें ठार केलीं.

स्पेनच्या फौजेनें क्युबा बेटांतल्या बंडखोरांचा पराभव करून त्याचे २०० लोक मारले. अ०

हिमालयपर्वतामधील.--माळ जमिनींत शेतें तयार करण्याचा उद्योग विलायतच्या रीतीप्रमाणें सर एड्वर्ड बक साहेब करणार आहेत. असें झाल्यास फार उपयोग होईल.

डॉ. सुरेशचंद्र सरकार यांचा खून नुकताच कलकत्ता येथें विक्स, रीड व वायन यांनीं केल्या वरून त्यांना तेथील मॅजिस्ट्रेटनें सेशन्स कमिट केलें आहे.

निझाम हैद्राबाद येथें २ ऱ्या पायदळ पलटणीचे लाईन्सच्या जागीं मोठी आग लागून २० घरें जळून गेलीं. तीं विझविण्याला आवश्यक सामग्री तेथें मुळींच नव्हती ह्मणून तिच्या समोर कांहींच इलाज चालला नाहीं.

माळवा प्रांतांपैकीं शिवनी नांवाच्या शहराला मोठी आग लागून त्याचा पुरता नाश झाला. त्या आगीचें कारण काय झालें तें समजलें नाहीं. ती आग लागली तेव्हां वारा फार वहात होता आणि तिच्या ज्वाला १६ मैलांवरून दिसत होत्या इतकी ती मोठी होती.

स्पॅनिश लोकांना आजकाल लांकडी बुचांच्या व्यापाराचा पराकाष्टेचा नाद लागलेला आहे. एका जेरोना प्रांतांत १९८००० इतक्या एकर जमिनींत नुसत्या बुचांच्या झाडांची लागवड केलेली आहे. त्यापासून कमींत कमी १६१०००० इतक्या रु. किंमतीचा माल ते तयार करितात.

सूर्याचें वय—लॉर्ड केल्व्हिन ह्मणून कोणी खगोलशास्त्रवेत्ते आहेत. त्यांणीं एक नवीनच पण फारच मोठा आश्चर्यकारक असा शोध लाविला आहे कीं, सूर्याचें वय आज मित्तीस १०,००,००,००० इतक्या वर्षांचें आहे. हल्लीं आहे इतकेंच जर त्याचें तेज निरंतर कायम राहिलें आणि तो आपल्या प्रखर तेजानें जळला नाहीं, तर सत्तर लक्षांपासून दीड कोटी वर्षांपर्यंत अस्तित्वांत राहील. ज्ञा. च.

पंजाबांतील गुरगांव जिल्ह्याचे एक नेटिव एक्स्ट्रा असि. कमिशनर यांजकडून एक खटला, जिल्ह्याचे कलेक्टर व मॅजिस्ट्रेट यांजकडे जाऊन, तेथून जिल्हा जज्जांकडे त्याजवर अपील झालें. जज्यांनीं खटला फेरतपासणीसाठीं खालीं पाठवितांना कलेक्टर साहेबांच्या वर्तनावर बरीच टीका केली होती. ती आपल्या हाताखालच्या ए. अ. कमिशनरच्या नजरेस येऊं नये ह्मणून साहेब बहादुरांनीं खटल्याच्या फेरतपासणीचा तोंडीं हुकूम ए. अ. कमिशनर यांस दिला. हें करणें गैरशिस्त असल्यामुळें, यांनीं कलेक्टरांचा हुकूम न ऐकतां जिल्हा जज्जाचा लेखी हुकूम आपणास मिळाला पाहिजे असा आग्रह धरिला. त्यावरून साहेब बहादुरांस घुस्सा येऊन त्यांनीं ए. अ. कमिशनर यांस सस्पेंड केल्याचा तोंडीं हुकूम दिला. लागलेंच ए अ. कमिशनर तिजोरी योग्य अंमलदाराच्या स्वाधीन करून घरीं बसले. त्या बरोबर कलेक्टर साहेबांच्या डोक्यांत उजेड पडून, त्यांनीं त्यांस परत कामावर बोलाविलें. पण वरिष्ठांकडून आपला अधिकार पुनः परत मिळेपर्यंत आपण कामावर रुजूं होणार नाहीं असा त्यांनीं स्वच्छ जबाब दिला. अखेर कलेक्टर साहेबांनीं त्यांची माफी मागून तंटा मिटविला या हकीकतीवरून ‘हां हां जी जी’ करणाऱ्या आमच्या बऱ्याच मंडळीनें बोध घेण्यासारखा आहे.

अलिकडे पंधरा वीस दिवसांत भर दिवसाढवळ्या आणि अत्यंत निर्दयपणानें व विनाकारण इंग्रज शिपाई नेटिवांचा खून करितात असे बोभाटे येत आहेत बंगाल्याकडे एका सरकार नांवाच्या डाक्टराचा सहज लीलेनें गोऱ्या शिपायांनीं प्राण घेतल्याची हकीकत ‘बंगाली’ नें दिलेली आहे ती वाचली ह्मणजे अंगावर शहारे उभे रहातात गोरे असे मदमस्त तरी कोठवर होणार याचा कांहींएक तर्कच होत नाहीं. काळ्यागोऱ्याच्या न्यायांत आधींच अंध असलेली इंग्रजी न्यायदेवता हटकून अन्याय करिते असा अनुभव असल्यानें, हे लोक मनस्वी शेफारून जाणें साहजीक आहे. यास्तव आपल्या न्यायाचा व निःपक्षपातीपणाचा दिमाख मिरवावयाचा असल्यास, सरकारानें असल्या बदमाशाची बिलकूल हयगय करितां कामा नये असें वाटतें. पुण्याला दोघां गोऱ्यांचे खून एका बदमाषानें केले तर साऱ्या शहरावर दोन लाखाचे जादा पोलीस बसविले, तसें नेटिवाचा विनाकारण खून करणाऱ्या सोल्जरांच्या बराखीवर जादा पोलीस बसविण्याची सरकारानें कां तजवीज करूं नये, अशी पुण्याच्या मराठा पत्रानें शंका प्रदर्शित केली आहे, ती आह्माला रास्त वाटते. पुण्याच्या दोघा युरोपियनांचे खून व मुंबई सरकारानें पुण्यास चालविलेला सावळा गोंधळ, आणि सोल्जरानें मारलेले नेटिव्ह, व त्यांच्या संबंधानें उडत असलेला फार्स यांच्या तुलनेनें पुष्कळ गोष्टी आह्मास कळतात; व त्या कळल्या ह्मणजे इंग्रजी राज्यावरील प्रजेची भक्ति डळमळूं लागेल हें बरें नव्हे, इतकेंच आह्मांस सुचवावयाचें आहे. कारण त्या पलीकडे आमच्या हातीं कांहीं नाहीं. स० वि०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैला.वासी खंडेराव बाळाजी फडके यांचे “वऱ्हाडसमाचार” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.